म. ग्रं. सं. ठाणें
विषय : चरित्र.
सं. क्र. १०७९



# ल नेहरू

REFBK-0012418

प्रकाशन

४१ वें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत -
अनुक्रम 37202 वि: पोरेण
क्रमांक 9068 नों दि: 9-12-63

त्यागमूर्ति

# पंडित मोतीलाल नेहरू

लेखक :

अरविंद ताटके

REFBK-0012418

REFBK-0012418

दोन रुपये

इनामदार बन्धु प्रकाशन : पुणें

प्रकाशक :
**बा. शा. इनामदार**
इनामदार बन्धु प्रकाशन
९९१ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति :
२७ सप्टेंबर १९६२
शके १८८४

(C) अरविंद ताटके,

सजावट :
दत्ता महाबळेश्वरकर

मुद्रक :
**गो. य. हिरवे**
साथीदार प्रिंटर्स
४६१।१ टिळक रोड,
पुणें २.

# मनोगत :

आपले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे वडील पंडित मोतीलाल नेहरू यांचें हें चरित्र वाचकांच्या हातीं देतांना अतिशय आनंद आणि समाधान होत आहे. इंग्रजीतहि मोतीलाल यांचें विस्तृत व अधिकृत असें चरित्र आजमितीला नाहीं. मराठींत त्यांच्यासंबंधी एक दोन चरित्रें आहेत. परंतु तीं फार अपुरी आहेत. ही उणीव लक्षांत घेऊन मी त्यांच्यासंबंधीं जास्तींत जास्त माहिती एकत्रित करून त्यांचें छोटें परंतु परिपूर्ण चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हें चरित्र लहान असलें तरी मोतीलाल यांची मूर्ति मी ठसठशीत दिसेल अशी काढली आहे. त्यांच्या थोरवीचें यथातथ्य वर्णन करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

मुत्सद्दीपणा, विधिमंडळांतील वक्तृत्व, संघटनाकुशलता, शिस्तप्रियता, हजरजबाबीपणा, निर्भयता व त्यागवृत्ती हे मोतीलालजींचे प्रमुख गुण विद्यार्थीना व सामान्य कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरतील. पं. जवाहरलाल यांच्यासारखे ' अमोलिक रत्न ' त्यांनी आपल्या तालमींत तयार केलें. हें यांचें ऋण आपण सदैव स्मरणांत ठेविलें पाहिजे. म्हणून मी हें चरित्र लिहिण्यास उद्युक्त झालों.

मोतीलाल यांचे चरित्र कालानुक्रमानें लिहिण्याची दक्षता मी घेतली आहे. ज्या प्रमुख ग्रंथांच्या आधारे मी हें चरित्र रंगविलें—सजविलें, त्यांची यादी परिशिष्टांत दिली आहे. परिशिष्टांतील विठ्ठलभाई पटेल चरित्र मुद्रण क्षमत्व या प्रमादाबद्दल श्री. जनार्दन गंगाधर करंदीकर यांनीं लिहिलें आहे. कै. ज. स. करंदीकरांनीं नव्हे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार श्री० यशवंतराव चव्हाण यांनी या चरित्रासाठीं ' दोन शब्द ' लिहिलें हें मी माझे भाग्य समजतों. याबद्दल त्यांचे मी मनः पूर्वक आभार मानतों.

श्री. गं. श्री. चापेकर यांनीं वारंवार प्रोत्साहन दिलें – पुस्तक पुरें करण्याबाबत पुष्कळ तगादा लाविला.

माझे मित्र श्री. गंगाधर धनवटे यांनी मूळ हस्तलिखित वाचून मार्मिक सूचना केल्या. मित्रवर्य श्री. सुधीर वैद्य यांनीं या पुस्तकासाठीं अनेक कामें केलीं. या सर्वांचे मी आभार मानतों.

मोतीलाल यांच्या छायाचित्रांचें ब्लॉक्स केंद्रीय अन्नमंत्री श्री. स. का. पाटील यांनी अत्यंत तत्परतेनें मिळवून दिले. ' सेविका ' ( इंग्रजी ) मासिकाचे संपादक श्री. रमण यांचीहि या कामीं मदत झाली. त्याबद्दल या उभयतांचें मी मनःपूर्वक आभार मानतों.

मोतीलाल मोटार चालवीत असतांना घेतलेल्या छायाचित्राचा ब्लॉक इंडियन ऑक्सिजन लिमि० चे श्री. संन्याल ( कलकत्ता ) यांनी पाठविला. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

मोतीलाल यांच्या हस्ताक्षराचा समावेश करण्याची परवानगी पं. जवाहरलाल व मुंबईच्या एशिया पब्लिशिंग हाऊसनें दिली. हस्ताक्षराचा ब्लॉकहि एशिया पब्लिशिंग हाऊसनें दिला. त्याबद्दल पं. जवाहरलाल यांचे व ' एशिया पब्लिशिंग 'चे मी आभार मानतों.

मित्रवर्य श्री. बाबुराव इनामदार यांनी पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी हौसेनें व आनंदानें स्वीकारली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

२७ सप्टेंबर १९६२
हिरामहाल,
वडाळा, मुंबई ३१

अरविंद ताटके

ताटके
कुटुंबीयांसाठीं
ज्यांनीं
अपूर्व
स्वार्थत्याग
केला
त्या

**कै. तीर्थस्वरूप**
**दादा यांचें चरणीं**

## अंतरंग


दोन शब्द ... ...

मनोगत ... ...

१ लाखावर लाथ ... १

२ वैभवाच्या शिखरावर ... ७

३ कुबेराचा कायापालट ... १४

४ कॉंग्रेसचें अध्यक्षपद ... २०

५ जेलयात्रा ... ... २९

६ विधिमंडळांतील कर्तृत्व... ३६

७ चिरनिद्रा ... ... ५५

८ अलाहाबादचे नवाब ... ६०

९ श्रद्धांजली आणि पुण्यस्मरण ७५

१० परिशिष्ट ... ... ८५

मुख्य मंत्री

महाराष्ट्र

सचिवालय, मुंबई ३२

दिनांक १२ सप्टेंबर १९६१

गेल्या शंभर वर्षांत भारतांत जे थोर पुरुष होऊन गेले, त्यांत पंडित मोतीलाल नेहरू यांची गणना होते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर व पं. मोतीलाल नेहरू या दोन महापुरुषांचा जन्म एकाच वर्षी व्हावा हा योगायोगच होय. गेल्याच वर्षी या महापुरुषांचे जन्मशताब्दि महोत्सव भारतांत मोठ्या उत्साहानें साजरे झाले.

लक्ष्मी आणि सरस्वती यांचें वास्तव्य एकाच ठिकाणीं असल्याचें क्वचितच आढळून येते. पं. मोतीलालजी यांना मात्र असें कुबेराचें ऐश्वर्य उपभोगावयास मिळाले तसेंच त्यांना विद्वत्ता व पांडित्य यांचाहि लाभ घडला. अलाहाबादेस त्यांनी वकीलीच्या व्यवसायांत अमाप पैसा मिळविला व अखिल भारतांत पहिल्या प्रतीचे कायदे पंडित म्हणून त्यांनी नांव कमाविलें. परंतु त्यांचें खरें मोठेपण त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं केलेल्या त्यागांत आहे. दास्यशृंखलांनी जखडलेल्या भारतमातेची हांक कानीं पडतांच पं. मोतीलालजींनी सर्व ऐश्वर्याचा त्याग केला व स्वातंत्र्य लढ्यांत त्यांनी आपल्या सर्व कुटुंबियांसह उडी घेतली. पं. मोतीलालजींनी आपल्या बुद्धीनें व चातुर्यानें केवळ लढाऊ राजकारणच गाजविलें असें नव्हे तर त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची, कर्तृत्वाची व कायद्याच्या ज्ञानाची चमक विधि-मंडळांतहि दाखविली.

पं. मोतीलालजी यांनी आपलें सर्व जीवनच देशास अर्पण केलें होतें. अलाहाबाद येथील आपली प्रासादतुल्य इमारत त्यांनी राष्ट्रास देणगी म्हणून दिली व त्यागाचें एक आदर्श उदाहरण त्यांनी घालून दिलें. तथापि पं. मोतीलालजींनी राष्ट्रास जो सर्वांत मोठा ठेवा दिला तो त्यांचे सुपुत्र - आपले पंतप्रधान - पंडित जवाहरलालजी यांच्या रूपानें। अशा या थोर व्यक्तीचें चरित्र श्री. अरविंद ताटके यांनी मराठी वाचकांस सादर केल्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. हे चरित्र वाचकांस उद्बोधक वाटेल अशी मला आशा वाटते. या चरित्राच्या प्रकाशनास माझ्या शुभेच्छा.

पंडित मोतीलाल नेहरू ( स. १९२४ )




मोतीलालजी (स. १८८६)



पंचविशींतला जवान

बिनघोड्याची नवी गाडी (स. १९०८)



डावीकडून उजवीकडे–चंद्रकुमारी, विजयालक्ष्मी व मोतीलाल (चक्रधारी)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................
१२६९६

: १ :

# लाखावर लाथ

सुमारें चाळीस वर्षांपूर्वीचा प्रसंग असेल ! सार्ठाच्या घरांतले एक गृहस्थ नि त्यांची तेरा चौदा वर्षांची मुलगी शेजारीं शेजारीं बसली होती. त्यांच्या जवळच एक श्रीमंत गृहस्थ उभा होता. या गृहस्थाजवळ एक लाख रुपये होते. तो त्या वृद्ध गृहस्थांना म्हणाला, " घ्या हे लाख रुपये ! माझ्या खटल्यांत तुम्हींच वकील म्हणून काम करा."

" बेटी, हे पैसे घेणें उचित आहे का ? " वडिलांनीं मुलीला विचारलें.

" नाहीं, बाबा; तुम्ही हे पैसे घ्यावें असें मला वाटत नाहीं," लेकीनें वडिलांना उत्तर दिलें. लागलीच ते वृद्ध गृहस्थ त्या धनाढ्य गृहस्थाला विनयानें म्हणाले, " माफ करा. मी अतिशय दिलगीर आहें. मला आपलें वकीलपत्र घेतां येणार नाहीं. "

लाख रुपये पुढें येऊन पडले असतां काम नाकारणारे व लाखावर लाथ मारणारे गृहस्थ कोण होते ? ते होते पंडित मोतीलाल नेहरू ! आपल्या सांप्रतच्या पंतप्रधान नेहरूंचे ते तीर्थरूप. त्यांना पैसे घेऊं नका असें सांगणारी मुलगी म्हणजे सध्यांच्या सौ. कृष्णा हाथिसिंग— पंडित जवाहरलाल नेहरूंच्या धाकट्या भगिनी.

मोतीलाल हे भारतांतले पहिल्या प्रतीचे वकील होते. त्यांची महिन्याची

मिळकत असेल लाखाच्या आसपास. त्यांच्या घरीं पक्षकारांची रांग लागलेली असे. आपला खटला त्यांनीं चालवावा म्हणून पक्षकारांत नेहमीं अहमहमिका लागत असे.

परंतु सन १९२० मध्यें असहकारितेच्या चळवळींत मोतीलालनीं आपला वकिलीचा धंदा बंद केला. तरीहि अनेक पक्षकार भलती फी देऊन त्यांना आपला खटला चालविण्याची विनंती करीत. असाच एक पैसेवाला पक्षकार लाख रुपये देऊन आपलें वकीलपत्र घेण्याची विनंती त्यांना करीत होता. परंतु मोतीलाल मोठे मनोनिग्रही होते. एकदां वकिलीच्या धंद्याला रामराम ठोकल्यावर पुढें अनेक मोठे खटले त्यांच्या दाराशीं आले तरीहि त्यांनीं वकीलपत्र घेण्याचें नाकारलें. वकिलीचा व्यवसाय ३७ वर्षें केल्यावर केवळ राष्ट्रकार्यार्थ नि असहकारितेच्या हाकेला ओ देऊन अमाप संपत्ति देणारा धंदा त्यांनीं सोडला. कारण ते जसे मनोनिग्रही होते तसेच त्यागीहि होते. आपले पंतप्रधान नेहरू थोर पुढारी आहेत. त्यांचे पिताजी मोतीलाल हे देखील एक थोर पुढारी होऊन गेले.

कर्तृत्ववान पुरुषाचा पुत्रहि गुणी व कीर्तिवान् निपजतो असें क्वचित्‌च घडतें. घराण्यांत काय अथवा राष्ट्रांत काय, “ बापसे बेटा सवाई ” अशीं उदाहरणें फार दुर्लभ असतात. किंबहुना “ सूर्यापोटीं शनैश्चर ” अशीच वस्तुस्थिति बहुशः आढळते.

परंतु यालाहि अपवाद असतात. पुराणांतील अज–रघु, ग्रीक राष्ट्रांतील फिलीप–शिकंदर, मराठेशाहींतील शहाजी–शिवाजी, पेशवाईतील बाळाजी विश्वनाथ व पहिले बाजीराव, अर्वाचीन महाराष्ट्रांतले कृष्णशास्त्री–विष्णुशास्त्री चिपळूणकर, इंग्लंडचे रॅन्डॉल्फ चर्चिल नि त्यांचे त्रिखंड कीर्तीचे चिरंजीव विन्स्टन् चर्चिल या प्रसिद्ध पितापुत्रांच्या

जोडगोळ्या अनेकांच्या स्मरणांत असतील. अगदीं अलीकडच्चीं उदाहरणें म्हणजे डॉ. सर रामकृष्ण भांडारकर नि डॉ. देवदत्त भांडारकर आणि सर आशुतोष मुकर्जी नि डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी हीं होत. भारतीय राजकारणांत व काँग्रेसच्या अध्यक्षांच्या यादींतहि एक अव्वल दर्जाची श्रेष्ठ पिता-पुत्रांची जोडी दृष्टोत्पत्तीस येते. ती जोडी पंडित मोतीलाल नि पंडित जवाहरलाल ही होय.

जवाहरलाल यांचे गुरु महात्मा गांधी. तेव्हां त्यांच्या सर्व मोठेपणाला गांधीच कारणीभूत होत, असा एक समज आहे. परंतु तो तितकासा बरोबर नाहीं. गांधींच्या राजकारणाचा वारसा जवाहरलालनीं घेतला असला तरी त्यांच्या व्यक्तित्वाची घडण त्यांचे पिताजी मोतीलाल नेहरू यांनीं केल्याची साक्ष जवाहरलालजींच्या तरुणपणापर्यंतच्या चरित्रांत आढळून येईल.

मोतीलालजींनीं हा इहलोक सोडल्याला तीस वर्षें होऊन गेलीं असल्यानें सध्यांच्या तरुण पिढीला त्यांच्या कर्तृत्वाची नि संपन्न व्यक्तिमत्वाची ओळख कशी असणार ? शिल्पकार आपलें शिल्प बावनकशी ठरावें म्हणून कशी जिवापाड मेहनत करीत असतो तें आहे ना माहीत ? मोतीलालनीं देखील आपला मुलगा मोठा व्हावा, सद्‌गुणी व्हावा म्हणून अशीच दक्षता घेतली बरें का ! गुलाबाच्या कळीला जपावें त्याप्रमाणेंच ते आपल्या मुलाची सर्वतोप्रकारें काळजी घेत आणि त्याच्यावर उत्तम संस्कार करण्यासहि चुकत नसत. त्याचेंच फळ म्हणून आज राष्ट्राला जवाहरलाल यांच्यासारखे त्रिखंड कीर्तीचे पंतप्रधान लाभले आहेत. अशा थोर सुपुत्राच्या पित्याची पंडित मोतीलालजींच्या–चरित्राची ओळख तरुण पिढीला तरी बोधप्रद ठरेल.

नेहरू घराणें काश्मिरी ब्राह्मणांचें व ऐतिहासिक काळांतलें आहे.

घराण्याचा मूळपुरुष राज कौल हा संस्कृत पंडित होता. काश्मिरमधल्या ब्राह्मणांना पंडित म्हणून संबोधण्याचा प्रघात आहे. स. १७१६ च्या सुमारास दिल्लीचा बादशहा फरूकसियर याच्या निमंत्रणावरून राज कौल दिल्लीस गेले. त्यांच्या संस्कृत नि फार्सी भाषेवरील प्रभुत्वामुळें बादशहा त्यांच्यावर अतिशय खूप झाला. नंतर बादशहा काश्मिरला गेला असतांना तेथेंहि राज कौलनीं आपल्या विद्वत्तेची त्याच्यावर चांगली छाप पाडली. तेव्हां बादशहाला अतिशय संतोष झाला नि त्या भरांत त्यानें कौलना जहागीर दिली व कालव्याच्या किनारीं असलेलें एक घरहि दिलें. कालव्याला फार्सींत नहर असें म्हणतात. कांहीं काळानें नहरजवळ राहणारे ते नेहरू असें नांव घराण्याला पडलें.याच घराण्याला कौल-नेहरू असेंहि म्हणतात. परन्तु कालान्तरानें कौल नांवाची अुपाधि नष्ट झाली नि नेहरू हेंच नांव सर्वत्र रूढ झालें.

नेहरू घराण्यांतले पुरुष जरी चांगले पढीक होते तरी त्यांतले बरेचसे सरकारी नोकरींत होते. जवाहरलाल यांचे पणजोबा पंडित लक्ष्मी-नारायण नेहरू वकिल होते आणि आजोबा पंडित गंगाधर नेहरू पोलीस अधिकारी असून दिल्ली प्रांताचा ताबा त्यांच्याकडे होता. त्यांची दाढी चांगली लाल असे आणि त्यांचे डोळे निळसर असत. ते वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षीं वारले. त्यांचेच चिरंजीव मोतीलाल नेहरू होत.

नेहरू कुटुंब स. १८५८ च्या सुमारास आगरा येथें स्थायिक झालें. मोगल बादशहा शहाजहान यानें बांधलेला ताजमहाल नेहरू कुटुंबाचें वास्तव्य असलेल्या परिसरांतच होता. आगरा येथेंच दि. ६ मे १८६१ रोजीं काश्मिरी सारस्वत ब्राह्मणाच्या कुळांत मोतीलाल यांचा जन्म झाला. त्यांचे वडिल गंगाधर त्यावेळीं दिवंगत झालेले होते. मोतीलालनीं ज्या दिवशीं या जगांत प्रवेश केला त्याच दिवशीं दुसऱ्या एका बालकानें

जगाच्या रंगभूमीवर प्रवेश केला. तें बालक म्हणजे बंगालचे सुप्रसिद्ध कवि रवींद्रनाथ टागोर हे होत.

मोतीलालना आणखी दोन भाऊ होते. वडिल भावाचें नांव बन्सीधर; दुसऱ्या भावाचें नांव नंदलाल. मोतीलाल हे तिसरे नि सर्वांत धाकटे. वडिल निवर्तल्यामुळें मोतीलाल यांच्या लालनपालनाची जबाबदारी त्यांच्या दोघां बंधूंवर पडली. बन्सीधर होते सरकारी नोकरींत. ते नेहमीं फिरतीवर असत. अर्थात् मोतीलाल यांचा सर्व भार नंदलाल यांच्यावर पडला. नंदलाल मोठे प्रेमळ नि कर्तव्यपरायण. त्यांनीं मोतीलालना कसलीच उणीव भासूं दिली नाहीं.

नंदलाल यांच्या प्रेमळ छत्राखालीं मोतीलाल यांचें बालपण गेलें. नंदलाल कांहीं काळ संस्थानी नोकरींत होते. राजपुतानांतल्या खत्री संस्थानांत त्यांनीं दिवाणाचें काम केलें. नंतर त्यांनीं आगरा येथें वकिलीचा व्यवसाय सुरू केला. पुढें हायकोर्टाचें स्थलान्तर अलाहाबाद येथें झाल्यावर मोतीलालहि त्यांच्याबरोबर अलाहाबादला आले. पुढें बराच काळ नेहरू कुटुंबाचें वास्तव्य अलाहाबादमध्यें झालें हें सर्वश्रुत आहे.

मोतीलाल लहानपणापासून बुद्धीनें मोठे कुशाग्र नि तल्लख होते. त्यांचें प्राथमिक शिक्षण मुसलमानी शाळेंत झालें. बाराव्या वर्षी ते अरबी नि पर्शियन भाषेंत चांगलेच प्रवीण झाले. या दोन्ही भाषांतलें त्यांचें प्रभुत्व पाहून वडिल मंडळींना त्यांच्याबद्दल अतिशय कौतुक वाटूं लागलें. पुढील अभ्यासक्रम त्यांनीं कानपूरच्या सरकारी शाळेंत पुरा केला. शाळेंत असतांना त्यांच्या इंग्रजीवर शिक्षकवर्ग निहायत खूष असे. परंतु अभ्यासापेक्षां त्यांचें लक्ष खेळाकडे जास्ती असे. असें असूनहि कानपूरच्या शाळेंतून ते प्रवेश परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले.

मोतीलाल यांच्या विविध भाषेवरील नैपुण्यामुळें मोठेपणीं ते एखाद्या महाविद्यालयांत प्राध्यापकाची मानाची जागा भूषवितील असा विचार त्यांच्या जवळच्या मंडळींच्या मनांत हमखास आला असेल. बालपणींच विविध भाषांनीं त्यांची रसवंती बहरलेली असे. परन्तु विद्यार्थ्यांपुढें पोपट-पंची करण्याचा प्राध्यापकी पेशा पंडितजींच्या प्रकृतीला कितपत मानवला असता याची शंकाच आहे ! प्रवेश परीक्षा झाली तेव्हां आतां पदवी मिळविण्यासाठीं महाविद्यालयांत प्रवेश करावयाचा हें ओघानें आलें. मोतीलालनीं कॉलेजांत नांव नोंदाविलें. परन्तु पदवी त्यांनीं घेतली नाहीं. प्राध्यापक ते झाले नाहींत. कारण विधि- लिखित वेगळें होतें... ते झाले कायदेपंडित आणि तेंहि पारितोषिक पटकावून...!

* * *

: २ :

# वैभवाच्या शिखरावर

शालेय शिक्षण संपल्यानंतर मोतीलालनीं अलाहाबादच्या मूर महाविद्यालयांत नांव घातलें. वयानें त्यांच्यापेक्षां पांच सहा महिन्यांनीं लहान असलेले पंडित मदनमोहन मालवीय हे कॉलेजांत त्यांचे सहाध्यायी होते. पुढें राजकारणांत दोघांचें फारसें पटलें नाहीं तरी उभयतांचा स्नेह होता व दोघांनींहि राष्ट्रासाठीं आपला देह झिजविला.

कॉलेजांत असतांना अभ्यासापेक्षां इतर गोष्टींत मोतीलाल फार लक्ष घालीत. वृत्तीनें ते हूड असत व पुंडावा करण्यांत पटाईत असत. पाश्चिमात्य पोशाखाचा नि संस्कृतीचा पगडा त्यांच्यावर त्यावेळीं पुरा बसलेला होता. इंग्रजी भाषा ते सफाईदार नि अस्खलीत बोलत. त्यामुळें इंग्लिश प्राध्यापकांची त्यांच्यावर फार मर्जी असे. अर्थात् त्यांच्या इतर धिटाईच्या वर्तणुकीकडे ते इंग्लिश प्राध्यापक जाणूनबुजून कानाडोळा करीत. मोतीलालना देखील आपल्या इंग्रजी प्राध्यापकांबद्दल पराकाष्ठेचें प्रेम वाटे व त्यांच्या मनांत आपल्या आंग्ल-गुरुजनांबद्दल अतिशय आदर वसत असे. इतका कीं एका पाश्चिमात्य प्राध्यापकाचीं पत्रें त्यांनीं स्वतःजवळ अनेक वर्षें काळजीपूर्वक बाळगलीं होतीं. कॉलेजच्या जीवनापासून त्यांचा कल पाश्चिमात्य पोशाखाकडे नि संवयीकडे झुकूं लागला. त्यावेळेपासून ते इंग्लिश लोकांचे चहाते बनले.

अलौकिक बुद्धिमत्ता असूनहि मोतीलालनीं बी. ए. ची पदवी कांहीं संपादन केली नाहीं. बी. ए. च्या परीक्षेच्या वेळीं पहिला पपर वाईट गेला अशा समजुतीनें नंतरच्या उत्तरपत्रिका त्यांनीं लिहिल्या नाहींत. उरलेला वेळ स्वारीनें ताजमहालचें सौंदर्य पाहण्यांत घालविला. ही बातमी त्यांच्या प्राध्यापकांना समजली. तेव्हां ते फार खवळले. कारण पहिला पेपर मोतीलालनीं चांगला लिहिला होता. उरलेल्या पत्रिका त्यांनीं लिहिल्या नाहींत ही त्यांनीं फार घोडचूक केली असें त्यांच्या प्राध्यापकांनीं बोलून दाखविलें. त्यामुळें पदवीचा लाभ मोतीलालना झाला नाहीं.

इंग्रजी भाषा बोलण्यांत मोतीलाल चांगले वाकबगार नि तशांत त्यांना लाभला त्यांच्या बंधूंचा—नंदलाल यांचा सहवास. मग काय विचारतां ? त्यांचें लक्ष वकिलीच्या परीक्षेकडे वळलें. अतिशय अभ्यास करून त्यांनीं वकिलीच्या परीक्षेंत पहिला अनुक्रम मिळवून एक सुवर्ण-पदकहि मिळविलें. त्यावेळचे बहुतेक बुद्धिमान लोक वकिलीच्या व्यव-सायाकडे वळत असत. मोतीलालहि त्याच धंद्यांत शिरले.

याच सुमारास स. १८८१ मध्यें मोतीलाल यांचा पहिला विवाह झाला. पण पत्नी बाळंतपणांत पुढें निर्वतल्यानें त्यांनीं दुसरें लग्न केलें. त्यांची दुसरी पत्नी स्वरूपराणी. त्यावेळीं त्या पंधरा वर्षांच्या होत्या व मोतीलाल बावीशीच्या घरांत होते.

पहिलीं तीन वर्षें मोतीलालनीं कानपूरच्या जिल्हा कोर्टांत वकिली केली. तीं वर्षें जवळ जवळ उमेदवारीचींच म्हटलीं पाहिजेत. स. १८८३ पासून त्यांनीं कानपूरला वकिलीस सुरुवात केली. पुढें तेथें जम बसल्यावर ते अलाहाबादला वकिली करूं लागले. तल्लख बुद्धिमत्ता, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, वादविवादांत हजरजबाबीपणें उत्तरें देण्याची

हातोटी नि छाप पाडणारें व्यक्तिमत्व, इतकी गुणसंपदा त्यांना लाभली असल्यानें थोड्याच काळांत वकिलींत त्यांचा उत्तम जम बसला व अलाहाबादच्या नामांकित वकिलांत त्यांची गणना होऊं लागली. पुढें या व्यवसायांत त्यांचा इतका जम बसला कीं, हिंदुस्थानांतल्या पहिल्या प्रतीच्या कायदे-पंडितांच्या यादींत ते चमकूं लागले. लक्ष्मीचा कृपा-कटाक्ष त्यांच्याकडे कायमचा वळला. त्यावेळीं त्यांची प्राप्ती दरमहा रु. दहा हजारांपासून ते वीस हजारांपर्यंत होती एवढें सांगितलें कीं त्यांच्या ऐश्वर्याची नि कर्तृत्वाची कल्पना येईल.

अलाहाबादला आल्यावर थोड्याच दिवसांत मोतीलालचे बंधु नंदलाल वारले. त्यावेळीं मोतीलालना अतिशय दुःख झालें. नंदलाल त्यांना वडिलांच्या ठिकाणीं होते. लहानपणापासूनचें त्यांचें कोडकौतुक नि पालनपोषण नंदलालनींच केलें होतें. मोतीलालजींवर आतां दुहेरी जबाबदारी पडली. स्वतःचा संसार व नंदलाल यांच्या कुटुंबाचें पोषण या दोन्ही गोष्टींकडे त्यांना लक्ष द्यावें लागलें.

परंतु हातपाय गाळणें मोतीलालना ठाऊक नव्हतें. उलट प्रतिकूल प्ररिस्थितींत त्यांच्या गुणांना नि कर्तृत्वाला एक वेगळी धार येई. संकटांवर मात करणें त्यांच्या हातचा मळ होता. व्यवसाय उत्तम चालला असल्यानें आर्थिक फिकीर त्यांना नव्हती. वकिलीचा व्यवसाय व प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळून फुरसत सांपडली कीं ते मनोरंजनांत नि करमणुकीच्या गोष्टींत लक्ष घालीत. हाताचे ते फार सढळ होते. चार मित्रमंडळीसाठीं बेसुमार पैसा खर्च करण्यास त्यांना बिलकूल दिक्कत वाटत नसे. कुस्त्यांच्या दंगलींची त्यांना फार आवड असे. मोतीलाल यांचा तरुणपणचा जीवनक्रम असा होता.

मोतीलाल यांच्या पत्नी स्वरूपराणी या अंगा-बांध्यानें ठेंगण्या ठुसक्या असल्या तरी अतिशय सुस्वरूप होत्या. स्वरूपराणी हें नांव त्यांना

शोभून दिसे. त्यांची काया एखाद्या बाहुलीसारखी नाजूक होती असें त्यांचें वर्णन एका लेखकानें केलें आहे. त्यांचें लग्न झालें तेव्हां घरांत कुटुंब फार मोठें होतें. एकत्रकुटुंबपद्धतीमुळें घरांतला परिवार बराच मोठा होता. नंदलाल यांचीं मुलें, मोतीलाल यांच्या वहिणीचीं मुलें नि मोतीलाल–स्वरूपराणी असा एकंदर कुटुंब-विस्तार होता.

मोतीलाल यांची आई त्यावेळीं हयात होती. ती मोठी मानी नि करारी असून सर्व मंडळींवर तिचा चांगला वचक असे. अशा मोठ्य कुटुंबांत पदार्पण करतांना स्वरूपराणी थोड्या बुजून गेल्या असल्यास नवल नव्हे, परंतु यजमानांचें त्यांच्यावर उत्कट प्रेम असल्यानें मोठ्या कुटुंबांतहि त्यांचा विशेष कोंडमारा झाला नाहीं. त्याचें श्रेय मोतीलालना द्यावयास हवें.

स. १८८५ मध्यें कॉंग्रेसचें पहिलें अधिवेशन मुंबईला ह्यूम ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. पुढें याच कॉंग्रेसचें अध्यक्षपद मंडीत करण्याचा मान मोतीलालना मिळाला. दिवसेंनुदिवस मोतीलाल यांची भाग्यसरिता दुथडी वाहूं लागली होती. त्यांची मिळकत महिना दहा हजारांवरून वीस हजारांवर गेली. दोन वेळां तर मिळकतीचें मान अर्ध्या लाखावर गेलें होतें.

वकिलमंडळींत तर मोतीलाल म्हणजे एक कौतुकाचाच विषय होऊन बसले. त्यांचें वाढतें कर्तृत्व पाहून अलाहाबादच्या न्यायासनालाहि त्यांच्या कर्तबगारीची दखल घेणें भाग पडलें. त्यांचें व्यवसायांतलें अपूर्व नि चढतें नैपुण्य पाहून न्यायासनानें त्यांना 'ॲडव्होकेट' हा किताब देऊन त्यांचा मोठा बहुमान केला. त्याकाळीं ॲडव्होकेट ही पदवी फक्त प्रथम श्रेणीच्या नि प्रमुख वकिलांनाच देण्याची प्रथा असे.

एकंदरीत मोतीलाल नि स्वरूपराणी हें एक सुखी दांपत्य होतें.

अनुक्रम ३८१०२ दि: १-२-५६
क्रमांक २०८८ नों. दि:


त्यांच्या सुखांत कसलीच कमतरता नव्हती. घरांत गजान्त लक्ष्मी वास करीत होती. सर्व प्रकारचे सुखोपभोग त्यांना उपलब्ध होते. स्वरूपराणीसारखी सुन्दर स्त्री व त्यांचा मोतीलाल यांच्यासारखा रुबाबदार नि कर्तबगार पती पाहिल्यावर अनेकांना या जोडप्याचें मोठें कौतुक वाटे. या सर्व सुखांत आणखी भर पडण्याचा सुयोग लौकरच आला.

या उभय पती-पत्नींच्या संसाराच्या मांडवावर पुत्रप्राप्तीची वेल लौकरच चढली. चांदीच्या वाटींत केशराचा गोळा ठेवल्यावर त्या वाटीला एक आगळीच शोभा येते. त्याप्रमाणें या पती-पत्नींच्या सौख्याला पुत्रजन्मानें आणखीनच शोभा आली. दि. १४ नोव्हेंबर हा दिवस सांप्रत भारतांत मोठ्या उत्साहानें सर्वत्र साजरा करण्यांत येतो. कारण त्याच दिवशीं पंडित जवाहरलाल यांचा जन्म झाला. दि. १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं अलाहाबाद येथें स्वरूपराणींना पुत्ररत्न झालें. त्याचेंच नांव जवाहरलाल !!!

मोतीलाल यांच्यासारख्या संपन्न नि रसिक व्यक्तीनें पुत्रजन्माचा सोहळा किती थाटानें केला असेल त्याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. उभय पती-पत्नींना मुलाला कुठें ठेऊं न कुठें नको असें झालें. मोतीलालना प्रथम पत्नीपासूनहि एक मूल झालें होतें. परंतु बालपणींच तें मृत्युमुखीं पडलें. नंतर स्वरूपराणींनाहि एक मूल झालें होतें. परंतु तें बाल्यावस्थेंतच दगावलें. अर्थात्‌च जवाहरलाल या उभय पती-पत्नींच्या प्रेमाचा एकमेव विषय बनल्यास नवल नव्हे.

मोतीलालनीं आपल्या एकुलत्या एक मुलाची व्यवस्था फारच चांगली व आपल्या दर्जाला नि इतमामाला शोभेल अशी ठेवली होती. जवाहरलाल यांचें लालनपालन खास युरोपियन दायांनीं केल्यामुळें त्यांचें बालपण अतिशय सुखांत गेलें. सोन्याचें बोंडलें तोंडांत धरूनच ते

जन्माला आले असें त्यांचें वर्णन केल्यास तें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं.

मोतीलालनीं जवाहरलाल यांच्या प्रकृतीची अगर शिक्षणाची यत्किंचित्‌हि आबाळ अगर उपेक्षा होऊं दिली नाहीं. एखाद्या वड्या लाटाच्या मुलाला शिक्षण द्यावें तशा दर्जाचें उत्तम शिक्षण त्यांनीं आपल्या मुलाला दिलें. पोहणें, अश्वविद्या गिर्यारोहण वगैरे कलांमध्यें देखील मुलानें पारंगत व्हावें असें त्यांना वाटे आणि तशा सर्व प्रकारच्या सुखसोयी त्यांनीं जवाहरलालना उपलब्ध करून ठेवल्या होत्या.

अशा तऱ्हेनें जवाहरलाल यांचीं अकरा वर्षें मोठ्या सुखांत गेलीं नि नंतर एकोणिसावें शतक संपून विसाव्या शतकास प्रारंभ झाला. सध्यां जवाहरलालजींची गणना या शतकांतल्या थोर पुढाऱ्यांत होते. त्याचें श्रेय अंशतः का होईना मोतीलालना द्यावयास हवें. कारण त्यांनीं अतिशय जागरूकतेनें व दक्षतेनें आपल्या पुत्रास उच्च प्रकारचें शिक्षण दिलें होतें.

सन १९०० मध्यें मोतीलाल युरोपांतहि फेरफटका करून आले. साठ वर्षांपूर्वीं परदेशगमन करून येणाऱ्या गृहस्थाला प्रायश्चित देण्याची प्रथा इकडे प्रचलित होती. मोतीलाल युरोपांतून परतल्यावर त्यांनीं प्रायश्चित घेतलें पाहिजे असा धोशा काश्मिरी ब्राह्मण वर्गानें त्यांच्या मागें लावला. परंतु ते पुरोगामी मताचें असल्यानें त्यांनीं या ब्राह्मणांना मुळींच दाद दिली नाहीं नि प्रायश्चित घेण्यास रोखठोकपणें नकार दिला. कांहीं जणांनीं एखादा विधी अगर समारंभ तरी त्यांनीं करावा अशी गळ त्यांना घातली. परंतु मोतीलालना परदेशगमन निषिद्ध आहे असें मुळींच वाटत नसल्यानें त्यांनीं छातीठोकपणें नि निर्भयपणें सर्व सनातनी बुद्रुकांच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. सध्यां त्यांच्या या धैर्याचें विशेष कौतुक कोणाला वाटणार नाहीं. साठ वर्षांपूर्वींचा काळ पहातां त्याचें मनोधैर्य नि मनाचा खंबीरपणा अत्यंत दृढ होता यांत

शंका नाहीं. मनाला न पटणारी गोष्ट ते सहसा करीत नसत. म्हणूनच युरोपांतून जाऊन आल्यावर स्वजातीय समाज त्यांच्याविरुद्ध उठला तरी त्यांनीं आपल्या समाजाची पर्वा मुळींच केली नाहीं.

१९०० साल मोतीलाल यांच्या आयुष्यांत सर्वच दृष्टींनीं अपूर्व नि परमोत्कर्षाचें होय. त्यावेळीं ते संपत्तीच्या अन् वैभवाच्या शिखरावर होते. त्यांची राहणी एखाद्या नबाबाप्रमाणें होती. वकिलींतली मिळकत तर कुबेरानें हेवा करावी अशी होती. याच वेळीं त्यांच्या मनांत एक सुंदर स्वप्न घोळत होतें. स्वतःला राहण्यासाठीं एखादी आलीशान इमारत उठवावी हेंच तें स्वप्न! आणि अल्पावधींत त्यांनीं आपलें स्वप्न साकार केलें! व्हाईसरॉयनेंहि लाजावें असा भव्य प्रासाद त्यांनीं बांधला. त्या प्रासादाचें नांव होतें आनंदभवन.........!

* * *

: ३ :

# कुबेराचा कायापालट

मोतीलाल यांचा 'आनंदभवन' राजवाडा म्हणजे अलाहाबादचें भूषण होतें. या प्रासादाचें वैभव नि दिमाख तेव्हांच्या गव्हर्नर-व्हॉइसरॉय यांच्या इमारतींनाहि लाज-विणारा होता. मोतीलालजींची रसिकता, सौंदर्यदृष्टी, त्यांची खानदानी व ऐषआरामी राहणी यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे आनंदभवन वाडा होय.

पुढें हा वाडा मोतीलालनीं राष्ट्राला समर्पण केला असला तरी त्यावेळीं मोठमोठ्या राजेराजवाड्यांनीं देखील त्या प्रासादाचें ऐश्वर्य पाहून माना डोलविल्या. या वाड्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी केल्या होत्या. पोहण्यासाठीं दोन तलाव होते; एक बागेंत नि दुसरा घरांत. पलीकडे घोड्यांची पागा होती. त्यांत अनेक तऱ्हेचे घोडे होते. घरांत दोन मुदपाकखाने केलेले होते. एक हिंदु लोकासांठीं अन् एक मुसलमान पाहुण्यांसाठीं. या वाड्यावरून एक गोष्ट दिसून येते कीं, ऐन उमेदींत मोतीलाल मोठे विलासी अन् सुखोपभोगांचे निःस्सीम चाहते होते.

याच वर्षीं म्हणजे स. १९०० मध्यें जवाहरलालना बहिण लाभली. स्वरूपराणींच्या कन्यारत्नाचें नांव सरूप म्हणजे हल्लींच्या विजयालक्ष्मी पंडीत. आपले सर्व व्याप सांभाळून मोतीलाल आपल्या मुलाशीं—जवाहरलालशीं क्रिकेट व टेनिस खेळण्यासहि कमी करत नसत. पाहुण्यांची वर्दळ तर त्यांच्या घरांत नेहमींचीच असे. मोतीलाल त्यांची बडदास्त

फार चांगली ठेवीत. त्यांच्याशीं गप्पा मारतांना त्यांना फार आनंद होई. पाहुण्यांची नि मोतीलाल यांच्या मित्रांची गप्पांची मैफल भरलेली असली कीं जवाहरलाल हळूंच पडद्या आडून सर्व मंडळी काय करीत आहेत तें अगदीं उत्सुकतेनें पहात.

त्यावेळीं आपल्या वडिलांच्या संभाषणचातुर्यानें, त्यांच्या मजलेवारी हास्यानें अन् अपूर्व व्यक्तिमत्वानें जवाहरलाल खरोखरी भारावून जात. आपले वडिल फार हुशार नि निर्भय आहेत असें त्यांना वाटे. परंतु मुलाला वडिलांचें भय वाटे हें बरीक खरें. कारण मोतीलाल अतिशय रागीट होते. 'त्यांच्या इतका रागीट माणूस माझ्या पाहण्यांत नाहीं,' असें मत जवाहरलालनीं आपल्या आत्मचरित्रांत नमूद केलेलें आहे.

स. १९०२ मध्यें जवाहरलाल यांची मुंजहि मोतीलालनीं थाटांत केली. त्यावेळचें बटूच्या वेषांतलें जवाहरलाल यांचें छायाचित्र उपलब्ध आहे. तें पाहतांना मोठी मौज वाटते. नवीन विचाराचे असून नि परदेशगमनामुळें प्रायश्चिताचें 'प्रकरण' उद्भवलें असूनहि मुलाचें मौंजीबंधन विधिपूर्वक करून मोतीलालनीं कुळाचार पाळण्यांत मोठी समयसूचकता दाखविली.

मोतीलाल यांचा घरचा परिवार यावेळीं मोठा होता. घरगुती भांडणें निघालीं तर त्याचें खापर घरांतल्या बायकांच्या डोक्यावर फोडून सर्व भांडणें ते चुटकीसरशी नि खेळीमेळीनें सोडवीत. घरांतल्या धार्मिक व्रतवैकल्यांकडे त्यांचें विशेष लक्ष नसें. देवपूजा वगैरे गोष्टी हा खास स्त्रियांचा प्रांत आहे असें ते म्हणत. वृत्तीनें ते फारसे धार्मिक नसले तरी त्यांच्या अंतर्यामीं हिंदु धर्माबद्दल पूज्यबुद्धि होती. कांहीं काळ ते थिऑसफी पंथाचे सभासद होते. परंतु थोड्याच दिवसांत त्यांनीं त्या पंथाचें सदस्यत्व सोडलें. स. १९०३ च्या मुंबई कॉंग्रेसच्या आधिवेशनाला ते हजर होते. जवाहरलालहि त्यांच्याबरोबर होते.

मोतीलाल यांच्या मित्रपरिवारांत अनेक युरोपियन मंडळी होती. युरोपियन नि पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीबद्दल त्यांना मनांतून फार आदर वाटे. या सुमारास जवाहरलाल सोळा वर्षांचे झाले होते. तेव्हां मोतीलालनीं त्यांना इंग्लंडमधल्या सुप्रसिद्ध हॅरो या शाळेंत धाडण्याचा निश्चय केला. नंतर स. १९०५ मध्यें मे महिन्यांत मोतीलालनीं जवाहरलालना शिक्षणाकरितां इंग्लंडला धाडलें. त्यांच्याबरोबर मोतीलाल, स्वरूपराणी अन् धाकटी सरूप वगैरे मंडळी इंग्लंडला गेली होती.

स. १९०७ मध्यें संयुक्त प्रांताच्या पहिल्या राजकीय परिषदेचें अध्यक्षपद मोतीलालना देण्यांत आलें होतें. ते पुढें राजकारणाकडे कायमचे ओढले जातील अशी त्यावेळीं तरी कुणालाच कल्पना नव्हती. तरी त्यांच्या भावी राजकीय कार्याची नांदी या परिषदेमुळेंच झाली या वेळेपासून त्यांच्याभोंवतीं राजकारणाला उचित अन् पोषक असें वातावरण घुमूं लागलें. आणि मग ते आपला व्यवसाय सांभाळून राजकारणाविषयीं थोडीबहूत आस्था दाखवूं लागलें. पारतंत्र्यांत पडलेल्या आपल्या देशाच्या उद्धारार्थ कांहीं तरी कार्य केलें पाहिजे असें विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले होते.

स. १९०७ च्या सुरत कॉंग्रेसला मोतीलाल उपस्थित होते. त्यावेळीं ते लो. टिळकांच्या विरोधी पक्षाच्या म्हणजे नेमस्त पक्षाच्या बाजूचे होते. जरी त्यांच्या मताचा कल मवाळ पक्षाकडे होता व जहाल पक्षाबद्दल त्यांच्या मनांत फारसें ममत्व नव्हतें तरी लो. टिळकांबद्दल त्यांच्या मनांत आदर होता व ते टिळकांना मनापासून चाहत अशी ग्वाही जवाहरलालनीं आपल्या आत्मचरित्रांत दिलेली आहे. स्वतः मोतीलालनीं देखील "माझा व्यक्तिशः लोकमान्यांशीं संबंध फार थोडा आला असला तरी मी त्यांचा निःस्सीम चाहता होतों" अशी कबुली टिळकांसंबंधींच्या आठवणींत दिलेली आहे.

या सुमारास नोव्हेंबर स. १९०७ मध्यें स्वरूपराणींना एक मुलगी झाली. तिचें नांव कृष्णा. त्याच सध्यांच्या सौ. कृष्णा हाथिसिंग. यावेळीं मोतीलाल यांच्या आनंदभवनांत संपत्तीचा धूर निघत होता. तशांत मोतीलाल सामाजिक बाबतींत पुरोगामी नि पुढारलेले. तेव्हां अनेक थरांतल्या अन् विविध व्यवसायांतल्या पाहुण्यांची त्यांच्याकडे ये-जा असे. सुरत कॉंग्रेसच्या वखेड्यामुळें तत्कालीन विषयावर चर्चा करण्यासाठींहि अनेक लोक येत. त्यांत पत्रकारहि असत. उत्तम आर्थिक परिस्थिति, पैसे खर्च करण्याची अमर्याद हौस आणि आथित्याचा मोतीलालना अतिशय सोस असल्यानें विविध प्रकारच्या मंडळींनीं आनंदभवन सदा गजबजलेलें असें. घर असें भरलेलें असलें कीं मोतीलाल आनंदीं असत.

आपल्या व्यवसायांत मोतीलाल अंग मोडून काम करीत. खटला जिंकण्यासाठीं ते प्रयत्नांची शिकस्त करीत. वादपटुत्व, भाषाप्रभुत्व नि प्रतिपक्षाच्या वर्मावर अचूक घाव घालण्याची तल्लख नि कुशाग्र बुद्धिमत्ता त्यांचें ठायीं असल्यानें खटला जिंकण्यांत ते नेहमीं यशस्वी होत. त्यामुळें पक्षकारांची त्यांच्या घरीं एकच झुंबड उडे. एकंदरीत मोतीलाल यांच्या घरीं लक्ष्मी पाणी भरीत होती !

स. १९१२ मध्यें जवाहरलाल आपला शिक्षणक्रम संपवून भारतांत परत आले. ते बॅरिस्टरची परीक्षा देऊन आले असल्यानें कांहीं काळ त्यांनीं मोतीलालना त्यांच्या वकिलीच्या व्यवसायांत मदत केली. एका खटल्यांत जवाहरलालनीं वडिलांना इतकी उत्तम मदत केली कीं मोतीलाल अगदीं खूष झाले. जवाहरलालनीं खटल्यासाठीं तयार केलेली टीपणें त्यांना फार आवडली. त्या भरांत त्यांनीं जवाहरलालना दोन हजार रुपये, कामाचा मोबदला म्हणून देऊन टाकलें. मोतीलाल यांची गुणग्राहकता अशी होती ! मुलानें आपल्या धंद्यांत आपल्याप्रमाणें

नांव काढावें अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु जवाहरलालना मात्र वकिलीच्या व्यवसायाची फारशी आवड नव्हती.

स. १९१६ मध्यें मार्च महिन्यांत मोतीलालनीं जवाहरलालजींच्या लग्नाची मोठी धूम उडवून दिली. लग्न दिल्लीला झालें. पाहुण्यांची वर्दळ नि गर्दी तर पुसूंच नका. आपलें सर्व ऐश्वर्य मोठ्या दिमाखानें मोतीलालनीं पाहुणेमंडळींच्या निदर्शनास आणण्यास कमी केलें नाहीं. आधींच ते मोठे हौशी नि षौकीन; व लग्नहि त्यांच्या आवडत्या नि एकुलत्या एक मुलाचें; तेव्हां काय थाट उडाला असेल त्याची नुसती कल्पनाच केलेली बरी !

मोतीलाल यांच्या घरीं कमतरता अन् वाण कशालाच नव्हती. घोडे होते व घोड्यांच्या गाड्याहि होत्या. शिकारीचा नाद असल्यानें अनेक जातीचे कुत्रे त्यांच्या पदरीं होते. जोडीला मोटारीहि त्यांच्या संपत्तीची शोभा वाढवीत होत्या. अशा या ऐश्वर्यसंपन्न मोतीलालजींच्या घरचें कार्य–म्हणजे आपल्या सांप्रतच्या पंतप्रधानांचें लग्न - थाटामाटानें, अपूर्व रोषणाईनें अन् विविध सोहळ्यांनीं झालें असेल यांत शंका नाहीं. तीनशें पाहुण्यांसाठीं खास गाडीची सोय मोतीलालनीं केली होती. आणि दिल्ली येथें जानोसा होता त्या ठिकाणीं पाहुण्यांचा मोठा तळ पडला होता.

मोतीलाल यांची सूनहि कशी अगदीं नक्षत्रासारखी सुंदर होती ! जवाहरलालजींची पत्नी कौल घराण्यांतली–कमला. मोतीलाल यांचे व्याही धनाढ्य व्यापारी असून काश्मिरीच होते. त्यांच्या मुलीला–कमलेला, स्वरूपराणींनीं एका मेजवानीच्या वेळीं सहज पाहिली. ती त्यांच्या मनांत इतकी भरली कीं त्यांनीं तिला सून करून घेण्याची खूणगांठ आपल्या मनाशीं बांधली. आणि अशा रीतीनें वसंत पंचमीच्या सुमुहूर्तावर स. १९१६ रोजीं मार्च महिन्यांत कमला, जवाहरलाल यांची पत्नी नि मोतीलाल–स्वरूपराणी यांची सून झाली.

जवाहरलाल यांच्या सारखा सुपुत्र, कमला सारखी सुस्वरुप सून, स्वरुपराणीं सारखी कर्तव्यदक्ष पत्नी अन् हाताशीं भरपूर पैसा असल्या-मुळें मोतीलाल यांचें जीवन अतिशय सुखी होतें. घरांतल्या खोल्या शान-दार पर्शियन गालीच्यांनीं मढविलेल्या होत्या. चांदीच्या भांड्यांना तर सुमारच नव्हता. हरतऱ्हेचीं नि विविध प्रकारचीं कांचेचीं भांडींहि सुकाळाचीं होतीं. सगळ्या मंडळींच्या तैनातीसाठीं नि सरबराईसाठीं असंख्य नोकर हंसतमुखानें घरांत राबत होते. कारण मोतीलालसारखा सढळ हाताचा प्रेमळ मालक त्यांना लाभलेला होता.

सुख येऊं लागलें कीं दाही दिशांनीं येऊं लागतें असें म्हणतात. मोतीलाल यांचें तसेंच झालें. दि. १९-नोव्हेंबर १९१७ रोजीं जवाहरलाल यांच्या पत्नींना कन्यारत्न झालें. मुलीचें नांव प्रियदर्शिनी. ही मुलगी म्हणजे आजच्या श्रीमती इंदिरा गांधी. मोतीलाल आजोबा झाल्यानें त्यांच्या आनंदाला अन् सुखाला धरबंद राहिला नव्हता. नात प्रियदर्शनी, त्यांची अतिशय लाडकी बनली. इतकी कीं जवाहरलाल यांच्या भगिनींनीं देखील तिचा हेवा करावा.

मोतीलाल यांचें आतांपर्यंतचें जीवन सुखासीन होतें. प्रपंच, पैसा नि ऐहिक सुखोपभोग या तीन गोष्टींच्याबाहेर त्यांची दृष्टी गेलेली नव्हती. त्यांचा बहुतेक वेळ वकिलीच्या व्यवसायांत जात असे. घर, कुटुंब, कोर्ट नि ख्यालीखुशाली हेंच जणूं त्यांचें विश्व होतें. परंतु कांहीं माणसे अशी असतात कीं एखाद्या प्रसंगानें अगर अन्यायानें त्यांचें संपूर्ण जीवन पालटून जातें. मोतीलाल यांचें असेंच झालें. देशांतील परिस्थितीनें त्यांच्या जीवनाला निराळें वळण लावलें. पारतंत्र्यांत असलेल्या आपल्या देशाच्या उद्धारासाठीं अलाहाबादच्या या प्रख्यात कायदेपंडितानें सर्व सुखोपभोग बाजूला सारून फकिरी जीवन पत्करलें! कायदेपंडित कुबेराचा काया-पालट झाला...अन् पंडित मोतीलाल भारताचे पुढारी झाले!!!

: ४ :

# काँग्रेसचें अध्यक्षपद

स. १९०७ च्या सुरत काँग्रेसला मोतीलाल उपस्थित होते हें मागें सांगितलेंच. त्याचवर्षी संयुक्त प्रांताच्या एका परिषदेचे ते अध्यक्षहि झाले. ही परिषद अलाहाबादला झाली. त्यावेळीं ते मवाळ वृत्तीचे होते. ब्रिटिश न्यायदेवतेवर त्यांचा अढळ विश्वास होता. त्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं उद्गार काढले ते असे : " ब्रिटिश राजवट करते तें ठीकच आहे. वाईट करण्याकडे त्या राजवटीची प्रवृत्ती नाहीं. " त्यांच्या या उद्गारांवरून त्यांच्या मनाचा कल कुठें झुकत होता याची कल्पना यावी. या आधीं एका लेखाद्वारें जहाल पक्षावर कडकडीत टीकाहि त्यांनी केली होती. ही टीका इंग्लंडमध्यें शिक्षण घेत असलेल्या जवाहरलालनीं वाचल्यावर त्यांना फार राग आला व त्या भरांत त्यांनीं आपल्या वडिलांना पत्र लिहिलें तें असें : " तुमच्या अशा दृष्टिकोनामुळें ब्रिटिश सरकारला फार आनंद होईल ! ! " मुलाची ही मल्लिनाथी वाचून मोतीलाल फार गरम झाले. जमदग्निच ते ! त्या भरांत मुलाचें शिक्षण बंद करण्याचा विचारहि त्यांच्या मनांत उद्भवला. परंतू प्रेमानें त्यांच्या रागावर मात केली अन् जवाहरलालजींच्या शिक्षणांत खंड पडला नाहीं. त्यावेळचे मोतीलाल असे होते ! या वेळीं राजकारणांत त्यांचा ओढा जहाल पक्षापेक्षां सर सुरेंद्रनाथ बानर्जी, सर फेरोजशाहा मेथा, गोपाळ कृष्ण गोखले या नेमस्त प्रभावळीकडे अधिक होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

स. १९०९ मध्यें मोर्ले-मिंटो सुधारणा अस्तित्वांत आल्यावर त्याच वर्षी मोतीलाल संयुक्त प्रांताच्या कायदेमंडळाचे सभासद झाले. स. १९१९ पर्यंत ते त्या स्थानावर होते. त्या काळांतली त्यांची कामगिरी वाखाणण्यासारखी झाली. सरकारच्या कृत्यांचा धिःकार करून सभागृहाचा त्याग करण्याचा पायंडा मोतीलालनीं पाडला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं ते स्वतंत्र वृत्तीचे होते नि सरकारच्या कारभारावर ते कडाडून हल्ला करण्यास कचरत नसत. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं संयुक्त प्रांतांतल्या भारतीय पलटणीच्या संघटनेसाठीं त्यांनीं सरकारशीं सहकार्यहि केलें होतें. परंतु बंगालची फाळणी, क्रांतिकारकांचे उठाव व त्यांना झालेल्या शिक्षा अशा घटना घडत गेल्यामुळें मोतीलाल यांचा नेमस्त दृष्टीकोण साफ पालटला.

स. १९१६ च्या सुमारास डॉ. ॲनी बेझंट व लो. टिळक यांनीं होमरूल चळवळीचें शिंग फुंकलें. ही चळवळ सरकारच्या डोळ्यांत खुपूं लागली. त्या भरांत सरकारनें डॉ. बेझंटबाईंना अटक केली. या होमरूल चळवळीकडे मोतीलाल आकृष्ट झालेले होते. त्यांचा मूळचा पिंड नेमस्त पक्षाच्या प्रभावळींतला. परंतु होमरूल चळवळीनें पंडितजींचें मतपरिवर्तन झालें अन् त्यांना जहाल राजकारणाकडे वळण्याची स्फूर्ति झाली. सरकारच्या दडपशाहीमुळें त्यांच्या अंगांत दुप्पट उत्साह संचारला. जून १९१७ रोजीं संयुक्त प्रांतांतल्या होमरूल शाखेच्या अध्यक्षपदावर त्यांची योजना झाली. तेव्हां त्यांनीं या चळवळीसाठीं इतक्या धडाडीनें काम करण्यास सुरुवात केली कीं स. १९१८ मध्यें अलाहाबाद येथें भरलेल्या होमरूलच्या खास अधिवेशनाचें अध्यक्षपदहि त्यांना दिलें गेलें. आपल्या भाषणांत त्यांनीं सरकारच्या दडपशाहीचा खरपूस समाचार घेतला. त्यांचें भाषण इतकें संस्मरणीय झालें कीं ‘ पायोनियर ’ नांवाच्या वृत्तपत्रानें ‘ ब्रिगेडियर जनरल ऑफ दी होमरूल लीग ’ अशी पदवी त्यांना बहाल केली. या नंतर पंजाबचें रणकुंड पेटलें नि त्यामुळें मोतीलाल यांचें

नांव पहिल्या प्रतीचे पुढारी म्हणून हिंदुस्थानांत फडकलें. या पंजाब प्रकरणानें त्यांचें जीवन साफ बदलून गेलें व नंतर त्यांनीं राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली.

मोतीलाल ' लीडर ' या नेमस्त पत्राच्या संचालक मंडळांत होते. परंतु आतां त्यांचीं मतें पालटलीं असल्यानें त्यांनीं त्या पत्राच्या संचालक मंडळांतून आपलें नांव काढून घेतलें आणि स. १९१९ मध्यें ' इन्डिपेन्डन्ट ' या नांवाचें स्वतःच्या मालकीचें इंग्रजी पत्र त्यांनीं सुरू केलें. त्यांनीं आपल्या पहिल्याच अंकांत काढलेले उद्गार आज घडीलाहि चिंतनीय ठरावेत. " अंधारांतील कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणून, त्यांची शोभा करावयास हें पत्र मागेंपुढें पहाणार नाहीं. सदसद्विवेकबुद्धीला पटलेले विचार स्पष्ट व निर्भिड भाषेंत मांडण्याला तें कचरणार नाहीं. प्रेसिडेंट विलसनचें खालील वाक्य ' इन्डिपेन्डेन्ट ' पत्र आपल्या डोळ्यापुढें ठेवील.

" The select classes of mankind are no longer the Governors of mankind. The fortunes of mankind are now in the hands of the plain people of the whole world. "

" मानव जातीचें भवितव्य आतां विशिष्ट नि वरच्या थराच्या हातांत राहणार नाहीं. मानव जातीची सूत्रें आतां जगांतल्या सामान्य लोकांच्याच हातांत राहतील. "

परंतु इतकें करूनहि या पत्राचा आर्थिक व्यवहार आंतबट्ट्याचाच ठरला. बरीचशी आर्थिक झीज या पत्रापायीं मोतीलालना सोसावी लागली. या पत्राच्या संचालक मंडळांत जवाहरलालहि होते. कित्येक दिवस त्यांनीं मुख्य संपादक म्हणूनहि काम केलें. परंतु पुढें पंजाब प्रकरण, असहकारितेची चळवळ, पिता-पुत्रांचा तुरुंगवास वगैरे घटना घडून आल्यामुळें स. १९२३ मध्यें हें पत्र बंद पडलें.

त्या सुमारास म्हणजे स. १९१७ मध्यें लखनौ येथें संयुक्त प्रांताची एक परिषद भरली होती. मोतीलाल त्यावेळीं त्या परिषदेचे अध्यक्ष होते.

त्यावेळीं सरकारकडून होणाऱ्या जुलुमांचें वर्णन त्यांनीं प्रभावीपणें केलें. परंतु बोलण्याच्या ओघांत त्यांच्या मूळच्या नेमस्त विचारांचा पगडा त्यांच्या भाषणावर बसला नि ते सहज म्हणाले, " इंग्लंडमधल्या इंग्लिश लोकांच्या न्यायी वृत्तीवर आपण विश्वास ठेवावयास हवा; कारण आपलें भवितव्य त्यांच्याच हातांत आहे. " हे उद्गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडतांच श्रोतृवृंदातून एक प्रश्न तीरासारखा त्यांच्या कानावर आला. तो आवाज होता त्यांच्या आवडत्या पुत्राचा–जवाहरलाल यांचा. ' आपलें भवितव्य त्यांच्या हातांत आहे ' या मोतीलाल यांच्या वाक्याच्या अनुरोधानें जवाहरलाल ताडकन् उद्गारले होते कीं ' हा एक प्रश्नच आहे. ' मुलाच्या सरबत्तीनें मोतीलाल क्षणभर गोंधळले. परंतु नंतर त्यांनीं स्वतःला सांवरले नि रागानें ते म्हणाले, " अशी शंका घेण्याची कुणाची छाती आहे ? " या त्यांच्या सवालाला, "अलबत हा एक प्रश्नच आहे," असा रोकडा जबाब जवाहरलालनीं दिला. तेव्हां मोतीलाल खवळले नि त्या आवेशांत ते म्हणाले, " वडिलांस शहाणपण शिकवूं पाहणाऱ्या या धाडशी युवकानें पुढें येऊन माझें विधान अवश्य खोडून टाकावें. " त्यांच्या या प्रश्नाला जवाहरलालनीं प्रत्युत्तर देण्याचें टाळलें. राजकारणाच्या आखाड्यांत या पितापुत्रांची पहिली खणाखणी झाली ती अशी. त्यावेळीं लोकांना जवाहरलालजींच्या धैर्याचें फार आश्चर्य वाटलें.

स. १९१९ पासून पंडित मोतीलाल यांच्या जीवनांतल्या दुसऱ्या कालखंडाला सुरुवात झाली. नंतर जवळ जवळ एक तप भारतीय राज-राजकारणांत त्यांचें नांव एकसारखें दुमदुमत होतें. त्यावर्षीं अमृतसर येथें जालियनवाला बागेंत मोठें हत्याकांड झालें. त्या हत्याकांडाची चौकशी करण्यास मोतीलाल मोठ्या धैर्यानें पुढें आले. त्या प्रकरणाची पार्श्वभूमि नि हकिगत सविस्तरपणें सांगावयास हवी.

स. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं पहिलें महायुद्ध संपून त्यांत दोस्त

राष्ट्रांचा विजय झाला. या विजयाचे पडसाद भारतांत निराळ्या तऱ्हेनें उमटलें. युद्धकाळांत जारी असलेल्या डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टची मुदत युद्ध संपल्यानंतर सहा महिन्यांनीं संपणार होती. परन्तु क्रान्तिकारक चळवळींचा बिमोड करण्यासाठीं ह्या ॲक्टमधील अधिकार सरकार आपल्या हातांत तसेंच ठेवणार होते. त्या दृष्टीनें सरकारनें एक चौकशी मंडळ नेमलें होतें. त्या मंडळाचा अध्यक्ष सर सिडने रौलेट हा होता. या बाबतींत जी चौकशी कमिटी नेमली त्या कमिटीनें दोन बिलें वरिष्ठ कौन्सिलांत आणलीं. पहिलें बिल हिंदुस्थान सरकारनें दि. १ फेब्रुवारी १९१९ रोजीं मध्यवर्ति कौन्सिलपुढें आणलें. दि. ५ फेब्रुवारी स.१९१९ रोजीं दिल्ली येथील कौन्सिलच्या सभेंत व्हाईसरॉयच्या भाषणानंतर सर विल्यम व्हिन्सेंट यांनीं दडपशाहीचीं दोन बिलें प्रविष्ट केलीं. त्या बिलांना लोकांकडून ‘Black Bills’ असें तुच्छतादर्शक नांव मिळालें होतें. या बिलांनाच रौलेट ॲक्ट म्हणतात. या बिलाला विरोध करणारे पहिले बिनसरकारी सभासद श्री. विठ्ठलभाई पटेल होते. रौलेट बिलावर ज्या दिवशीं वादविवाद होणार होता त्या दिवशीं गांधीजी देखील मध्यवर्ति कायदेमंडळाच्या बैठकीला उपस्थित होते. गांधीजींचा कायदेमंडळाशीं संबंध आला तो पहिलाच म्हटला पाहिजे. व तो शेवटचाच हें देखील विशेष होय. पहिल्या बिलानें व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येणार होता; जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा येणार होती. पहिल्या बिलांतलीं कलमें अशीं :—(१) अराजक गुन्हेगारांची चौकशी हायकोर्टाच्या तीन न्यायाधिशांसमोर तावडतोब करावी. (२) या कोर्टाविरुद्ध अपील करण्याचा हक्क नसावा. (३) बादशहाविरुद्ध गुन्हा करण्याचा संशय आलेल्या इसमांकडून जामीन घेण्यांत यावा. (४) त्यांना एखाद्या विवक्षित स्थळीं रहाण्यास लावावें. (५) सार्वजनिक सुरक्षिततेला बाध येईल अशा कृत्यांशीं संबंध असलेल्यांना पकडण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य

संस्थांना द्यावा. (६) भयंकर कृत्यें करणाऱ्या इसमाला तुरुंगांत डांबावें. इत्यादि अधिकारांचा समावेश पहिल्या बिलांत केलेला होता.

दुसरें बिल गाळून टाकण्यांत येऊन पहिलें बिल मांडण्यांत आलें. या बिलाला श्री. विठ्ठलभाई पटेलांनी कसून विरोध केला. त्या वेळी ते म्हणाले. "मी हें चक्क सांगतो कीं सारा देश या बिलाच्या पूर्णपणें विरुद्ध आहे. .......हें बिल पास झालें तर देशांत भयंकर व अभूतपूर्व खळबळ उडाल्याशिवाय राहाणार नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे." परंतु अखेर सरकारनें बहुमताच्या जोरावर हें बिल पास करून घेऊन दि. १८ मार्च १९१९ रोजीं त्यावर कायदा म्हणून शिक्कामोर्तब केलें.

या बिलाला विरोध म्हणून म. गांधींनीं सार्वत्रिक हरताळ पाडण्याची योजना आखली. सार्वत्रिक हरताळाकरितां दि. ६ एप्रिल हा दिवस ठरविण्यांत आला. परंतु दिल्ली येथें चुकून दि. ३० मार्च रोजींच हरताळ पाळला गेला. त्यावेळीं स्वामी श्रद्धानंद स्वामींनीं अफाट जनसमुदायासमोर भाषण केलें. त्या दिवशीं सभेहून परत येत असतांना स्वामी श्रद्धानंद यांच्यावर गुरखा शिपायांनीं बंदुका रोखल्या. तेव्हां त्या धीरोदात्त स्वामींनीं जबाब दिला तो असा– "हा मी उभा आहे. तुम्हांला गोळी घालावयाची असल्यास खुशाल घाला!" तेव्हां शिपाई नरमले. सभेनंतर काढण्यांत आलेल्या मिरवणुकीवर पोलिसांनीं गोळीबार केला नि त्यांत बरीच प्राणहानी झाली. पंजाब प्रकरणाची ही नांदी होती.

सर्वांत मोठी प्रतिक्रिया अमृतसर येथें झाली. तेथील लोकांनीं रौलेट ॲक्टाच्या निषेधार्थ कांहीं करावयाचे बाकी ठेवलें नाहीं. दि. ६ एप्रिलला पंजाबमध्यें हरताळ पार पडला तो शांततापूर्वक. दि. १० एप्रिलला डॉ. सत्यपाल व डॉ. किचलू या तेथील दोन पुढाऱ्यांना संरक्षण कायद्याखालीं अटक करण्यात आली. हें वृत्त अमृतसर शहरांत लागलीच पसरलें. हरताळ घोषित करण्यांत येऊन पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करण्या-

साठीं डे. कमिशनरच्या निवासस्थानाकडे लोकांनीं एक मिरवणूक काढली. त्यावेळीं पोलीसांनीं गोळीबार केला व त्यांत अनेक लोक प्राणास मुकले. या प्रकारानें लोक बिथरले व त्यांनीं आपल्या क्रोधाग्नीच्या भरांत पांच सहा इंग्लिश माणसांचे खून केले नि कांहीं इमारतींना आगी लावून दिल्या. तेव्हां सरकारनें तिथें मॉर्शल लॉ पुकारला.

दि. ११ एप्रिल रोजीं जनरल डायरचें शहरांत आगमन झालें. दि. १२ ला डायर अमृतसरच्या रामबागेंत ठाण मांडून बसला. दि.१३ एप्रिलला डायरनें एक जाहिरनामा काढला. त्या जाहिरनाम्यांतल्या कलमांप्रमाणें शहरांत अगर उपनगरांत कुटल्याहि रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणीं चार माणसांना एकत्र जमण्यास बंदी करण्यांत आली होती. या फर्मानामुळें लोक आणखी बिथरले. त्याच दिवशीं संध्याकाळीं ४–४॥ चे सुमारास जालीयनवाला बागेंत जाहीर सभा घेण्याचा विचार स्थानिक पुढाऱ्यांनीं केला. ठरल्याप्रमाणें सभा झाली नि नंतर जालीयनवाला बागेंतला तो भयंकर प्रकार घडला.

सुमारें पांचच्या सुमारास जनरल डायर आपल्या बरोबर २५ गुरखे, २५ शीख नि चाळीस फौजबंद पठाण घेऊन आला. त्याच्या बरोबर बंदुकींनीं भरलेल्या दोन मोटारीहि होत्या. लागलींच त्यानें निर्दयपणें गोळीबारास सुरुवात केली. ही घटना दि. १३ एप्रिल १९१९ रोजीं घडली. एखाद्या पिसाटासारखा डायरनें आपल्या शिपायांकरवीं निर्दयपणें गोळीबार करविला. या क्रूर कत्तलीत ३७९ लोक मृत्युमुखीं पडले नि सुमारें १२०० जण जखमी झालें. या कत्तलीचें ‘ घुशीचा सांपळा ’ असें वर्णन ‘ केसरी ’ नें केलें होते.

पंजाबातील या अत्याचारामुळें भारतांत सर्वत्र संतापाची एकच लाट उसळली. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कवी रवींद्रनाथ टागोर यांनीं आपली

'सर' पदवी दि. ३० मे रोजीं सरकारला परत केली नि लिहिलें, "पंजाबमधील आमच्या देशबांधवांना सरकारनें अमानुषपणें वागविलें. अशा परिस्थितींत या सरकारनें दिलेला किताब वापरण्यांत मला भूषण तर वाटत नाहींच पण उलट लाज मात्र वाटते. तेव्हां सरकारनें मला दिलेली 'सर' ही पदवी मी सरकारकडे परत करीत आहे."

दि. ८ जूनला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक अलाहाबादला भरली. त्यानंतर पंजाब प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं स्वामी श्रद्धानंद, मोतीलाल नि मालवीय प्रभृतींना जुलै महिन्यांत पंजाबला धाडण्यांत आले. सरकारनेंहि एक चौकशी मंडळ नेमलें. त्या मंडळाचा अध्यक्ष होता लॉर्ड हंटर. काँग्रेसनें ह्या हंटर कमिटीशीं मुळींच सहकार्य केलें नाहीं. काँग्रेसनें आपलें खास चौकशी मंडळ स्थापन केलें. महात्मा गांधी, मोतीलाल, दासबाबू, तय्यबजी नि जयकर अशी मंडळी त्या खास कमिटींत होती. त्यावेळीं मोतीलालनीं बजावलेल्या कामगिरीला तोड नाहीं. आपल्या हजारों रुपयांच्या वकिलीच्या व्यवसायाकडे दुर्लक्ष करून त्यांनीं आपला सर्व वेळ या चौकशीसाठीं वेंचला. त्यांनीं दिवस पाहिला नाहीं, कीं रात्र पाहिली नाहीं. एखाद्या यंत्राप्रमाणें सतत चोवीस तास ते या कामासाठीं राबले. त्यावेळीं आपल्या वकिली बाण्याला साजेल अशा धैर्यानें त्यांनीं चौकशीचें अवघड कार्य करून पंजाबांतील जनतेचाच नव्हें तर सबंध हिंदुस्थानांतल्या जनतेचा दुवा मिळविला.

मोतीलालजींच्या या अद्वितीय कार्यामुळें लोकांचे डोळे दिपले. जनतेला त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची नि कार्यतत्परतेची खात्री पटली. त्यांच्या या उज्ज्वल कामगिरीचें लोकांनीं अतिशय योग्य प्रकारें चीज केलें. अमृतसर येथें भरलेल्या ३४ व्या काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मानाचा मुकुट त्यांच्या शिरोभागीं ठेवण्यांत आला. काँग्रेसचें हें अधिवेशन दि. २७ डिसेंबर १९१९ रोजीं अमृतसरला झालें. या काँग्रेससाठीं मुंबई-

हून खास गाडी ठेवण्यांत आली होती. लो. टिळकहि या अधिवेशनाला उपस्थित होतें. त्यावेळीं स्वागत मंडळाचे अध्यक्ष स्वामी श्रद्धानंद होते. त्यांचें पहिलेंच वाक्य श्रोत्यांचें अंतःकरण कापीत गेलें. ते म्हणाले, " या महासभेच्या शृंगारलेल्या व्यासपीठावर उभा राहून एक संन्याशी प्रतिनिधींचें स्वागत करीत आहे. हा या सभेच्या इतिहासांतील पहिलाच प्रसंग होय. "

नंतर मोतीलाल यांचें भाषण झालें. तें भाषण छापील ३८ पानें होतें. त्यांच्या भाषणांतल्या प्रत्येक पानावर पंजाबांतल्या लोकांचें अंतःकरणच जणूं उमटलेलें होतें. त्यावेळीं मोतीलाल म्हणाले, " आपल्या हजारों देशबांधवांची ज्या अमानुष प्रकारांनीं कत्तल करण्यांत आली त्याबद्दलचा शोकक्षोभ व्यक्त करण्यासाठीं आपण सर्व येथें जमलों आहोंत. पंजाबी लोकांच्या जिव्हाळ्याच्या नात्यानें तुम्हीं मला हें अध्यक्षपद देऊन माझ्यावर मोठीच जबाबदारी टाकलेली आहे.... ....जुलुमी कायद्याचे पाय तोडणें म्हणजेच निःशस्त्र प्रतिकार होय. आपण जर खरे सत्याग्रही होणार नाहीं तर आपल्याला स्वातंत्र्य संपादन करतां येणार नाहीं. आणि यदाकदाचित् जरी आलें तरी आपण त्याला नालायक ठरूं ! "

मोतीलाल यांच्या अध्यक्षीय भाषणाचा अलपसा भाग येथें दिला. त्यांचें संपूर्ण भाषण अतिशय प्रभावी व जनतेच्या दुःखाला वाचा फोडणारें असें झालें. अशा रीतीनें राजकारणांतली त्यांची पहिली उडी यशस्वी झाली. कारण राजकारणांत पडल्यानंतर, अवघ्या दोन अडीच वर्षांतच कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचीं बहुमोल वस्त्रें राष्ट्रानें त्यांना अर्पण केलीं. अर्थात्च जनतेचीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगण्यासाठीं, लोकांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल सरकारला जाब विचारण्यासाठीं नि देशाला स्वतंत्रता लाभावी म्हणून कायदेपंडित मोतीलाल भारतांतले प्रथम श्रेणीचे पुढारी बनले ! ! !

* * *

: ५ :

# जेलयात्रा

स. १९२० मध्यें म. गांधींच्या सुप्रसिद्ध असहकारितेच्या चळवळीस आरंभ झाला. सुरुवातीला मोतीलाल या चळवळीविषयीं साशंक होते. या चळवळींत आपल्या मुलानें तुरुंगांत जाणें, मोतीलालना मुळींच पसंत नव्हतें. प्रथम प्रथम त्यांच्या जवाहरलालजींशीं शाब्दिक चकमकीहि उडाल्या. एकदां त्यांचें माथें अितकें भडकलें कीं त्यांनीं मुलाला घरांतून चालता होण्याची आज्ञा फर्मावली. परंतु त्यांचें जवाहरलालजींवर अतिशय प्रेम असल्यानें या प्रकरणीं उभयतांत समझोता घडून आला.

नंतर मोतीलाल गांधीच्या या चळवळींत समरसच नव्हे तर सामीलहि झालें. म. गांधींच्या व्यक्तिमत्वानें ते पुढें इतके भारले गेलें कीं, त्यांनीं गांधींच्या राजकारणांत त्यांच्या खांद्याशीं खांदा लावून लढाऊ राजकारणांत भाग घेण्यास सुरुवात केली. पुढें एकटें मोतीलालच नव्हे तर सर्वच्या सर्व नेहरू कुटुंब राष्ट्रसेवेसाठीं सिद्ध झाले. असहकारितेच्या चळवळीच्या तत्वानुसार त्यांनीं आपल्या वकिलीच्या धंद्याला कायमचा रामराम ठोकला. विदेशी वस्तु वापरण्याचें त्यांनीं अजिबात बंद केलें. उंचीं वस्त्रें जाऊन त्या ऐवजीं त्यांच्या अंगावर खादीचीं वस्त्रें झळकूं लागलीं. आपल्या अनेक युरोपियन स्नेह्यांचे संबंध त्यांनीं तोडून टाकले. एवढेंच नव्हे तर मुलगी कृष्णा, इंग्लिश शाळेंत जात असे तिलाहि त्यांनीं

त्या शाळेंत जाण्याची बंदी केली. असहकारितेच्या चळवळीवर त्यांची पक्की श्रद्धा वसल्यानंतर तिच्यापासून ते रतिमात्रहि ढळले नाहींत.

साठीच्या घरांत असतांना गजान्त लक्ष्मीकडे पाठ फिरवायची म्हणजे किती कठीण कर्म होतें ! परंतु मोतीलाल यांचें मनोधैर्य दांडगें होतें. व्यवसाय सोडल्यानंतर अनेक श्रीमंत पक्षकार खटला हातांत घेण्यासाठीं विनंती करून, आपल्या पैशाच्या थैल्या त्यांच्यापुढें मोकळ्या करूं लागले. परंतु मोतीलालनीं सर्वांना नकार देऊन वाटेस लावले. त्यांचें मोठेपण तें हेंच होय. पूर्ववयांत संपत्तींत लोळलेल्या इसमाला, उतार वयांत संपत्तींचा त्याग करणें सहसा शक्य नसतें. परंतु मोतीलालनीं ती कठीण किमया करून दाखविली आणि म्हणूनच त्यांना ‘ त्यागमूर्ति मोतीलाल ’ म्हणतात तें योग्य होय.

गांधीजींच्या ‘ यंग इंडिया ’ पत्रांत, “ मी आज ३७ वर्षे वकिली करीत आहे आणि माझ्या अनुभवास असें आलें आहे कीं, दिवसेंदिवस हा धंदा नैतिकदृष्ट्या खालावत चालला आहे. नांवलौकिकास चढलेल्या वकिलांनीं व्यापारी धोरणावर जबर फी आकारण्यास सुरवात केल्यामुळें ह्या धंद्याचा उच्चपणा नाहींसा होत चालला आहे आणि म्हणूनच ‘ अदालतमें जो जिता सो हरा, जो हरा सो मरा ’ अशी मार्मिक हिंदी म्हण प्रचारांत आली आहे. ज्यांचा असहकारितेवर विश्वास आहे, त्यांनीं आपली वकिली ताबडतोब सोडून राष्ट्रकार्याला येऊन मिळावें, अशी माझी त्यांना विनंती आहे. ” असें उद्गार मोतीलालनीं काढलें होतें. ज्या असहकारितेच्या चळवळीसाठीं त्यांनीं वकिली सोडली त्या चळवळीसाठीं गांधींनीं केलेलीं कलमें होतीं तीं अशीं :—

( १ ) किताब नि पदव्या ( Titles ) यांचा त्याग करणें.

( २ ) सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार टाकणें.

( ३ ) शाळा-कॉलेजांवर बहिष्कार टाकणें.

( ४ ) हायकोर्टावर बहिष्कार घालणें.

( ५ ) कायदेमंडळांवर बहिष्कार टाकणें.

( ६ ) परदेशी कापडांवरहि बहिष्कार टाकणें.

मोतीलाल यांच्या बरोबरच चित्तरंजनदास, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद नि राजगोपालाचारी ह्यांनींहि आपल्या वकिलीच्या व्यवसायावर पाणी सोडलें. या चळवळींत मुलाला तुरुंगवास घडणार तेव्हां तुरुंगांत त्याची कशी अवस्था होईल त्याचा अनुभव घेण्यासाठीं मोतीलाल जमिनीवर झोपून पहात असत. जवाहरलाल यांच्यावर त्यांचें प्रेम किती गाढ होतें याची कल्पना या प्रसंगावरून यावी.

या सुमारास दि. १० मे १९२१ रोजीं मोतीलाल यांची मोठी मुलगी सरूप हिचें अलाहाबाद येथें रणजित पंडीत यांच्याशीं लग्न झालें. पंडीत हे महाराष्ट्रीय होते.

दि. ३ नोव्हेंबर १९२१ रोजीं मुंबईला कॉंग्रेस कार्यकारिणीनें कॉंग्रेस कमिट्यांना चळवळीसाठीं स्वंयसेवक जमा करण्याचा आदेश दिला. नोव्हेंबरच्या अखेरीस बंगाल नि संयुक्त प्रांतांतलीं स्वयंसेवक दलें बेकायदेशीर ठरविण्यांत आलीं. यावेळीं बंगालचे थोर पुढारी नि मोतीलाल यांचे परम स्नेही चित्तरंजनदास यांनीं गर्जना केली ती अशी, “ माझें हात नि शरीर साखळदंडांनीं बांधलें आहे असेंच मला वाटतें. सबंध हिंदुस्थान देशच बंधनावस्थेंत खितपत पडलेला आहे. हा हिंदुस्थान हाच एक मोठा तुरुंग आहे. तेव्हां मला तुरुंगांत नेलें काय अगर बाहेर ठेवलें काय, त्याची फिकीर मला मुळींच नाहीं. अर्थात् मी जिवंत असलो अगर मृत्यूच्या आधीन झालों तरी त्यांत विशेष फरक तो काय असणार ? ” सरकारच्या या दडपशाहीच्या धोरणाचें आव्हान कॉंग्रेसनें स्वीकारलें

आणि तिनें सरकारची पर्वा न करतां स्वयंसेवक दलें उभारण्यास सुरुवात केली. पहिली तुकडी मोतीलाल यांच्या अधिपत्याखालीं उभारली गेली. त्याचा परिणाम म्हणजे दि. ६ डिसेंबर १९२१ रोजीं अलाहाबादला आनंदभवनांत मोतीलाल नि जवाहरलाल या उभयतांना सरकारनें अटक केली.

मोतीलाल हे कॉंग्रेस स्वयंसेवकदल या बेकायदा संघटनेचे सदस्य आहेत असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आला. जवाहरलाल यांच्यावर हरताळाचीं पत्रकें वांटण्याचा आरोप सरकारनें ठेवला. मोतीलालना सहा महिन्यांची शिक्षा झाली. परंतु जवाहरलाल यांच्यावरील आरोप तेव्हांच्या कायद्यान्वयें फोल ठरल्यानें तीन महिन्यांनीं त्यांची मुक्तता करण्यांत आली. धनाच्या राशीवर लोळणारे मोतीलाल, अशा रीतीनें राष्ट्रकार्यासाठीं तुरुंगांत गेले. त्यानंतर चित्तरंजनदास तुरुंगांत गेले व नंतर लवकरच देशांतल्या अनेक बुद्धिमान तरुण-वृद्धांनीं देशांतले तुरुंग तुडूंब भरून टाकले.

मोतीलालना अटक झाल्यावर “ पंडितजींना अटक होईल, अशी माझी कल्पना नव्हती. ‘ तुम्हांला इतक्यांत कोणी पकडणार नाहीं ’ असे मी पंडितजींना नेहमीं म्हणत असे. सर हारकोर्ट बटलरनीं एवढा हिय्या करून पंडितजींना पकडावें ही आश्चर्याचीच गोष्ट आहे. पंडितजी निरनिराळीं कार्यें हातांत घेऊन देशासाठीं झगडत आहेत आणि ऐवढ्यांतच त्यांच्या दस्यानें त्यांचा पाठपुरावा करावयास सुरुवात केली आहे. निराश्रित पंजाबी लोकांसाठीं आणि दरिद्री हिंदुस्थानासाठीं त्यांनीं जे अपूर्व परिश्रम केले, तितके श्रम त्यांनीं आपल्या श्रीमंत पक्षकाराचा कज्जा लढविण्यासाठीं खास घेतले नसतील अशी माझी खात्री आहे. मी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. परंतु त्यांनीं विश्रांती घेण्याचें साफ

...ठा ... स्थळप्रत
अनुक्रम ................ दि. ................
...... ................ ................

बापसे सवाअी बेटा ( स. १९१२ )



जवाहरलाल – मोतीलाल

राष्ट्रीय सभा – अमृतसर ( स. १९१९ )



लोकमान्य आणि श्रद्धानंद यांच्यामध्यें अध्यक्ष मोतीलाल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38902 वि. पारेग
क्रमांक 2010 e नों दि. 2-2-63



नाकारलें. आतां तरी कांहीं काळपर्यंत ते दगदगींतून मुक्त होतील आणि त्यांना जरूर तेवढी विश्रांती मिळेल अशी आशा आहे. आपले पुढारी एकामागून एक जरी तुरुंगांत गेले तरी आपण पूर्ण शांतता पाळली पाहिजे आणि तसें झालें तरच मला खरा आनंद वाटेल. पुढारी गेले तरी लोकांनीं अत्याचारी बनतां कामा नये. तसें झाल्यास आपण विजय संपादन केला असें म्हणतां येईल. शांतता न राखतां जर आपण अत्याचारी बनलों, तर कार्य रसातळास जाईल आणि आपण सर्वस्व गमावून बसूं." असे गौरवपर उद्गार महात्मा गांधींनीं मोतीलाल यांच्याबद्दल आपल्या ' यंग इंडिया ' पत्रांत काढले. या उद्गारांत त्यांना मोतीलालजींबद्दल किती जिव्हाळा होता त्याचें प्रतिबिंब तर दिसतेंच व उभयतांच्या सौहार्दाचीहि कल्पना येते.

शिक्षेच्या प्रसंगीं मोतीलालनीं कोर्टात आपला बचाव मुळींच केला नाहीं अगर आपली कैफियतहि मांडली नाहीं. त्यांचा खटला चालला त्यावेळीं सरकार तर्फेचा वकील त्यांचा स्नेही होता. मोतीलाल यांच्या नजरेकडे बघण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. इतकी त्याला स्वतःची शरम वाटली. खटल्याच्या वेळीं कोर्टांत त्यांच्या कडेवर धाकटी प्रियदर्शिनी ( इंदिरा गांधी ) होती. सहा महिन्यांची शिक्षा झाल्यावर तुरुंगांत प्रवेश करतांना आपल्या नि जवाहरलाल तर्फे त्यांनीं आम जनतेला संदेश दिला तो असाः—

" माझ्या कुवतीप्रमाणें मी तुमच्यामध्यें राहून राष्ट्रकार्य केलें. माझ्या मातृभूमीच्या सेवेप्रित्यर्थ मला माझ्या एकुलत्या एक मुलासह तुरुंगांत जावें लागत आहे हें माझें मोठें भाग्यच होय. माझी अशी दृढ श्रद्धा आहे कीं लौकरच स्वतंत्र देशाचे नागरिक म्हणून आपली भेट होईल. माझें अखेरचें सांगणें एकच आहे. स्वराज्य मिळेपर्यंत अहिंसा

नि असहकारितेच्या व्रताचें नीट पालन करा. स्वयंसेवक दलांत हजारांनीं नि लाखांनीं आपलीं नांवें नोंदवा. नोकरशाहीकडून स्वातंत्र्य मंदिराचें पावित्र्य अजून तरी भ्रष्ट झालेलें नाहीं. त्यामुळें या जेलयात्रेंत जितके यात्रेकरू येतील तितके हवेच आहेत."

आपले पती व पुत्र तुरुंगांत गेले तरी मोतीलाल यांच्या पत्नी स्वरूपराणी मुळींच डगमगल्या नाहींत. त्यांनीं स्वतः असहकारितेच्या संग्रामांत उडी घेतली. त्यावेळीं त्यांनीं काढलेले उद्गार वीरपत्नीला शोभणारे आहेत. त्या म्हणाल्या, "माझे पती आणि माझा एकुलता एक मुलगा तुरुगांत गेला याबद्दल मला अभिमान वाटतो .... तुरुंगातल्या खडतर हालअपेष्ठा सोसण्याजोगें त्यांचें शरीर नसल्यामुळें माझ्या अंतः-करणाला घरें पडत आहेत. परन्तु पती व पुत्र तुरुंगांत गेल्याचा मी आनंद मानावा असें माझी सद्सद्विवेकबुद्धि मला सांगत आहे. त्यांना ज्या गोष्टीत आनंद वाटतो त्याबद्दल खेद करून मी त्यांना कमीपणा आणणार नाहीं.......माझ्या पतींनीं आपल्याला संदेश दिलाच आहे. मी आणखी निराळा काय देऊं शकणार ? 'कार्य करा आणि तुरुंगांत जा' या पलीकडे मी काय सांगणार...... सध्यांच्या दडपशाहीला जर आपण मोठ्या निग्रहानें आणि सत्याग्रहानें तोंड दिलें तर आपण लौकरच स्वराज्य हस्तगत करूं शकूं असा मला भरंवसा वाटतो."

एवंच सर्व नेहरू कुटुंब राष्ट्रकार्यासाठीं कायावाचामनानें बद्धपरिकर झालेलें होतें, याची साक्ष स्वरूपराणींच्या वक्तव्यात दिसून येईल. नंतर असहकारितेची चळवळ चालूच होती. परन्तु दि. ५ फेब्रुवारी १९२२ रोजीं चौरीचौरा येथें भयंकर दंगा झाला. मोठ्या जमावानें क्रोधाच्या भरांत सुमारें २२ शिपायांना जिवंत जाळलें. म. गांधींना या प्रकारानें जबरदस्त धक्का बसला. दि. ११ फेब्रुवारी १९२२ रोजीं बार्डोली येथें

कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक भरून असहकारितेची चळवळ मागें घेण्यांत आली. तेव्हां तुरुंगांतल्या मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांनीं तुरुंगांतूनहि पत्रद्वारें गांधींची निर्भत्सना केली. परन्तु नंतर दि. १० मार्च १९२२ रोजीं सरकारनें म. गांधींना अटक करून सहा वर्षांची शिक्षा दिली. अर्थात्‌च असहकारितेची चळवळ पार थंड पडून देशांतल्या अनेक लोकांचा मोठा तेजोभंग झाला !

सहा महिन्यांनंतर मोतीलाल यांची सुटका झाली. दि. ७ जून १९२२ ला लखनौ येथें भरलेल्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीला ते हजर होते. नंतर चित्तरंजन दास सुटून आले. दि. २० नोव्हेंबर १९२२ रोजीं कलकत्ता येथें कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली. त्या बैठकीचें अध्यक्षस्थान चित्तरंजन दास ह्यांनीं भूषविलें होतें. ह्याचवेळीं कौन्सिल प्रवेशाच्या प्रश्नाला तोंड फुटलें. मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, न. चिं. केळकर, जयकर, डॉ. मुंजे, प्रभृती पुढारी कौन्सिल प्रवेश करावा या मताचे होते. राजाजी, राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू, डॉ. अनसारी नि गंगाधरराव देशपांडे वगैरे पुढारी कौन्सिल प्रवेशाच्या विरुद्ध होते. यानंतर डिसेंबरांत गया कॉंग्रेसचें अध्यक्षपद चित्तरंजनदास यांना देण्यांत आलें. आपल्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं कौन्सिल प्रवेशाचा पुरस्कार जोरदारपणें केला. कौन्सिल प्रवेशाच्या ठरावावर मतदान घेतलें. त्यांत कौन्सिल प्रवेशवाल्यांना ८९० मतें पडलीं तर कौन्सिलवर बहिष्कार घालावा असें म्हणणाऱ्यांना १७४० मतें पडलीं. दि. १ जानेवारी १९२३ रोजीं दास यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन स्वराज्य पक्षाची स्थापना केली. स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष दासबाबू होते आणि चिटणीस कोण होते आहे का माहित ? चिटणीस होते पंडित मोतीलाल नेहरू ! ! नंतर विधीमंडळांत शिरून मोतीलालनी आपल्या कर्तृत्वाचा आणखी एक पैलू दाखविला ! ! !

* * *

: ६ :

# विधिमंडळातील कर्तृत्व

गया काँग्रेसनंतर स. १९२३ मध्यें स्वराज्य-पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. पक्षाचे चार चिटणीस नेमले गेले. त्यांचीं नांवें अशीं :— पंडित मोतीलाल नेहरू, बी. एन्. ससमल, विठ्ठलभाई पटेल नि चौधरी खलिकुझमा. जाहीरनाम्यांतला मुख्य आशय होता तो असा : " गयेस भरलेल्या राष्ट्रीय सभेनें जो कार्यक्रम आंखला आहे त्यानें स्वराज्याची प्राप्ति लवकर होईल असें वाटत नसल्यामुळें व ज्या विषयांचा सदर कार्य-क्रमांत अंतर्भाव होणें जरूर होतें त्यांचा अंतर्भाव झाला नसल्यामुळें, आम्ही राष्ट्रीय सभेच्या छत्राखालींच एका नव्या पक्षाची स्थापना करीत आहों...... या पक्षाचें अध्वर्युत्व देशबंधु चित्तरंजनदास यांस आम्ही देत असून पं. मोतीलाल नेहरू, श्री. बी. एन्. ससमल, विठ्ठलभाई पटेल व चौधरी खलिकुझमा यांस चिटणीस नेमीत आहों. " ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या नि राष्ट्रीय सभेच्या ११० सभासदांनीं व प्रतिनिधींनीं या जाहीरनाम्यावर सह्या केल्या. या जाहीरनाम्यावर सही करणाऱ्या प्रमुख गृहस्थांचीं नांवें अशीं :—अध्यक्ष व चार चिटणीस आणि केळकर जयकर, अणे, मुंजे, भोपटकर, गोखले, संपूर्णानंद इत्यादि.

नोव्हेंबर १९२३ मध्यें कौन्सिलच्या निवडणुकींत मुम्बईहून विठ्ठल-भाई पटेल पहिल्या क्रमांकानें निवडून आले. मध्यवर्ति असेंब्लींत स्वराज्य

पक्षाच्या ५० सभासदांचा एक गटच्या गट निवडून आला. मोतीलाल बिनविरोध निवडून आले. कौन्सिलांतील स्वराज्यपक्षाच्या अध्यक्षत्वाचा बहुमान त्यांना मिळाला. उपाध्यक्ष झाले विठ्ठलभाई पटेल. या निवडणुकींत चित्तरंजनदास नि मोतीलालनी धूमधडाक्याचा प्रचार केला. "ह्या यशाचें मुख्य श्रेय दास-मोतीलाल या युतीला दिलें पाहिजे. दास हे नामांकित वक्ते होते. नेहरू हे उत्तम संघटक व शिस्तीचे पालन करणारे होते. दोघांचें सौहार्द विलक्षण होते " असें उद्‌गार डॉ. तेंडुलकरांनीं आपल्या गांधी चरित्रांत या उभयतांच्या कामगिरीसंबंधीं लिहितांना काढलें आहेत.

निवडणूका जिंकल्यानंतर चित्तरंजनदास नि मोतीलाल नेहरू म. गांधींचा आशीर्वाद घेण्यासाठीं एप्रिल १९२४ रोजीं जुहू येथें गेले. दोघांनीं गांधींशीं मनमोकळी चर्चा केली. गांधींनीं बहिष्काराच्याच मार्गानें स्वराज्य मिळेल असें ठांसून सांगितलें. त्यावेळीं दास–नेहरू त्यांना म्हणालें, "कौन्सिल प्रवेश असहकारितेच्या ध्येयाशीं नि धोरणाशीं सुसंगत ठरेल असें आम्हांस वाटतें " गांधींचें सहकार्य न मिळालें तरी आपल्या पक्षास त्यांचा आशीर्वाद मिळावा अशी दास–नेहरूंची अपेक्षा. परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश आलें नाहीं. नंतर दि. २२ मे १९२४ रोजीं गांधींनीं एक निवेदन प्रसिद्ध केलें. त्याचा मुख्य भाग असा—
"स्वराज्यपक्षाच्या पुढाऱ्यांचें व माझें कौन्सिल प्रवेशासंबंधानें अनेकदां बोलणें झालें. पण त्यांचें व माझें एकमत होऊं शकलें नाहीं.......... आमच्यांतील हा मतभेद केवळ तपशीलाचा नसून तत्वाचा आहे. असहकाराची माझी जी कल्पना आहे तिच्याशीं कौन्सिलप्रवेश विसंगत आहे ...... त्यांची मी खात्री पटवीन अशी मला फारशी आशा वाटत नव्हती. स्वराज्य-पक्षांत अत्यंत कर्तबगार, अनुभवी व देशभक्त असे

किती तरी लोक आहेत. सर्व बाजूंनीं पूर्ण विचार करूनच ते लोक कौन्सिलांत गेलेले आहेत. त्यांनीं अंगिकारिलेल्या मार्गाचा फोलपणा त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला येईपर्यंत ते तो मार्ग सोडण्याची अपेक्षा करणें चुकीचे ठरेल. ”

यानंतर दि २२ जुलै १९२४ रोजीं लो. टिळकांच्या चौथ्या पुण्यतिथीला पुण्याच्या नगरपालिकेनें टिळकांचा एक पुतळा बसविला. त्या पुतळ्याचा अनावरण समारंभ मोतीलाल यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं ते म्हणाले, “ लोकमान्य टिळकांनीं आपल्या कर्तृत्वानें स्वतःचें कीर्तिमंदिर उभारलें असल्यामुळें त्यांच्या मोठेपणाचें द्योतक म्हणून ब्रॉंझचा किंवा संगमरवरी पुतळा उभारण्याचें कारण नाहीं. लोकमान्यांचें जीवितकार्य कोणतें असें जर मला विचारलें तर ‘ आपल्या सभोंवतीं पहा ’ असें मी उत्तर देईन. टिळकांची लोकोत्तर थोरवी व धीरोदात्त आत्मविश्वास याची खूण सुरत कॉंग्रेसचे प्रसंगीं मला पुरी पटली ! कॉंग्रेस मंडपांतील प्रक्षुब्ध जनसमाज, चवताळलेले प्रतिनिधि व खुर्च्यांची फेंकाफेंकी, यांनीं गांगरून न जातां लोकमान्य टिळक छातीवर दोन्हीं हातांची कडी करून प्लॅटफॉर्मवर उभे राहिलेले मीं स्वतः पाहिले. तें चित्र मी कधींहि विसरणार नाहीं ! टिळकांनींच प्रथम हिंदी स्वराज्याचा संदेश सामान्य जनतेपर्यंत पोचविला. ”

आतां मोतीलाल यांच्या विधीमंडळांतील तेजस्वी अन् चिरस्मरणीय कामगिरीसंबंधीं सविस्तर लिहिणें ओघानेंच येतें. परंतु त्यापूर्वीं त्यांनीं स. १९०९ ते १९१९ या काळांत संयुक्त प्रांतांतल्या विधीमंडळांत जें कार्य केलें त्याचा आढावाहि घेणें श्रेयस्कर वाटतें. पुढें दिल्लीला त्यांनीं विधिमंडळ हलवून सोडलें हें खरें. तथापि त्याची पहिली चुणूक त्यांनीं दाखविली ती संयुक्त प्रांतांतल्या विधिमंडळांत. त्या काळांतल्या त्यांच्या कार्याबद्दल एक प्रसंग सांगण्यासारखा आहे.

मोतीलाल संयुक्त-प्रांत कौन्सिलचे सभासद असतांनाची गोष्ट. स. १९१७ मधला तो प्रसंग. सर जेम्स मेस्टन हे त्यावेळीं कौन्सिलचे अध्यक्ष होते. त्या सुमारास थॉम्पसन सिव्हील इंजिनियरींग कॉलेजचे ( रुकीं ) प्राचार्य वुड ह्यांनी भारतीय जनतेच्या चारित्र्यासंबंधीं अत्यंत अनुदारपणाचें नि अपमानकारक उद्गार काढले होते. तेव्हां कौन्सिलमध्यें वुड यांच्या निषेधाचा ठराव मोतीलालनीं मांडला व त्यावर एक झणझणीत भाषणहि केलें. नंतर वुड यांच्या कार्यवाहकानें दिलगीरीचें पत्रहि धाडलें. त्या पत्रांत माफीचा निर्देश नसल्यानें कौन्सिलांत या प्रश्नावर रण माजलें. शेवटीं अध्यक्षांनीं या प्रश्नावर मतें घेण्याचा डाव रचून मोतीलाल यांच्यावर मात करण्याचें ठरविलें. प्रत्युत्तराची संधी न मिळाल्यानें पंडितजी गरम झाले होते. आपला तो हक्क बजावण्यासाठीं ते बोलण्यास उठलेहि. परंतु अध्यक्षांनीं आपल्या अधिकारांत त्यांना तसें स्वातंत्र्य न देण्याचा जणूं विडाच उचलला. परंतु असल्या अडचणींनीं मोतीलाल कचरणार थोडेंच ! आपल्या हक्कांची अध्यक्षांनीं पायमल्ली केली म्हणून ते ताडकन् कौन्सिलांतून चालते झालें. पुढें त्यांच्या अनेक मित्रांनीं त्यांचें मन वळविण्यासाठीं जंग जंग पछाडलें. मोतीलाल मात्र आपल्या निश्चयापासून रतिमात्रहि ढळलें नाहींत. कौन्सिल कामकाजांत मोतीलाल आपल्या मतांचे बाबतींत किती खंबीर असत याची कल्पना या प्रसंगावरून येईल.

स्वराज्यपक्ष विधिमंडळांत बऱ्याच संख्येनें निवडून आला हें मागें सांगितलेंच. पहिल्या वर्षीं त्या पक्षानें सरकारची प्रत्येक प्रश्नांवर अडवणूक केली. पहिल्या वर्षीं स्वराज्य पक्षानें सरकारला प्रश्नांच्या सरबत्तीनें अगदीं भंडावून सोडलें. सरकार पक्षाचे सर माल्कम हेले यांनीं त्यावर्षींच्या असेंब्लीच्या कामकाजासंबंधानें काढलेलें उद्गार श्री. न. चिं. केळकरांनीं आपल्या दिल्लीच्या बातमीपत्रांत ( वार्ताहरखंड–पृ. २३०–२३१ ) दिले आहेत ते असे : “ यंदा मला किती मेहनत पडली

याची तुम्हाला कल्पना नसेल. मला दिवसांतून चौदा तास काम करावें लागे." पुढें केळकरांनीं आपल्या दिल्लीच्या बातमीपत्रांत मोतीलाल यांच्या कामासंबंधीं, कामगिरीसंबंधीं नि व्यक्तिमत्वाविषयीं लिहिले आहे. ते लिहितात " पण सरकारपक्षातर्फे माल्कम् हेले यांना जसे धन्यवाद देणें जरूर आहे, तसेंच लोकपक्षातर्फें पंडित मोतीलाल नेहरू यांनाहि ते देणें जरूर आहे. कारण हेले यांना चौदा तास काम पडलें असेल, पण नेहरू यांना एका झोपेशिवाय सर्व वेळ कामच करावें लागलें. अधिकाऱ्यानें विश्रांति घ्यावयाचें मनांत आणल्यास त्याला पहारा बसवून ती घेतां येते; पण लोकपक्षीय पुढाऱ्यांचें तसें नाहीं. पंडित नेहरू यांची छोटी खोली हा गेल्या दोन महिन्यांत एक बडा खलबतखाना होऊन बसला होता. सगळ्या सभा व सगळ्या सभांच्या प्रास्ताविक सभा यांना, त्यांना हजर रहावें लागे व आमच्या खासगी सभांतूनहि आम्ही लोक किती गोंगाट करतो, किती अप्रस्तुत प्रश्न उपस्थित करतो व निरनिराळ्या पक्षांच्या कशा समजुती काढाव्या हें माहित असणाराला पंडित मोतीलाल यांना सर्व छोट्या मोठ्या सभांचे अध्यक्ष म्हणून किती मेहनत पडली असेल याची कल्पना करतां येईल. पंडितजींना पूर्वीं आपल्या वकिलीच्या अमदानींत पुष्कळ काम करावें लागलें असेल. पण वकिलीची मिजासच अशी असते कीं कामाचे श्रम वाटत नाहींत. पुढारीपणाची गोष्ट तशी नाहीं. तेथें सगळी मिजास जिरून जाते व ती तशी जिरून जाणें यांतच पुढारीपणाचें यश आहे. जुन्या काळांत नेहरू हे फेरोजशहा मेथाच होते. पण फेरोजशहा हे मिजास संभाळून गेले व नेहरू यांनीं मिजासीचा त्याग करून नवा देह धारण केल्याप्रमाणें नवें अवतारकृत्य केलें; यामुळें या दोघांच्या मान्यतेंत जमीन अस्मानाचा फरक पडला."

" पण पंडित नेहरू यांच्या अवतार चरित्रांत आणखी एक उपाख्यान आहे. तें विशेष बोधप्रद ठरेल. पंडितजी हे पूर्वीं मवाळ व नेमस्त असतां

असहकारितावादी व महात्माजींचे चेले बनले हें एक परिवर्तन खरें. पण प्रथम कट्टर असहकारवादी असतां पुढें ते कौन्सिलवादी बनले हें दुसरें परिवर्तन होय. अजूनहि ते महात्माजींवर श्रद्धा ठेवणारेच आहेत. अजूनहि ते महात्माजींचाच सल्ला घेतात, अजूनहि महात्माजींची संमति, निदान अनुमति, हीच आपल्या यशाची खरी कसोटी, तेंच आपल्या श्रमांचें खरें साफल्य असें ते मानतात हें खरें. तथापि पूर्वी कायदेभंग कमिटीवर असतांना पुण्या-मुंबईस गेलेले नेहरू व आजचे असेंब्लीचे पुढारी नेहरू यांतील फरक पाहिला म्हणजे मौज वाटते. पुण्यास त्यावेळीं त्यांनीं केळकर प्रभृति साथीदारांची तपासणी अशा झोकानें केली कीं, कौन्सिलांत शिरणें हें हराम होय; व एका प्रसंगीं असेंहि उद्गार विनाकारण काढले कीं, आम्हीं काय महाराष्ट्राचें अनुकरण करूं वाटते ! पण थोड्याच दिवसांत कौन्सिल प्रवेशवादामध्यें पंडितजींनीं महाराष्ट्रास मागें टाकलें ! पुण्यास केळकर-भोपटकरांना व नागपुरास अणे-मुंजे याना विरोध बुद्धीनें छेडणारे पंडितजी, दिल्लीस याच लोकांना खलबतांत घेतल्याशिवाय पान हलूं देत नाहींत हें पाहणाऱ्या तिऱ्हाइताला कालगति विचित्र आहे असें म्हटल्याशिवाय कसें राहवेल ? ”

“ कसेंहि असलें तरी पंडितजींनीं आपलें हें नवें अवतारकृत्य मेहनतीनें, प्रतिष्ठितपणानें व रुबाबदारीनें चालविलें आहे यांत शंका नाहीं. पंडितजी समोर असले म्हणजे हेले यांना जपूनच बोलावें लागतें. होम मेंबरचें काम सोडतांना हेले यांनीं केलेल्या भाषणांत असे उद्गार काढले कीं, ‘ मी दगदगींतून सुटलों. गव्हर्नर झाल्यानें मी आतां अशा स्थानी जात आहे कीं, तेथें पंडितजींचा शिलशिला नाहीं. ’ या उद्गारांत थोडी विनोदाची झाक असली तरी सत्याचा अंश बराच आहे. ” मोतीलाल यांच्या असेंब्लीतल्या कामासंबंधीं इतकें समर्पक वर्णन शोधूनहि सांपडणें कठीण !

मोतीलाल त्यांच्याबरोबर विधिमंडळ गाजविणारे दुसरें गृहस्थ म्हणजे श्री. विठ्ठलभाई पटेल. या उभयतांच्या असेंब्लीतल्या कार्यकर्तृत्वाचें बहारदार वर्णन श्री. ज. गं. करंदीकर यांनीं आपल्या 'विठ्ठलभाई पटेल' या चरित्रांत केलें असून तें वाचनीय आहे. करंदीकर लिहितात, "कौरव सभेंत जसे भीमार्जुन तसे ते नेहरू-पटेल असेंब्लीला आपल्या हजेरीनें भूषणभूत झाले होते. एक स्वराज्य-पक्षाचे अध्यक्ष तर दुसरे उपाध्यक्ष. दोघेहि महान मुत्सद्दी आणि खंबीर राजकारणपटु वीर. दोघांनींहि अपार लोकप्रियता मिळविलेली......नेहरू-पटेलांच्या वाक्शरांनीं हेले—मुडिमन घायाळ होऊं लागले. एवढेंच नव्हे, तर त्यांची 'दे माय धरणी ठाय' अशी केविलवाणी स्थिती होऊं लागली ! नेहरू-पटेलांचा दराराच तसा विलक्षण होता. नेहरूंचे विशाल भाल, उग्र मुद्रा, उन्नत नासिका, खानदानी रुबाब व खणखणीत भाषण; आणि पटेलांचे तीक्ष्ण नेत्र, दुसऱ्यावर छाप पाडणारी शुभ्र लांब दाढी, खोचक मुद्रा आणि मर्मभेदी वक्तृत्व या सर्व गोष्टींनीं आरंभींच सरकारी सभासदांना वाटूं लागलें, कीं यापुढें जी झुंज होणार ती कांहीं सामान्य प्रतीची किंवा नेभळट होणार नाहीं." सारांश मोतीलाल नेहरूंनी विधीमंडळ आपल्या पट्टीच्या वक्तृत्वानें दणाणून सोडलें.

स. १९२८ मध्यें त्यावेळचे सेनापति बर्डवुडसाहेब ह्यांनीं लष्करी विषयासंबंधीं बोलतांना म्हटलें, "चिनांत पाठविलेल्या हिंदी सैनिकांनीं आपल्या घरीं पगाराचे व इतर बरेच पैसे पाठविले." यावर मोतीलालनी त्यांना खडसावून उत्तर दिलें, "चिनी लोकांचें राष्ट्रीय स्वातंत्र्य हरण करण्याकरितां आमचें भाडोत्री सैन्य पाठवितां व त्यांच्याकडून घरीं पुष्कळ पैसे आले असें सांगतां यांत काय स्वारस्य ? इकडे आलेल्या पैशांत तिकडच्या 'लुटी'चेहि कदाचित पैसे असतील. असल्या दूषित पैशाचें आमिष आम्हाला दाखवितां व त्याची सबब सांगतां ही फार लज्जास्पद

गोष्ट आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या वाढीकरतां म्हणजे आम्हाला एका अर्थानें दास्यांत अधिक डांबण्याकरितां आमचे लोक परदेशीं पाठविणें व या गोष्टीचा मोठेपणा आम्हाला देणें हे सरकारला लाजिरवाणें व आम्हाला अपमानास्पद आहे ! " या प्रत्युत्तराचें वेळीं पंडितजींच्या 'लूट' शब्दामुळें सर्व सरकार-पक्षीय अधिकारी गरम झाले नि पंडितजींनीं ते शब्द मागें घ्यावें म्हणून त्यांनीं कांवकाव करण्यास प्रारंभ केला. परंतु सरकार-पक्षीय ठक असले तर पंडितजी त्यांना पुरून उरणारे महाठक होते. त्यांनीं वाक्बाणांचा आसूड पुन्हां उगारून सर्वांना चीत केलें. ते म्हणाले, " मी बोललों ते शब्द पुन्हां शंभर वेळां बोलेन. तुमची भीति कसली ? परदेशांत स्वारीवर पाठविलेलें सैन्य लूट करतें कीं नाहीं याच्या गोष्टी तुम्ही आम्हाला शिकवायला नकोत. जग कसें आहे ? मनुष्य स्वभाव कसा आहे ? याची माहिती सर्वांनाच असते. तुम्ही मुलुखावेगळे निःस्पृहतेनें असे काय हात धुतले ? " मोतीलाल प्रतिपक्षीयांना कसें निरुत्तर करीत ह्याचा हा एक किस्सा सांगितला. अशा अनेक प्रसंगीं मोठ्या धैर्यानें नि कुणाची भीडमुर्वत न ठेवतां प्रतिपक्षाची ते हजेरी घेत. मोतीलाल यांची विधिमंडळांतील कामगिरी अशी होती.

विधिमंडळाची बैठक सुरूं झाली कीं अंमळ थोड्या वेळानें मोतीलाल एखाद्या उमरावाप्रमाणें डुलत डुलत सभागृहांत प्रवेश करीत. ते जागेवर स्थानापन्न झाले कीं सभागृहांतल्या सर्व सभासदांचें लक्ष ते वेधून घेत. मनुष्य स्वभावाचें त्यांचें ज्ञान अचूक होतें. प्रतिपक्षावर इतके तोंडसुख घेत तरीहि सरकार पक्षांतले कांहीं सभासद त्यांना मनापासून चाहत. एखाद्या मेजवानीच्या प्रसंगीं आपल्या प्रतिपक्षियांशींहि ते अतिशय खेळीमेळीनें वागत. कौन्सिलमधले ब्रिटिश सदस्यहि त्यांना मनापासून चाहत. ते म्हणत, " आमचे जरी मतभेद असले तरी आम्हीं त्यांची योग्यता जाणून आहोंत. "

एका भारतीय गृहस्थांनीं त्यांच्या विधिमंडळाच्या वक्तृत्वाबद्दल काढलेले उद्गार यथार्थ आहेत. ते लिहितात, "विधिमंडळांत त्यांच्याइतकी प्रभावी व्यक्तिमत्वाची व्यक्ति क्वचित्‌च आढळेल. कांहीं विशिष्ट बाबींत त्यांच्यावर मात करणाऱ्या व्यक्तिहि तेथें होत्या. परंतु सर्व पक्षांच्या प्रेमादरास प्राप्त झालेले मोतीलाल एकटेच. पट्टीच्या वक्तृत्वांत सर माल्कम् आद्वितीय होते. चढेलपणा नि भाषेचा अस्खलितपणा यामुळें जिनांचें भाषण अतिशय परिणामकारक होई. जयकरांची बोलण्याची पद्धत जरा जुनाट नि रांगडी असली तरी विधिमंडळांतला फड ते नेहमीं जिंकत. परंतु विधिमंडळांतल्या सवाल जबाबांच्या रणधुमाळींत मोतीलाल एखाद्या वीराप्रमाणें शोभून दिसत. विठ्ठलभाई पटेल त्यांच्या तोडीचे म्हणतां येतील. पण तेंही प्रतिपक्षी म्हणून नव्हे तर सहकारी म्हणून." एवंच भारतीय विधिमंडळांतल्या कारभाराचे जनक म्हणून मोतीलाल यांचा उल्लेख केल्यास तो अस्थानीं न ठरावा.

स. १९२५ मध्यें स्वराज्यपक्षाचें अध्वर्यू नि मोतीलाल यांचे परमस्नेही बॅ. चित्तरंजनदास निवर्तले. दोघेहि नाणावलेले नि पहिल्या प्रतीचे वकील. दोघांनींहि अमाप पैसा मिळविला नि तसाच राष्ट्रकार्यार्थ खर्चेहि केला. दोघांचा एकमेकावर पराकाष्ठेचा विश्वास. जणूं रामलक्ष्मणाची जोडीच म्हणाना ! भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासांत या दोघांची नांवें सुवर्णाक्षरांनींच लिहावीं लागतील. दोघेहि आपआपल्या प्रांतांत लोकप्रिय होते. हायकोर्टांत दोघांनींहि आपलें कर्तृत्व गाजविलें. राजकारणांत दोघांनींहि अंमळ उशीरानेंच प्रवेश केला. दोघांनाहि पंजाब प्रकरणानेंच स्फूर्ति दिली. असहकारितेच्या चळवळींत दोघांनींहि आपल्या लाखाची प्राप्ती देणाऱ्या वकिलीच्या धंद्यावर लाथ मारली. दोघेहि कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. स्वराज्यपक्षाच्या उभारणींत दोघांनींहि पराकाष्ठेचे श्रम घेतलें. दोघांचे राजकीय विचारहि जवळ जवळ एकच आणि दोघांचा स्नेह नि

सौहार्दहि दृष्ट लागण्याजोगें. दि. १६ जून १९२५ रोजीं दासबाबू निवर्तले. त्यावेळीं मोतीलालना धक्काच बसला. त्यांनीं लागलीच दासबाबूंच्या पत्नींना दुखवट्याची तार ठोकली नि तडक ते त्यांच्याकडे कलकत्त्याला गेले. दासबंधूच्या निधनानंतर स्वराज्यपक्षाची धुरा मोतीलाल यांच्यावर पडली. " उभयतांचा एकमेकावर विश्वास पराकाष्ठेचा. इतका कीं कुठल्याहि पत्रकावर अगर निवेदनावर अगाऊ कसलीहि चर्चा अगर विचारविनिमय झालेला नसूनहि एकमेकांच्या नांवानें सह्या करण्यास हे बिनदिक्कत तयार असत " अशी प्रांजळ कबुली जवाहरलालनीं आपल्या आत्मचरित्रांत उभयतांच्या स्नेहासंबंधीं लिहितांना दिली आहे.

दि. २२ ऑगस्ट १९२५ रोजीं विठ्ठलभाई पटेल असेंब्लीचे अध्यक्ष झाले. पटेल जेव्हां असेंब्लींत अध्यक्षाच्या खुर्चीवर बसण्यास आले तेव्हां ते धोतरच नेसले होते. अध्यक्षाची खूण म्हणून त्यांनीं काळा झगा परिधान केला होता. हा झगाहि काळ्या रंगाच्या रेशमी खादीचा होता अन् तो सरोजिनी नायडूनी दिलेली साडी फाडून तयार केला होता. याच सुमारास स्वराज्य पक्षाचे एक प्रमुख सभासद श्री. तांबे यांनीं सरकारनें दिलेली होममेंबरची जागा स्विकारली. त्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठीं मित्रभावानें केळकरांनी त्यांना अभिनंदनाची तार पाठविली. यामुळें बराच वाद माजला. आणि स्वराज्य पक्षांत दोन तट पडण्याची चिन्हें दिसूं लागलीं. परंतु शेवट गोड झाला.

स. १९२६ मध्यें पं. जवाहरलाल आपल्या पत्नीच्या प्रकृती स्वास्थ्यासाठीं युरोपला गेले. बरोबर त्यांची मुलगी प्रियदर्शनी, वहीण विजयालक्ष्मी नि त्यांचे पती रणजित पंडीत ही मंडळीहि होती. पुढें धाकटी वहीण कृष्णा ही देखील या मंडळींना येऊन मिळाली. मोतीलालनीं देखील सप्टेंबर १९२७ रोजीं युरोपला प्रयाण केलें. नोव्हेंबरांत मोतीलाल—जवाहरलालना रशियाचें निमंत्रण मिळालें. रशियाच्या १० व्या प्रजा-

सत्ताक दिनाच्या समारंभाला पाहुणे म्हणून चार दिवस हे उभय पिता-पुत्र उपस्थित होते. नंतर मोतीलाल लंडनला गेले व तिथें त्यांनीं सुप्रसिद्ध वकील सर जॉन सायमन यांच्याशीं प्रिव्ही कौन्सिलच्या एका खटल्याविषयीं चर्चा केली. स. १९२८ च्या फेब्रुवारी मार्चच्या सुमारास मोतीलाल भारतांत परत आले.

त्या सुमारास भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनीं हिंदी पुढाऱ्यांना मोठ्या आढ्यतेनें विचारलें कीं, 'तुमच्याजवळ एकमुखी राज्यघटना कुठें आहे?' अर्थातच सर्वपक्षीय परिषद भरून मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. त्या कमिटींत सप्रू, अणे, बॅ. जयकर इत्यादि पुढारी होते. कमिटीनें एक योजना तयार केली. वसाहतीचा दर्जा किंवा पूर्ण स्वातंत्र्य यांतील कोणत्याहि पायावर स्वराज्याची इमारत उभारावी अशी ती योजना होती. या योजनेलाच 'नेहरू रिपोर्ट' म्हणतात. यांतील प्रमुख कलमें परिशिष्टांत दिलीं आहेत. बर्कनहेड यांच्या आव्हानाला या योजनेनें पुरा छेद दिला. जिना यांना ही योजना मान्य नव्हती. असेंब्लींतहि 'तुमचा हा नेहरू रिपोर्ट आम्हांला मान्य नाहीं. तुमचें आमचें जमावयास पाहिजे असेल तर आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करूं नका' अशी धमकी जिनांनीं दिली. गांधींचा या रिपोर्टास आशीर्वाद होता.

दि. २६ डिसेंबर १९२८ रोजीं ऑ. इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकींत नेहरू रिपोर्ट पास करण्याबद्दलचा ठराव खुद्द गांधींनीं मांडला. सुभाषबाबू व जवाहरलाल या रिपोर्टाच्या विरुद्ध होते. गांधींनीं ठरावांत दोन वर्षांच्या अवधींत सरकारनें रिपोर्टाला मान्यता दिली नाहीं तर असहकारितेची चळवळ करावीं असे म्हटलें. तरीहि त्यावर वादंग माजलें. शेवटीं गांधींनीं ही मुदत एक वर्षावर आणल्यानें गांधींचा ठराव मंजूर झाला. अन्यत्रहि 'जो या रिपोर्टास विरोध करील तो देशद्रोही'

असें लिहिण्यास गांधींनीं कमी केलें नाहीं. पुढें स. १९२९ च्या लाहोर कॉंग्रेसमध्यें 'नेहरू रिपोर्टाला' मूठमाती मिळाली तरी नेहरू रिपोर्टाला सुरूवातीला एकमुखी पाठींबा मिळाला होता. 'केसरी'नें या योजनेचें मराठींत विस्तृत रूपांतर करून तें 'असलें स्वराज्य आम्हांला हवें' या नांवानें छापून त्याच्या हजारों प्रति महाराष्ट्र प्रांतिक कमिटीतर्फे वाटल्या याविषयीं दि. ४–९–१९२८ च्या केसरींत विचार प्रकट झाले ते असे "नेहरू कमिटीच्या योजनेस पं. मालवीय यांनीं मोडकी तोडकी नौका म्हणून विनयानें संबोधिलें खरें पण एकीचें चिलखत चढविलेली हीच नौका अनुकूल वारा व कुशल कर्णधार लाभल्यास स्वराज्याच्या पैल तीरावर हिंदी राष्ट्रास सुरक्षितपणें नेऊन सोडण्यास समर्थ होणार आहे हें विसरतां कामा नये.' असें असलें तरी रिपोर्टांत भारतीय जनतेचे कांहीं अधिकार हिरावून घेण्यांत आलें असल्यानें भारतीय जनतेला मात्र हा नेहरू रिपोर्ट तितकासा मान्य नव्हता. गांधींनीं या रिपोर्टाला पाठिंबा दिला यावरून मोतीलाल यांच्या मताला गांधी किती मान देत त्याची कल्पना येते.

सन १९२८ च्या डिसेंबर महिन्यांत कॉंग्रेसचें अधिवेशन कलकत्ता येथें भरलें. नेहरू रिपोर्टचें जनकत्व मोतीलाल यांच्याकडे जात असल्यानें व हिंदू नि मुसलमान या दोन्हीं समाजांत ते सारखेच लोकप्रिय असल्यानें कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचीं वस्त्रें त्यांना बहाल करण्यांत आलीं. त्यांचें जंगी स्वागत करण्यांत आलें. ३६ घोड्यांच्या अश्वरथांतून त्यांची मिरवणूक राजशाही थाटांत काढण्यांत आली. कॉंग्रेसचें अध्यक्षपद पूर्वी त्यांना स. १९१९-मध्यें मिळालेलें होतें. नऊ वर्षांनी फिरून कॉंग्रेसचें अध्यक्षपद भूषविण्याचा मान त्यांना मिळाला. यावरून कॉंग्रेस पक्षांतल्या व भारतीय जनतेंतल्या त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना सहज येते. यावेळीं मोतीलालनीं अध्यक्षपदावरून केलेलें भाषणाहि अतिशय गाजलें. त्यांच्या भाषणाचा मुख्य सारांश असा—"तुमचीं निराशा होऊं नये म्हणून मी

अगोदरच सांगून ठेवतों कीं, मी सद्यःस्थितीकडे पहाणारा व्यावहारिक मनुष्य असून दूरच्या कालाकडे दृष्टी लावणारा नाहीं. आकर्षक भाषेंत मांडलेला ध्येयवाद तुम्हांला माझ्याकडून ऐकावयास मिळणार नाहीं. मी ध्येयवाद त्याज्य समजतों असें नव्हे. ध्येय हवें तितकें उच्च ठेवा, पण त्याप्रमाणें आचरण पाहिजे. कृती शिवाय नुसता ध्येयवाद म्हणजे स्वप्नवत असून त्याला राजकारणांत जागा नाहीं. शिवाय ध्येय कितीहि उच्च असले तरी त्यासाठीं आचरण्यांत आणण्यांचा कार्यक्रम व्यवहाराकडे दृष्टी ठेवूनच आंखला पाहिजे.

" आपलें ध्येय काय .आहे या प्रश्नाला माझें उत्तर स्वातंत्र्य—खरे स्वातंत्र्य हें आहे. मग त्याला तुम्ही वाटेल तें नांव द्या. मला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे. पण वसाहतीचा दर्जा त्वरीत मिळत असेल तर त्याला माझा विरोध नाहीं. आज ब्रिटिशाशीं ज्या प्रकारचा संबंध आहे त्यांच्या विरुद्ध मी नाहीं. स्वातंत्र्य व डोमिनियन स्टेटस या दोहोंमध्यें विरोध आहे किंवा नाहीं याबद्दल मी विवेचन करीत नाहीं. पण डोमिनियन स्टेटसमध्यें जवळ जवळ संपूर्ण स्वातंत्र्या इतकें स्वातंत्र्य असतें. आणि सध्यांच्या अपमान कारक पारतंत्र्याच्या ऐवजीं डोमिनियन स्टेटसमध्यें जेवढें स्वातंत्र्य असतें तेवढें आज देण्यांत आलें तरी मी स्वीकारीन. स्वातंत्र्य मिळालें म्हणजे हिंदुस्थान कांहीं जगांतून उठन बाहेर जात नाहीं. डोमिनियन स्टेटसमध्यें हिंदुस्थान व इंग्लंड यांचा संबंध ब्रिटिश राष्ट्रसंघाच्या नियमाप्रमाणें राहिल तर स्वातंत्र्यामध्यें तो संबंध तहनाम्यावर अवलंबून राहिल इतकाच काय तो फरक.

" यावर कित्येकांकडून असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं, वसाहतीच्या स्वराज्यानें आमचें समाधान होईल. असें आम्हीच बोलत सुटण्यांत कमीपणा आहे. आपण निर्भेळ स्वातंत्र्याचा प्रयत्न करूं आणि मग त्यांत ग्रेटब्रिटनकडून असली तडजोडीची भाषा सुरू झाली तर तिचा कांहींसा

स्वराज्य पक्षाचे नेते ( स. १९२४ )



" कारागृहीं वास "
जराजर्जर मोतीलाल ( स. १९३० )



नेहरूंचे जामात–आनंदभवन ( स. १९२१ )



मोतीलाल – सौ. स्वरूपराणी
सौ. विजयालक्ष्मी – बॅ. रणजित पंडित

विचार करूं. या आक्षेपांत कांहींसे तथ्य आहे खरें. पण आपल्या सामर्थ्याविषयीं आपली खात्री असली म्हणजे आपण होऊन तडजोडीची भाषा बोलण्यांतहि दोष नाहीं."

नेहरु रिपोर्टाविषयीं मोतीलाल त्यावेळीं म्हणाले, "राष्ट्रानें स्वयं-निर्णयाच्या तत्त्वावर हा रिपोर्ट तयार केला आहे. असला हा रिपोर्ट तुम्हांला लाथाडावयाचा असेल तर खुशाल लाथाडा ! पण त्या योगानें स्वयंनिर्णयाचें तत्त्वच लाथाडल्यासारखें होतें हें विसरू नका. मुठभर असंतुष्ट लोकांसाठीं सगळ्या देशाची प्रगति थोपवून धरावयाची कीं काय याचा विचार करा. सर्व पक्षांना मान्य होणारी दुसरी कोणतीहि योजना याहून अधिक सवलती देऊं शकेल असें वाटल्यास ही योजना फेटाळून लावा. या योजनेनें राष्ट्राचें शाश्वत हित साधतें असें जर तुम्हांस वाटत असेल तर ही योजना तुम्ही मंजूर करा."

स. १९२९ हें वर्ष मोतीलाल यांच्या परमोत्कर्षाचें म्हणावयास हरकत नाहीं. कारण त्याच वर्षीं लाहोर येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अध्यक्ष-पदाचा मान त्यांच्या मुलाला-जवाहरलालना मिळाला. त्यावेळीं मोतीलाल म्हणाले, "जवाहरलालचा मी पिताजी आहे, याबद्दल मला अभिमान वाटतो." आणि त्यांना तसा अभिमान कां न वाटावा ? अतिशय लहान वयांत मुलाला कॉंग्रेसचें अध्यक्षपद मिळाल्याबद्दल कुणा पित्याला आनंद वाटणार नाहीं ? जवाहरलाल त्यावेळीं चाळीशीच्या घरांत होते. जवा-हरलाल यांच्याशीं मोतीलाल यांचे राजकरणांत अनेक मतभेद होते. परन्तु त्यांच्या समक्ष कुणी जवाहरलालजींवर टीका केल्यास ती त्यांना मुळींच खपत नसे. मुलाला अध्यक्षपद मिळाल्याबद्दल मोतीलाल यांच्या पत्नींना—स्वरूपराणींनाहि अतिशय आनंद झाला. कॉंग्रेसच्या इतिहासांत बाप-लेकांना कॉंग्रेसचे अध्यक्षपद मिळाल्याचें तें पहिलेंच उदाहरण. 'शिष्यात्

इच्छेत् पराजयम् ' असा प्रकार मोतीलाल-जवाहर या पितापुत्रांत घडला. पित्याच्या कार्याची धुरा पुत्रानें घेतली व वडिलांच्या कामगिरीवर आपल्या कर्तृत्वाचा कळस त्यानें उभारला.

लाहोर अधिवेशनांत पूर्ण स्वातंत्र्याच्या उच्चारांची घोषणा जाहीरपणें करण्यांत आली. अर्थात्च नेहरू रिपोर्ट नेस्तनाबूद झाला. परन्तु मोतीलालना त्याबद्दल वैषम्य मुळींच वाटलें नाहीं. त्या दिवशीं रावी नदीच्या तीरावर स्वातंत्र्याची घोषणा करण्यांत आली. तो दिवस भारतीय इतिहासांत संस्मरणीय झाला आहे. मोतीलाल यांच्या जीवनांतहि तो दिवस, नव्हे क्षण, संस्मरणीय झाला यांत काय संशय ?

सन १९३० च्या सुरूवातीला मोतीलालनीं एक महान पुण्यकर्म केलें. मुळचेच ते दिलदार वृत्तीचे. तशांत राजकारणांत पडल्यामुळें पैशाची मूठ सैल सोडण्यास ते मुळींच कचरत नसत. व्यवसाय बंद करून त्यांनीं आपलें आयुष्य राष्ट्रसेवेसाठीं वाहिलेलें होतें. एवढेंच नव्हे तर सर्व नेहरू कुटुंब देशकार्यार्थ झटत होते. या सर्वांत भर म्हणूनच कीं काय मोतीलालनीं आपली एक मोठी नि अत्यन्त प्रिय असलेली गोष्ट म्हणजे त्यांचा राजशाही थाटाचा भव्य प्रासाद, आनंदभवन कॉंग्रेसला देण्याचा निर्णय घेतला आणि तेव्हांचे कॉंग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल यांना तसें पत्रहि लिहून टाकलें. तें पत्र त्यांनीं मार्च महिन्याच्या अखेरीस स. १९३० त लिहिलें. त्यांच्या पत्राचा गोषवारा असा :

" अध्यक्ष महाराज,

ता. २२ मार्च रोजीं जंबुसर येथें असतांना आमचा जुना वाडा ' आनंदभवन ' राष्ट्राला नजर करण्याविषयींच्या माझ्या सूचनेचा आम्हीं महात्माजींशीं खल केला होता. ती सूचना आतां मी आपल्यापुढें ठेवीत आहे. या वाड्याचा मागील इतिहास आणि स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय लढ्याची

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८९५

सध्यांची स्थिती लक्षांत घेतां हिंदी राष्ट्रीय सभेला हा वाडा मुख्य कचेरीच्या कामासाठीं दिल्यास वाड्याचा चांगला उपयोग होईल....... सोबत दोन याद्या जोडल्या असून एकींत या वाड्याचा पूर्वीचा इतिहास दिला आहे व दुसरींत आणखी जी मिळकत मी राष्ट्राला अर्पण करणार आहे त्याची नोंद दिली आहे. ही सूचना एप्रिल दि. ६ रोजीं अमलांत आणण्याची माझी इच्छा आहे. राष्ट्रीय आठवड्याचा हा पहिला दिवस असून त्याच दिवशीं स्वातंत्र्याच्या लढ्यांतील सामुदायीक कायदेभंगास सर्वत्र सुरूवात व्हावयाची आहे. जर या वाड्याचा स्वीकार करण्यांत आला तर ' स्वराज्यभवन ' हें नांव या वाड्यास द्यावें."

आपला,
मोतीलाल नेहरू.

या पत्राला कॉंग्रेसच्या तेव्हांच्या अध्यक्षांनी-पंडित जवाहरलालनीं उत्तर दिलें त्याचा सारांश असा:—

प्रिय महाशय,

आनंदभवनाचा जुना वाडा आपण राष्ट्राला देणगी म्हणून दिल्या-बद्दल मी आपलें आभार मानतों........स्वातंत्र्य संग्राम सुरूं होण्याच्या सुमारास राष्ट्राला ही देणगी मिळाली हे हि अगदीं योग्यच झालें.

आपला,
जवाहरलाल नेहरू

वाडा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर मोतीलाल यांचें मन एकदांहि विचलीत झालें नाहीं. वकिलीचा व्यवसाय सोडल्याला दहा वर्षें होऊन गेली होती. मुलगाहि राजकारणांत पडलेला होता. मूळची संवय ऐषआरामाची. घरचा कुटुंब परिवार मोठा. इतकें असूनहि त्यानीं आपला रहाता वाडा लेखणीच्या फटकाऱ्या बरोबर राष्ट्रसभेला देऊन टाकला.

खरोखर मोतीलाल मोठे दानशूर म्हटले पाहिजेत. त्यांनीं दान केलें व तेंहि अगदीं सत्पात्रीं केलें हें विशेष. संस्कृत भाषेंत एक सुभाषित आहे तें असें.

शतेषु जायते शुरः सहस्रेषुच पंडितः ।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवतिवानवा ॥

याचा अर्थ असा–शंभरांत एखादाच शूर असतो, हजारांत एखादाच विद्वान निघावयाचा, वक्ता झाला तरी दहा हजारांत एखादाच आणि दाता कधीं निपजला तरच निपजतो नाहीं तर नाहीं.

मोतीलाल नेहरूंमध्यें शूरत्व, विद्वत्ता नि वक्तृत्व हें तिन्ही गुण होते. परंतु चौथा महत्त्वाचा नि क्वचितच आढळणारा दातृत्वाचा गुणहि शंभर टक्के होता. आनंदभवनाचें त्यांनीं केलेंले दान ही त्या गुणाची जिवंत साक्ष होय. नंतर त्यांनीं नवें घर घेतलें, त्या घरालाहि त्यांनीं आनंद-भवन हेंच नांव दिलें.

स. १९३० रोजीं मार्च महिन्यांत म. गांधींनीं कायदेभंगाच्या लढ्याचें शिंग फुंकलें. दि. १२ मार्च १९३० रोजीं साबरमातीच्या आश्रमातून गांधीजी बाहेर पडले. ‘ या चळवळींत यश मिळालें नाहीं तर साबरमाती आश्रमांत पुन्हां पाऊल टाकणार नाहीं ’ व ‘ माझ्या आयुष्यांतील हा स्वराज्याचा शेवटचा लढा आहे ’ अशी निर्वाणीची प्रतिज्ञा करीत गांधींनीं आश्रम सोडला. त्यावेळीं त्यांच्याबरोबर ७८ स्वयंसेवक होते. हा जथा दांडीयात्रेला निघाला होता. २४१ मैलांचा पल्ला गांठावयाचा होता. गांधीजींना भेटण्यासाठीं मोतीलाल नि जवाहर-लाल जंबुसरला गेले. गांधींशीं विचारविनिमय केल्यानंतर मोतीलालनीं आपला ‘ आनंदभवन ’ वाडा राष्ट्रास देण्याचा निश्चय केला. वाडा कसा दिला त्याची हकिगत मागें सांगितलीच आहे. दि. ५ एप्रिल १९३० रोजीं गांधीजी दांडीला पोहोंचले. दि. ६ ला त्यांनी समुद्र-स्नान करून मीठ गोळा केलें. त्यानंतर त्यांनीं निवेदन केलें तें असें—

" मिठाच्या कायद्याचा भंग करून मी सत्याग्रह संग्रामाचा प्रारंभ केला आहे. या नंतर ज्या कोणाला तसल्या प्रकारचा कायदेभंग करण्याची इच्छा असेल त्याचा मार्ग आतां मोकळा आहे. "

दि. १४ एप्रिल १९३० रोजीं काँग्रेसचे तेव्हांचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांना अटक करण्यांत येऊन त्यांना सहा महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. अर्थातच चळवळ जास्त फोंफावली. दिं. ४ मे १९३० रोजीं पहाटें, दांडीपासून तीन मैलांवर असलेल्या कराडी येथील छावणींत गांधींना अटक करण्यांत येऊन येरवड्याच्या तुरुंगांत नेलें. त्यामुळें हजारों लोक तुरुंग भरूं लागले. सुमारें आठ–नऊ हजार लोक तुरुंगांत गेले होते. चळवळीचा जोर थांबला नव्हता.

पं. जवाहरलालनीं आपल्याला अटक झाल्यास गांधी यांनीं, अगर त्यांनाहि अटक झाल्यास मोतीलालनीं काँग्रेसचें अध्यक्षपद घ्यावें असें जाहीर केलें होतें. जवाहरलालना अटक झाल्यावर गांधींनी अध्यक्ष-पदास नकार दिला व पुढें तेहि तुरुंगांत गेले. तेव्हां पुन्हां काँग्रेसचें अध्यक्षपद मोतीलाल यांच्याकडे आलें. त्यावेळीं त्यांची प्रकृती फारशी चांगली नव्हती, तरीहि त्यांनीं तडफेनें कामास सुरूवात केली.

त्या सुमारास मोतीलाल यांची मुलगी कृष्णा हिला अटक करण्यांत येऊन पन्नास रुपये दंड अगर एक महिन्याची साधी शिक्षा फर्मावण्यांत आली. परन्तु कुणा अज्ञात इसमाने दंडाचे पैसे भरलें, हें वृत्त मोती-लालना कळल्यावर रागानें त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. त्यांनीं लागलींच वर्तमानपत्रांत निवेदन केलें. तें असें. " ज्या अज्ञात इसमानें दंड भरला आहे त्यानें माझी, माझ्या मुलीची आणि देशाची अपरिमित हानि केली आहे. आणि जर माझ्या देशबांधवांना माझ्याबद्दल कांहींही आदर वाटत असेल तर त्यांनीं, तो माणूस माझा व देशाचा अगदी प्राणघातक शत्रू आहे असें मानावें आणि असें मानूनच त्याच्याशीं

वागावें ! ! " या निवेदनावरून मोतीलाल किती बाणेदार होते नि त्यांची देशप्रिति किती जाज्वल्य होती याची कल्पना येईल.

मोतीलालनीं कामास सूरुवात केल्यानंतर सरकारनें दि. ३० जून १९३० रोजीं त्यांना अटक करून सहा महिन्यांची शिक्षा फर्माविली. त्यांना नैनीच्या जेलमध्यें नेण्यांत आलें. बरोबर डॉ. सय्यद महंमुदहि होते. त्याच तुरुंगांत जवाहरलालहि होतें. जवळच्याच कोठडींत वडिलांना पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. त्या स्थितींतहि मोतीलाल यांची वृत्ति विनोदी होती. ते हंसत हंसत आपल्या मुलाला--जवाहरलालना म्हणाले, " आतां आपण पुन्हां एकत्र येत आहोत ! " तुरुंगांत मोतीलाल यांची प्रकृति फार विघडली. त्यांचा दम्याचा विकार बळावला. तेव्हां त्यांच्या प्रकृतीकडे पाहून सरकारनें दि. ८ सप्टेंबर १९३० रोजीं त्यांची तुरुंगांतून सुटका केली.

तुरुंगांत असतांना मोतीलाल यांचे जेवण घरून येई. त्यांच्याकरतां घरून पंखा व पाणी थंड रहावें म्हणून शीतपेटी आलेली होती. ते सुटल्यावर जवाहरलालनी त्या वस्तू घरीं परत पाठविल्या, तेव्हां मोतीलालना फार राग आला. त्यांनीं शीतपेटी परत पाठवून जवाहरलालना लिहिलें, " तुला जर थंड पाण्याची जरुरी नसेल तर त्या शीतपेटीचा उपयोग महंमुदला होईल ! " खालावलेल्या स्थितितहि त्यांचा स्वभाव किती प्रेमळ होता, याची कल्पना या प्रसंगावरून यावी.

मोतीलालनीं सत्तरीच्या घरांत असतांना एकंदर १० आठवड्यांचा तुरुंगवास भोगला. नंतर त्यांची प्रकृती इतकी बिघडली कीं, तें किती दिवस जगतील अशी शंका अनेकांना वाटूं लागली. प्रख्यात कायदेपंडित, अव्वल दर्जाचें मुत्सदी, भारतातलें त्या काळचे प्रथम श्रेणीचे पुढारी, काँग्रेसचें अध्यक्षपद दोन वेळां लाभलेलें थोर गृहस्थ नि विधिमंडळांत आपल्या कर्तृत्वानें नि वक्तृत्वानें सरकारला जेरीस आणणारे पंडित मोतीलाल भीष्माचार्यांप्रमाणें शौर्य दाखवून आतां शरपंजरी पडलें होतें !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..............

: ७ :

# चिरनिद्रा

दि. ११ ऑक्टोबर १९३०,रोजीं जवाहरलाल यांची सहा महिन्यांच्या शिक्षेनंतर मुक्तता करण्यांत आली. नंतर तें मोतीलालना भेटण्यास मसूरी येथें गेलें. दोन तीन दिवस तिथें राहून तें पुन्हां अलाहाबादला आले. नंतर मोतीलालहि स्वगृहि आले. परंतु पुन्हां जवाहरलालना अटक करण्यांत आली. तो दिवस १८ ऑक्टोबर होता. मोतीलाल यांची प्रकृती तोळामासाच होती. तरीहि त्यांनीं १४ नोव्हेंबरला आपल्या मुलाचा, जवाहरलाल यांचा वाढदिवस थाटांत साजरा केला.

नंतर कांहीं दिवस मोतीलाल कलकत्त्यास होते. कलकत्त्यास तें प्रकृती सुधारण्यासाठीं येऊन राहिले होतें. कलकत्त्याच्या डॉ. निलरतन सरकार नि डॉ. उकिल वगैरे प्रख्यात डॉक्टरांनीं त्यांच्यावर औषधोपचार केलेहोतें. परन्तु त्यांच्या प्रकृतींत विशेष सुधारणा झाली नाहीं. एवढ्यांत जवाहरलाल यांच्या पत्नींना, कमला नेहरुंना अटक केल्याची बातमी समजल्यावर त्यांनीं धाकट्या कृष्णाला लगोलग अलाहाबादला धाडले व तेहि तिच्या पाठोपाठ निघाले. कांहीं दिवस घरांतल्या मंडळींत त्यांचें दिवस मजेंत गेलें. दि. १२ जानेवारी १९३१ रोजीं ते जवाहरलाल यांच्या भेटीसाठीं नैनी तुरुंगांत गेलें. जवाहरलाल त्यांना जवळ जवळ दोन महिन्यांनीं भेटत होते. वडिलांची क्षीण झालेली प्रकृती पाहून त्यांना धक्काच बसला. त्यावेळीं मोतीलाल यांच्या चेहेऱ्याला सूज आली असल्याचें जवाहरलाल

यांच्या लक्षांत आलें. हा फरक कांहीं क्षुल्लक कारणामुळें झाला असावा अशी मोतीलाल यांची कल्पना.: परंतु ती खोटी होती. त्यांची प्रकृति दिवसेंदिवस अतिशय थकत चाललेली होती, हेंच खरें ! जवाहरलाल यांच्या लक्षांत ही गोष्ट आली तरी वडिलांना त्यांनी तसें दर्शविलें नाहीं.

मोतीलाल यांचा सुजलेला चेहरा पाहून जवाहरलाल यांचा थरकाप उडाला. पुढें उपन्न होणाऱ्या मोठ्या आजाराची ही सुरुवात आहे, यांची कल्पना जवाहरलालना येऊन चुकली. परंतु पिता–पुत्र एकमेकांच्या प्रेमरज्जूनें इतकें जखडलेलें होतें कीं, वडिलांच्या मृत्यूची कल्पनाहि जवाहरलालना सहन होत नसे. मरणाची गोष्ट निघाली कीं, मोतीलाल खदखदा हंसू लागत. घरांतल्या मंडळींना, " मी आणखी पुष्कळ वर्षे जगणार आहे. " असें अभिमानानें सांगत असत. असें असलें तरी त्यांचा एखादा नि जुना स्नेही दिवंगत झाला कीं, त्यांना अगदीं एकाकी वाटे. परंतु त्यांचें ठसठशीत व्यक्तीमत्व, त्यांचा उत्साही स्वभाव अन् घरांतल्या मंडळींबद्दलची त्यांची आत्मीयता नि ओढ, यामुळें ते जगाचा निरोप घेतील अशी कल्पनाहिं कुणाच्या मनाला शिवत नसे.

जानेवारींत मोतीलाल यांची प्रकृति पुन्हां बिघडली. त्यामुळें दि. २६ जानेवारीला जवाहरलाल यांची तुरुंगातून मुक्तता करण्यांत आली. घरीं येऊन वडिलांना पाहिल्यावर त्यांचें काळीज करपून गेलें. कारण मोतीलाल ह्यांचें शरीर व्याधींनीं पोखरलेलें होतें. गांधीजीहि मोतीलाल यांच्या भेटीस तडक तुरुंगांतूनच गेले. दोघांच्या भेटीचा प्रसंग अत्यन्त हृदयस्पर्शी होता.

" स्वराज्य आपल्याला मिळणारच. फक्त तुम्ही या आजारांतून बरें झालें पाहिजे. " गांधीजी म्हणाले.

" शक्य नाहीं. मी आतां लौकरच जाणार. महात्माजी, मी स्वराज्य

पहाण्यास असणार नाहीं. परंतु तुमची जित झाली आहे असेंच मला वाटतें. स्वराज्य तुम्हाला लौकरच मिळेल. " मोतीलाल म्हणाले.

मृत्यूची सावली आतां मोतीलाल यांच्यावर पडत चालली होती. त्यांचे असंख्य मित्र नि नातेवाईकांनीं आनंदभवन भरून गेलें होतें. जुन्या आनंदभवनांत कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक भरलेली होती. परंतु मोतीलाल यांच्या प्रकृतीला उतार पडत नव्हता. दि. ४ फेब्रुवारीला त्यांची तब्येत थोडी बरी दिसली म्हणून डॉक्टरांनीं अधिक वैद्यकीय उपचारांसाठीं त्यांना लखनौला नेण्याचा निर्णय घेतला. क्ष किरणें काढण्याची सोय अलाहाबादला त्यावेळीं नसल्यानें त्यांना लखनौला हलविण्यांत आलें. मोटारनें त्यांना लखनौस नेलें. गांधीजी देखील त्यांच्या मागोमाग आले. मोटार अगदीं संथपणें नि हळुंहळूं गेली. तेवढ्या प्रवासानेंहि मोतीलालना अतिशय थकवा आला.

दि. ५ फेब्रुवारीला मोतीलालना ऑक्सीजनवर ठेवण्यांत आले. ती सबंध रात्र जवाहरलाल वडिलांच्या जवळ होते. स्वरूपराणीहि शेजारींच होत्या. ती रात्र म्हणजे काळरात्रच ठरली. रात्रभर मोतीलाल तळमळत होते. सकाळीं दि. ६ ला जवाहरलाल ह्यांचे त्यांच्या चेहऱ्याकडे लक्ष गेलें. त्यांची मुद्रा शांत दिसत होती. जवाहरलालना वाटलें कीं त्यांना झोप लागली आहे. त्यांची ती चिरनिद्रा आहे याची जवाहरलालना कल्पना नव्हती. परंतु सर्व प्रकार स्वरूपराणींच्या ध्यानांत चटकन् आला नि त्यांनीं एकच करुण किंकाळी मारली. तेव्हां जवाहरलालना सर्व कांहीं कळून चुकलें ! अशा रितीनें सर्व मानवी उपचार फोल ठरून दि. ६ फेब्रुवारी १९३१ रोजीं सकाळीं ६-३० वाजतां मुलाच्या उत्कर्षाकरितां सदैव झटणारा प्रेमळ पिता, भारतातला प्रख्यात कायदेपंडित, असेंब्लींतला पट्टीचा वक्ता, थोर मुत्सद्दी नि राष्ट्रकार्यार्थ आपलें सर्व कुटुंबच्या कुटुंब देशाला वाहणारा दाता नि जवाहरलाल

यांचे प्रेमळ पिताजी पंडित मोतीलाल नेहरूं यांनीं गायत्री मंत्र म्हणत म्हणत या नश्वर जगाचा अखेरचा निरोप घेतला. त्यांचा जन्म ६ तारखेला झाला आणि त्यांना मृत्यु आला तोहि ६ तारखेस, हाहि एक योगायोग म्हटला पाहिजे.

थोड्या अवधींत मोतीलाल यांच्या निधनाची वार्ता सर्व हिंदुस्तानात पसरून सर्वत्र शोकाची एकच लाट उसळली. नंतर अकरा वाजतां त्यांचे शव खादीच्या तिरंगी कापडानें आच्छादन करण्यांत आलें. खादीच्या तिरंगी झेंड्यानें नि फुलांनी मढविलेल्या मोटारींत त्यांचे शव ठेवण्यांत येऊन मोटार अलाहाबादला वाटचाल करूं लागली. मागच्या मोटारीत स्वरुपराणी बसल्या होत्या. त्यांच्याजवळ गांधीजी बसलेले होते. मोतीलाल यांचे शव संध्याकाळीं ४ वाजतां अलाहाबादेस आलें. कर्झन पुलाजवळ मोटार आल्यावर असंख्य माणसांनीं मूक अश्रू ढाळत ढाळत मोटारीवर अगणित फुलें उधळलीं. मोटार आनंदभवनांत आली त्यावेळीं सुमारें लाखाचा समुदाय बाहेर जमा झाला होता.

मोतीलाल यांची अंतयात्रा त्यांच्या दर्जाला नि इतमामाला साजेशी झाली. अंतयात्रेंत महात्मा गांधी, सरोजनी नायडू, पुरुषोत्तमदास टंडन, पंडित मदन मोहन मालवीय वगैरे पुढारी सामील झालेले होते. मृत्युनंतर सुमारें १२ तासांनीं संध्याकाळीं ६-३० च्या सुमारास मोतीलाल यांचें शव चंदनाच्या चितेवर ठेवण्यांत आलें.

अंत्यविधीच्या वेळीं गांधीजी म्हणाले, "गंगा यमुनांच्या या तीरावर त्या वीर पुरुषाचे शेवटचे अवशेष समोर आहेत." त्या अवशेषांसमोर प्रत्येक स्त्रीनें व प्रत्येक पुरुषानें शपथ घ्यावी कीं 'हिन्दुस्थानला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं.'

अशा रीतीनें मोतीलाल यांचें हें छोटें लौकिक चरित्र येथेंच संपलें.

वकिलीच्या व्यवसायात अमाप संपत्ती मिळविणारा, एक विलासी गृहस्थ जालीयनवाला बागेच्या कत्तलीचा अन्याय दिसतांच पैशाकडे पाठ करून नि फकिरी वृत्तीनें आपलें जीवन राष्ट्रसेवेला कसें अर्पण करूं शकतो याची सुरस कथा म्हणजेच मोतीलाल यांचें चरित्र. असेंब्लींतला थोर पुढारी म्हणूनहि त्यांची स्मृती भारतीय राजकारणांत अविस्मरणीय समजली पाहिजे. " जाहीर व्याख्यानांपेक्षां कायद्याच्या चौकटींत बसणाऱ्या वादविवादांत त्यांच्या वक्तृत्वाला विशेष तेज चढे. विनोद, वक्रोक्ति, कल्पना, विचार, स्वाभिमान व देशप्रेम या मालमसाल्याबरोबर त्यांच्या हजरजबाबीपणानें ते आपलें वक्तृत्व अत्यंत परिणामकारक करीत. बॅ. जिनासारख्यांशीं उत्तर प्रत्युत्तराची वेळ असल्यास असेंब्लीचे रणांगण बनें आणि तेथील गंभीर वातावरण अधिकच गंभीर व उत्कंठित बनें " असे गौरवाचे उद्गार मोतीलाल यांच्यासंबंधीं मराठी चरित्रकोशकारांनीं काढले आहेत त्यावरून त्यांची योग्यता चांगली ध्यानांत यावी. 'केसरी'नें त्यांच्या मुत्सदीपणासंबंधीं लिहितांना त्यांचें वर्णन केलें होतें तें असें :

' यांनीं पायांनीं घातलेली गांठ
सरकारला हातानेंहि उकलूं नये '

मोतीलालनीं चिरनिद्रा घेतली असली तरी 'केसरी'नें केलेल्या मोतीलाल यांच्या या गुणांची कीर्ती चिरकाल टिकेल.

* * *

: ८ :

# अलाहाबादचे नबाब

मोतीलाल यांच्या चरित्रांतील मुख्य गोष्टी अन् त्यांच्या कार्यांची माहिती येथवर क्रमशः सांगितली. आतां मोतीलाल यांची व्यक्तीविषयक माहिती निवेदन करावयाची आहे. मोतीलाल यांचें राजकारण फक्त १० वर्षांचें. परन्तु त्या दहा वर्षांत भारतांतल्या अग्रगण्य पुढाऱ्यांत त्यांची गणना होत असे. अशा या थोर पुढाऱ्याची नि आपल्या सांप्रतच्या पंतप्रधानांच्या—जवाहरलालजींच्या पिताजींची—मोतीलाल यांच्या व्यक्तीरेखेचें अन् त्यांच्या जीवनांतल्या छोट्या मोठ्या प्रसंगाचें वर्णन न केल्यास त्यांचें हें चरित्र अपुरें ठरेल.

पंडित मोतीलाल हे मोठे रुबाबदार गृहस्थ होते. 'लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील सर्वांत भव्य' असें त्यांचें वर्णन एका लेखकानें केलें आहे. उंचीनें ते मध्यम होते. 'केसरी'च्या कै. दि. वा. दिवेकरांनीं लिहीलेल्या 'स्वभावाचित्रें' पुस्तकांत त्यांनीं "स्वदेशींच पण अत्यन्त मौल्यवान पांढरा शुभ्र उत्तर हिंदुस्थानीं पद्धतीचा पोशाख, कांखेखालून लपेटलेली ती लखलखीत काश्मिरी शाल, देशभक्तीच्या पाण्यानें चमकणारे ते डोळे, दृढ निश्चयाची द्योतक अशी ती हनुवटी, करारीपणाचे दर्शक असें घट्ट दाबून धरलेले ते ओठ, सर्व अवयवांवर तावा चालविणारे असें रुंद कपाळ आणि भालपट्टावरहि अंमलदारी करीत असलेलें विविध अनुभवाचें आगर, राजकारणी चातुर्याची खाण व ज्ञानाची पेठ या

वर्णनास साजणारें त्यांचें उत्तमांग, या ईश्वरदत्त लवाजम्यानिशी एखादा महापुरुष केवळ हिंदुस्थानांतील वरीष्ठ कायदेमंडळांतच काय, पण जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रसमितींत दाखल झाला, तरी तिला आपल्या दीप्तिमान अस्तित्वानें शोभा आणणारच. तथापि हंसाचें यथार्थ सौंदर्य ज्याप्रमाणें मानससरोवरांत, त्याप्रमाणें पंडित मोतीलालजींचा खराखुरा गुणोत्कर्ष जनतेच्या मानस-सरोवरामध्यें प्रकाशमान व्हावा व तेथेंच त्यांचें विशुद्ध तेज प्रगट व्हावें यांत काय नवल?" असें सुंदर वर्णन मोतीलाल यांचे केलेलें आहे.

परंतु हें वर्णन मोतीलालनी देशासाठीं फकिरी स्वीकारल्यानंतर व कायदेमंडळांत गेल्यानंतरचें आहे. ते धिप्पाड दिसत, परंतु उंच मात्र फार नव्हतें. त्यांची शरीर प्रकृती वळकट होती. डोळे पाणीदार असत व चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचें तेज विलसत असे. आवाज पल्लेदार असून त्यांचे हंसणें इतकें मजलेदार अन् मोठ्यानें असें कीं, त्यांची प्रसिद्धि आख्या अलाहाबादेंतहि होती.

राजकारणांत पडण्यापूर्वीं मोतीलाल कसे होतें त्याचे खुमासदार वर्णन व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळातल्या अर्थखात्यांतल्या एका इंग्लिश गृहस्थानें केलें आहे. तें वाचनीय असल्यानें त्याचा गोषवारा देत आहे. तो सभासद लिहितो, " वृत्तीनें ते राष्ट्रीय असले तरी त्यांचा दृष्टीकोन विश्वबंधुत्ववादी होता. अन्य समाजांत व परधर्मियांशींहि ते फार सहिष्णुतेनें वागत. ते पहिल्या प्रतीचे वकिल असून कोर्टाचे खटले लढविण्यांत चांगले निष्णात होते. त्यांच्या वागणुकींत मोहकता, सुसंस्कृतपणा अन् सहिष्णुता याचें सुंदर मिश्रण आढळत असे. कुटुंबांतल्या मंडळींचें त्यांच्यावर पराकाष्ठेचें प्रेम होतें. यजमान असावा तर त्यांच्यासारखाच. त्यांच्या अतिथ्यशीलतेला तोड सांपडणें कठीण. त्यांच्या घरीं कुणालाहि मुक्तद्वार असे आणि अनेक लोकांना तिथे जीवनांतल्या सुखोपभोगांचें सेवन करतां

येत असे. त्यांचें व्यक्तिमत्व रुबाबदार होतें. नाकाडोळ्यांनीं ते नीटस असून वर्णानें अगदीं काश्मिरी ब्राह्मणांप्रमाणें गोरे होते. देशी काय अगर विदेशी काय त्यांचा पोषाख आकर्षक असें. ते जें काय करीत त्यांत त्यांचा उदार स्वभाव व्यक्त होत असे. हातचें राखून वागणें त्यांच्या स्वभावांत नव्हतें." मोतीलाल यांचें हें वर्णन 'सर' पदवी मिळालेल्या एका इंग्लिश इसमानें केलें असल्यानें त्यावरून त्यांच्या थोर व्यक्तिमत्वाची निश्चित कल्पना येते.

असहकारितेच्या चळवळीपर्यंत मोतीलाल यांच्या चेहेऱ्यावर भरघोस मिशा असत. पुढें त्यांनीं मिशांना कायमची रजा दिली. यासंबंधीं एक मौजेचा प्रसंग सांगण्यासारखा आहे. स. १९२४ मध्यें जवाहरलालनीं त्यांच्या वडिलांचें एक छायाचित्र गाधीजींना दिलें. त्या चित्रांत मोतीलाल यांचा चेहरा मिशाविरहित होता. तत्पूर्वीं गांधीजींनीं त्यांना पाहिले होते ते चांगल्या झुपकेदार मिशांच्या चेहऱ्यासहित. चित्र पाहिल्यावर गांधीजी क्षणभर चमकले, अन् थोडावेळ त्या चित्राकडे कुतूहलतेनें पाहूं लागले. मग त्यांच्या लक्षांत आलें कीं तें चित्र मोतीलाल यांचें आहे. तेव्हां गांधीजी हंसत हंसत म्हणाले, "माझी कुणाशीं गांठ आहे तें मला आज नीट कळलें."

या प्रसंगावरील जवाहरलालजींचें स्वदस्तुरचें वर्णन वाचण्यासारखें आहे. ते लिहितात, "मला अजून आठवतें कीं १९२४ सालीं गांधीजींना मी पिताजींचें छायाचित्र भेट म्हणून दिलें. त्यावेळीं गांधीजी व स्वराज्य पक्षाची मंडळी यांच्यामध्यें विस्तव जात नसे. गांधीजींना मी जें छायाचित्र दिलें होतें त्या छायाचित्रांत माझ्या पिताजींच्या रुबाबदार मिशांचा मागमूस नव्हता. हें छायाचित्र काढण्यापूर्वीं गांधीजींनीं माझ्या वडिलांना वेगळ्या स्वरूपांत म्हणजे मिशासह पाहिलें होतें. छायाचित्र दिल्यावर गांधीजी एकदम चमकले व बराच वेळ छायाचित्राकडे पहात

राहिलें. कारण पिताजींच्या मिशाच्या आड चेहऱ्यावरील कठोर भाव पूर्वीं दडला जात असे तो कठोर भाव, ती प्रतिबिंबित झालेली कणखर वृत्ती आतां स्पष्ट दिसत होती. पिताजींचे हंसरे डोळे मात्र कठोर मनास आवर घालण्याचे सामर्थ्य दर्शवित होते.......स्वराज्य पक्षाचे महान नेते म्हणून पिताजी तेव्हां सर्वांना माहीत होते. त्या पक्षाचें कामच त्यांच्या स्वभावधर्मास व पिंडास मानवणारें होतें." मोतीलाल यांच्या मिशा-संबंधीची मौजेची आठवण अशी आहे.

स्वभावानें मोतीलाल फार रागीट असत. एरवीं प्रेमळ परंतु रागावले कीं त्यांना क्रोध आवरतां येत नसे. त्यांच्या रागाची ग्वाही जवाहरलालनीं आपल्या आत्मचरित्रांत दिली आहे. त्यांच्या रागाचे एक दोन प्रसंग सांगण्यासारखे आहेत.

मोतीलाल ह्यांच्यापाशीं दोन सुंदर झरण्या होत्या. छोट्या जवाहरनीं त्या पाहिल्या व त्यांतली एक झरणी सरळ लंपास केली. पुढें ही गोष्ट
८ मोतीलालना समजल्यावर त्यांच्या रागाला पारावार राहिला नाहीं. त्या रागाच्या सपाट्यांत धाकट्या जवाहरला त्यांनीं यथेच्छ बडवून काढलें.

राजकारणांत पुढें मतभेद होत गेले. त्यावेळीं मोतीलाल यांच्या रागाची पट्टी इतकी चढे कीं त्या भरांत ते मुलाला म्हणजे जवाहरलालना 'घरांतून चालता हो' असें सांगण्यास कमी करत नसत. असह-कारितेच्या चळवळीनंतर नेहरू कुटुंब राहणीनें सर्व बाबतींत अतिशय साधें बनलें. जवाहरलाल गांवांत फेरफटका करीत, तोही बैलगाडींतून. एकदां ते असेच फिरून आले होते. मोतीलाल व्हरांड्यांत बसलेले होते. जवाहरलालना लांबून पाहिल्यावर ते कडाडले, "तुला घरांत यायचें असलें तर ती गाडी आपली बाहेरच ठेवून ये" उभय पिता-पुत्रांत अशा अनेक चकमकी त्यावेळीं होत.

तरी देखील घरच्या मंडळींचें त्यांच्यावर नि त्यांचें घरांतल्या मंडळीं-

वर अतिशय प्रेम असे. कुटुंबाचे ते एकमेव आधार असल्यानें सत्ता गाजविण्याची त्यांना अमर्याद हौस होती हें खरें. परंतु वेळ असला कीं ते घरच्या मंडळींत मिसळायचे, हास्यविनोद करायचे नि सुंदर कोड्या करून सगळ्यांना हंसवायचे. लहान मुलें त्यांना फार आवडत. पहिल्या शिक्षेच्या वेळीं आपल्या नातीला, प्रियदर्शनीला भर कोर्टांतहि ते कडेवर घेऊन बसले होते यावरून लहान मुलांवरील त्यांच्या प्रेमाची कल्पना येईल.

मोतीलाल यांच्या रागाची कल्पना म. गांधींनाहि असे. तरीहि ते मोतीलालना चाहत. एकदां त्यांनीं जवाहरलालना लिहिलें, "तुझे वडील सध्यां चिडलेल्या मनःस्थितींत आहेत. त्यांच्या रागांत भर पडेल असें मी किंवा तूं कांहींहि बोलूं नये. त्यांची चिडाचीड हीं ते दुःखी असल्याचें निश्चित लक्षण आहे. त्यांना दुःखांत पाहिलें कीं मी दुःखी होतो" कारणपरत्वें मोतीलाल रागावत–चिडतहि परंतु गांधींसारखी जगन्मान्य विभूतिहि त्यांच्या रागाकडे सहानुभूतीनें बघत असे ही एकच गोष्ट मोतीलाल यांच्या मोठेपणाची साक्ष देण्यास पुरी आहे.

मोतीलाल यांचा स्वभाव रागीट खरा. तरीदेखील ते कधीं कधीं भावनाप्रधान बनत. स. १९३० च्या सुमारास जवाहरलाल तुरुंगांत होते. त्यावेळीं मोतीलालनीं एक पत्र त्यांना लिहिलें. तें पत्र बोलकें असून मोतीलाल यांच्या स्वभावावर उत्तम प्रकाश पाडतें. ते जवाहरलालना लिहितात, "तुझ्या बगीच्यांत निघालेली 'गोड वाटाण्याची' कांहीं सुंदर फुलें माझ्या खोलींत आणलेलीं आहेत. तीं मी काळजीपूर्वक टिकवून ठेवत आहे. अजूनपर्यंत तीं अगदीं ताजीं आहेत. सुकण्याची कांहींहि चिन्हें त्यांच्यावर दिसत नाहींत." मुलावरील आपलें प्रेम मोतीलालनीं फुलांच्याद्वारें व्यक्त केलें. जवाहरलालनाहि फुलें आवडत. म्हणून त्या प्रेमळ पित्यानें आपल्या पत्राचा शेवट, फुलांची आठवण देऊन केला होता.

बाहेरच्या पाहुण्यांची मोतीलाल चांगली बडदास्त ठेवीत. हिंदूंची सोय

जवाहर–बहुराणी कमला, " बाप और बेटी " लंडन ( स. १९२७ )



# प्रेमळ पित्याचें पुत्रास पत्र ( स. १९२१ )

Chestnut Lodge
Almora
3. 6. 21

My dear Janardan

Your letter from Nagpur arrived this morning. I hope your tour was successful.

I am improving very slowly. The weather here is very unsettled. Some days & nights are very hot while others are quite cold. This is the 5th day of my stay here and I have no reason to complain. I should allow at least another 5 days for any marked improvement. As it is the asthma is very much better but I am still unable to go out for a walk. The short ascent from the house to the road is too much for me.

I do not at all like the step the Ali Bros have taken. Enclosed is a copy of the letter I have written to Lordship on the subject. The copy has been typed for me by Raj. I have not been able to express half of what I feel & my letter is a disjointed one but it will show how my mind is working.

Your loving
Father

करीत तशीच मुसलमानांचीहि. त्यांचें घर सुखसमृद्धिनें भरलेलें असे. पोहण्यासाठीं घरांत तलाव करणारे भारतांत ते पहिलेच वकिल असावेत. भारतांत पहिली मोटार त्यांनींच मागविली असें सांगतात. त्यांच्या घरांतले वातावरण अगदी नबाबी नि उमरावी थाटाचें. घरांत मित्रांमध्यें गप्पा मारण्यास ते बसत तेव्हां सर्वांचें लक्ष त्यांच्यावर खिळलेलें असें. एका चरित्रकारानें त्यांचें वर्णन मोठ्या बहारीचें केलें आहे तें असें :– " त्यांच्यांत एक प्रकाराचें व्यक्तीमत्व व राजबिंडेपणा होता. कोठेहि जातांच ते तेथील भव्य व प्रमुख व्यक्ती बनत. सौम्यता व पडतें घेणें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. म्युझियममध्यें दिसून येणाऱ्या रोमन बादशहाच्या पुतळ्याप्रमाणें त्यांच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचा बादशाही करारीपणा दिसे. " मोतीलाल यांचा रुबाब असा होता.

मोतीलाल स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें आलेले गृहस्थ होते. त्यामुळें अनेक गुणदोषांच्या मिश्रणाच्या छटा त्यांच्या व्यक्तिमत्वांत होत्या. ते जसे रागीट होते तसेंच मोठे स्वाभिमानी होते. घरांतल्या मंडळींना त्यांचा दरारा वाटे. त्यांच्या चेहेऱ्यावर धीरोदात्तपणाची कायमची वस्ती केलेली होती. ते कोणाला फसविण्याच्या फंदांत पडत नसत. परंतु त्याना फसवणेंहि अशक्यप्राय होते. ते मोठे व्यवहारी, धूर्त अन् जबर इच्छाशक्तीचे पुरुष होते. पड खाऊन वेळ मारून नेणें त्यांच्या स्वभावांत नव्हतें. त्यांचें बोलणें मोजकें पण मुद्दा न सोडणारें, करवती सारखें धारदार परंतु वक्रोक्तिपूर्ण अन् कोटीबाज असे. संभाषणांत पर्शियन नि अरबी काव्यांतल्या सुभाषितांची फेंक ते मोठ्या शिताफीनें करीत. आचार विचारांत नि सामाजिक व्यवहारांत त पुरोगामी व पुढारलेल्या वृत्तीचे होते.

ऐन उमेदींत मोतीलाल अत्यंत रसिक होते. शिकारीस जात तेव्हां त्यांच्याबरोबर अनेक शिकारी कुत्रे असत. घोड्यावर बसण्याची मांडहि

त्यांना चांगली साधलेली होती. कै. न. चिं. केळकरांनी आपल्या आत्मचरित्रांत त्यांचें वर्णन केलें आहे, तें मोठें वाचनीय आहे. केळकर लिहितात " पंडितजी हे खाण्यापिण्याच्या बाबतींत मोठे रसज्ञ असत.... पंडितजी खाजगी बोलण्याचालण्यांत मोठे चतुर. जेवणाखाण्याच्या टेबलाशीं जी नर्म संभाषणें, कोट्या–प्रति कोट्या व हास्यविनोद चालतो त्यांत युरोपियन लोकांच्या बरोबरीनें भाग घेणारें, किंबहुना त्यांच्यावर चढ करणारे असे होते." तरुणपणीं खाण्यापिण्याचे बाबतींत ते कसलाच विधिनिषेध बाळगत नसत. स. १९२० नंतर ही वृत्ती पालटली. ऐन उमेदींत ते अपेयपान करीत. असहाकारितेच्या चळवळीपासून त्यांनीं मद्यपान वर्ज्य केलें. त्यांच्या खाण्याच्या बाबतींतला एक मौजेचा प्रसंग सांगण्यासारखा आहे.

महाराष्ट्र सरकारचे माजी राज्यपाल श्रीप्रकाश नि त्यांचे वडिल कांहीं काश्मिरी पंडितांसह मोतीलाल यांच्याकडे भोजनास गेले होते. या सर्व मंडळींसाठीं शाकाहारी बेत ठेवण्यांत आला होता. मोतीलाल यांचें जेवण इंग्रजी पद्धतीचें केलें होतें. त्यांच्या जवळच्या बशींत अंडें होतें. अंडे दृष्टीस पडल्याबरोबर एक कर्मठ काश्मिरी पंडित कडाडला, " पंडितजी हे हो काय? अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम्! तुम्हीं अंडीं खाता? मोतीलालजी शांत होते. जरा वेळानें तें म्हणाले, " जरा सबूर तर करा. हें कांहींच नव्हे. अंड्याचे आई वडिलहि मागोमाग येणार आहेत. " अर्थात्च ब्राह्मण निरुत्तर झाला. सारांश मोतीलाल खाण्यापिण्यांत मोठे रसिक अन् चोखंदळ असत.

म. गांधींच्या प्रभावानें त्यांच्या जीवनांत क्रान्ति झाली. हजारों रुपयांच्या वकिलीच्या धंद्यावर त्यांनीं लाथ मारली. आपला धंदा बंद केला, तेव्हां त्यांनीं स्वतःचे घोडे अन् घोड्यांच्या गाड्या विकल्या. अनेक नोकरांना कायमची रजा दिली. घरच्या आचाऱ्यांतहि कपात केली. ऊंचीं

वस्त्रें टाकून ते खादीचीं जाडींभरडीं वस्त्रें परिधान करूं लागले. संपूर्ण वेळ कॉंग्रेस कार्य करणाऱ्यांना मासिक वेतन द्यावें असा एक बूट स. १९२४ मध्यें निघाला होता. मोतीलालनी त्यावेळीं प्रॅक्टीस सोडलेली होती. जवाहरलाल राजकीय कार्यच करीत असल्याने त्यांनाहि अर्थोत्पादनाचें दुसरें कसलेंच साधन नव्हतें त्यामुळें त्यांना फार खंत वाटे. मासिक वेतन घ्यावें कीं न घ्यावें असे विचार जवाहरलालजींच्या मनांत खेळत होते. मातीलालना ही हकिगत समजल्यावर ते जवाहरलालना म्हणाले, " मी कांहीं दिवस जरी कोर्टांत काम केलें तरी तुझी वर्षाची बेगमी करूं शकेन." त्यांच्या म्हणण्याचा रोख हा कीं जवाहरलालनी कॉंग्रेस-कडून कवडीहि न घेतां कार्य करावें.

पाहुण्यांची बूज राखण्यांत मोतीलाल जसे तत्पर होत त्याप्रमाणेंच घरांतल्या मंडळींच्या सुखसोयींकडेहि ते जातीनें लक्ष पुरवीत. कृष्णा-बाईनीं त्यांना एक ऊंची कोट लंडनहून आणण्यास सांगितलें. मोतीलाल लंडनला आले. परंतु मुलीच्या कोटाचें माप आणावयास मात्र ते विसरले. परंतु ते जराहि गोंधळले नाहींत. सरळ ते एका दुकानाच्या व्यवस्थापकाकडे गेले नि त्यांनी आपल्या फडर्या इंग्रजीत त्याला आपल्या मुलीच्या वयाच्या कांहीं मुलींना बोलावण्यास सांगितलें. त्यांच्या बोलण्यातलें लाघवहि असें, कीं त्या व्यवस्थापकानें खरोखरीच चार पांच मुली आणून उभ्या केल्या. त्यांतल्या कांहीं मुलींना कोट घालावयास लावून मग त्या मापानुसार त्यांनीं आपल्या मुलीकरतां कोट खरेदी केला. कितीहि रागावले तरी मोतीलाल मुलांच्या हौशी विनबोभाट नि बिनतक्रार पार पाडीत.

मोतीलाल बाहेरून कठोर वाटलें, तरी त्यांच्या अंतर्यामीं करुणेची झुळझुळ वहात असे. जवाहरलाल त्यांचे फार लाडके. जवाहरलाल यांच्या लहानपणापासून ते तरुणपणापर्यंतच्या छायाचित्रांचें एक पुस्तक

मोतीलालनी जवळ बाळगलें होतें व त्या पुस्तकाला ‘ From the cradle to Bar ’ असें नांव त्यांनीं दिलें होतें. पुढें जवाहर तुरुंगांत गेले. तेव्हां अंमळ विनोदानें मोतीलाल म्हणाले, “ अहो आतां From the Bar to the Prison Bar अशी या पुस्तकाची दुसरी प्रतिकृति मला तयार करावयास हवी.”

राजकारणांत मोतीलाल मुत्सद्दी म्हणून गणले जात. वकिली पांच-पेंच त्यांना चांगले अवगत असत. जिनांसारखा चढेल नि निष्णात कायदे पंडितहि त्यांच्या कोटीक्रमापुढें फिका पडे. उत्तरास प्रत्युत्तर, टोल्यास प्रतिटोला, अन् कोटीस कोटीनें उडवून लावून हजरजबाबीपणें उत्तर देण्यांत ते फार वाकबगार होते. वादाविवादांत ते कुणालाच हार जात नसत. असेंब्लीच्या कामकाजाच्या वेळी होणाऱ्या उत्तर प्रत्युत्तरांच्या सवाल जबाबांच्या वेळी त्यांच्या धारदार बुद्धिवैभवानें प्रतिपक्षाचे लोक अगदीं खजील होत. कै. वल्लभभाई पटेलाचे बंधू कै. विठ्ठलभाई पटेल हे देखील असेच. परन्तु मोतीलालनीं त्यांच्यावरहि एकदां मात केली. त्याची हकिगत अशी—

स्वराज्यपक्षाच्या सुरुवातीला अंमळ थट्टेनें विठ्ठलभाई पटेल मोतीलालना म्हणाले, “ तुम्हीं कौन्सिलांत जाऊन बसावयास भारी उल्हू झाला आहांत.” त्यावेळीं मोतीलाल कांहींच बोलले नाहींत. परंतु जेव्हां पटेल कौन्सिलचें अध्यक्ष झाले, तेव्हां सर्व सभासदांना हस्तांदोलनासाठीं त्यांनीं पाचारण केले. मोतीलाल यांची पाळी आली तेव्हां मागचा घाव त्यांनीं पटेलांवर अचूक उलटविला. ते हळूच पटेलांच्या कानांत म्हणाले, “ आतां आपण बडे उल्हू झाला वरे का ! ” या हल्यानें पटेल अगदीं खजील झालें.

मोतीलाल इंग्रजी फार चांगले लिहित. सर हारकोर्ट बटलर सारख्या आपल्या इंग्लिश अधिकारी मित्राला त्यांनीं लिहिलेलीं पत्रें पाहिलीं कीं त्यांच्या झोंकदार इंग्लीश लेखनशैलीचें कौतुक वाटतें. जाहीर व्याख्या-

नापेक्षां कायदेमंडळांतल्या वक्तृत्वाचा फड मारण्याकडे त्यांचा कल असे. कायदेमंडळांत आपल्या भाषणांनी ते सरकारला त्राही भगवान् करून सोडीत. वाद खेळण्यांत ते चांगलेच पटाईत होते. तशांत हजरजबाबीपणा अन् कोटीबाजपणा ही दोन शाब्दिक हत्यारें त्यांच्यापाशीं नेहमीं सज्ज असत. अर्थातच प्रतिपक्षी नामोहरम होत. त्यांच्या वक्तृत्वासंबंधीं लिहितांना " त्यांचें भाषण तीरासारखें सरळ व थेट लक्ष्यवेधक अशा स्वरूपाचें असावयाचें " असें उद्गार कै. दिवेकरांनीं आपल्या 'स्वभावचित्रें' या पुस्तकांत काढले आहेत ते यथार्थ आहेत. एकंदरीत मोतीलाल यांचें व्यक्तिमत्व अत्यंत विलोभनीय होतें.

गांधीजींना मोतीलाल यांच्या बुद्धिमत्तेबद्दल कौतुक वाटे. मोतीलालनाहि गांधींच्या बद्दल अपार आदर असे. गांधींच्या त्यागामुळें नि व्यक्तिमत्वामुळेंच मोतीलाल राजकारणांत ओढले गेले. गांधी पराकोटीचे विरागी तर हे विलासी वृत्तीचें. परंतु दोघांनीं एकमेकाची योग्यता ओळखली असल्यानें उभयतांचें सौहार्द कायम राहिलें. आपलें वजन खर्चून गांधींनी नाभाच्या महाराजांमार्फत एक मोठा खटला मोतीलालना मिळवून दिला होता आणि मोतीलालनी वकिलीचा व्यवसाय सोडल्यावरहि कांहीं विशिष्ट कारणांमुळें आग्रा येथील खटला त्यांना हातांत घ्यावा लागला तेव्हा कॉंग्रेस कार्यकारिणीकडून हा खटला चालविण्याची खास अनुमती गांधीजीनीच त्यांना मिळवून दिली होती. या दोन प्रसंगांवरून गांधीजी त्यांना किती चाहत याची कल्पना येईल.

मोतीलाल स्वकर्तृत्वावर नांवारुपाला आले असल्यानें त्यांच्या बोलण्याचालण्यांत एक प्रकारचा आत्मविश्वास ठासून भरलेला असे. वृत्तीनें मात्र ते हुकूमशहा होते. त्यांच्या वागण्यांत हिशोबीपणा असे. व्यवहार त्यांना चांगला समजे. त्यांच्या अंगीं संघटना कौशल्यहि जबर होतें. कुणी विरोध केलेला त्यांना मुळीच खपत नसे. स. १९२६ मध्यें हिंदूंच्या हितरक्षणाच्या

प्रश्नावर लाला लजपतराय व मालवीय यांच्याशीं त्यांचे मतभेद आले तेव्हां जवाहरलालना पत्र लिहून लालाजी नि मालवीयजींबद्दल तुच्छतादर्शक उद्गार काढावयास ते मुळींच कचरले नाहींत. याचा अर्थ त्यांना या उभयतांच्या देशभक्तीबद्दल अन् चारित्र्याबद्दल अनादर होता असें नव्हें. परंतु मतभेद आले कीं मोतीलालना भान रहात नसे. त्यांचे पूर्वग्रह जबर असत, त्यामुळें अनेकांची नाराजी त्यांना पत्करावी लागे.

असहकारितेच्या चळवळीपूर्वीं त्यांचा पोशाख ऊंची असे. नंतर अंगावर खादीची जाडीभरडी वस्त्रें खेळूं लागलीं. परंतु खादी वापरण्यातहि ते चोखंदळ असत. उंची पोशाख ते ज्या दिमाखांत वापरीत त्याच तऱ्हेनें ते उत्तम खादीची निवड करीत. इंग्रजी पोशाखांत जसें त्यांचें व्यक्तिमत्व उठावदार दिसे त्याप्रमाणें खादीच्या वस्त्रांतहि ते रुबाबदार दिसत. भारतातलें एक समन्वयवादी पुढारी अन् भारतांतले थोर कायदेपंडित कै. बॅ. जयकर त्यांना म्हणाले, " तुम्हांला कुठलाहि पोशाख खुलून दिसतो हें कसें काय ? " मोतीलाल मजलेदारी हास्य करीत म्हणाले, " You have to be born a Kashmiri to know this ; a rugged maratha like you can hardly understand this business— त्याकरितां काश्मिरी व्हावयांस पाहिजे. तें काम तुमच्या सारख्या रांगड्या मराठ्यांना जमणार नाहीं." खादीची गुरुकिल्ली त्यांनाच समजली होती. भाल्याच्या टोकाप्रमाणें त्यांची तिरकी खादी टोपी त्यांच्या भालप्रदेशावर फारच शोभून दिसे. आणि त्यामुळें असेंब्लींच्या सभागृहांत त्यांची मुर्ती मंदमंद पावलें टाकून प्रवेश करूं लागली कीं सर्व सभासदांच्या नजरा त्यांच्यावर खिळून रहात.

ऐन उमेदींत मोतीलाल्नीं हवा तेवढा पैसा मिळविला नि पाण्यासारखा खर्चहि केला. जीवनांतले सर्व सुखोपभोग त्यांनीं अनुभवलें. त्यांचे व्यक्तिमत्व रुबाबदार असलें अन् बोलणें मोठें कुर्रेबाज असलें तरी त्यांची

आदब अन् शिष्टाचार वाखाणण्यासारखे असत. पैशाची बेफिकीरी तर पुसूंच नका. घरांत एकदां चोरी झाली तेव्हां किती ऐवज गेला म्हणून विचारण्यास गांवांतली चार शिष्ठ मंडळी त्यांच्याकडे गेली. तेव्हां ' असेल तीनचार हजारांचें किडूकमिडूक ' असें बोलून ती चोरी आपल्या खिजगणतींतहि नाहीं असें त्यांनीं दर्शविलें. गांधींच्या सहवासांत आल्यावर त्यांची छानछोकीची हौस बंद झाली. जणूं त्यांचा पुनर्जन्मच झाला म्हणाना ! आपला राजवाड्यासारखा आपला भव्य नि शानदार वाडा मोतीलालनीं लेखणीच्या फटकाऱ्यासरशी राष्ट्राला कसा देऊन टाकला त्याची हकिगत मागें आलीच आहे. त्यावरून त्यांच्या उदार अंतःकरणाची कल्पना सहज येईल. आणखीहि एक प्रसंग त्यांच्या दातृत्वासंबंधीं सांगण्यासारखा आहे.

स. १९२३ मधें नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकरांनी ' नवाकाळ ' पत्र काढण्याचें ठरविलें तेव्हां पंडितजी स्वराज्यपक्षाचे प्रमुख होते. त्यांना आपल्या पक्षाचा प्रचार करणाऱ्या मराठी पत्राची गरज होती. 'नवाकाळ' हि त्यावेळीं स्वराज्यपक्षाच्या बाजूनें लिहि. ही गोष्ट समजल्यावर मोतीलालनी खाडिलकरांना आपल्या भेटीस बोलाविलें. खेरीज त्यांनीं काकासाहेबांना देण्यास दहा हजारांचा चेकही तयार ठेवला होता. परंतु खाडिलकर रक्कम स्विकारीनात. तेव्हां पंडितजींनीं अधिक रक्कम देण्याची तयारी दर्शविली. परंतु काकासाहेबांनीं त्यांना म्हटलें " मी तुमचेंच काम करीत आहे व पुढेंहि करीन. पैसे कशाला ? " नव्यानें सुरुं झालेल्या मराठी पत्राला दहा हजारांची रक्कम मोतीलालनीं देऊं केली, त्यावरून त्यांचें अंतःकरण किती उदार होतें याची कल्पना येतें.

मोतीलाल यांचा हात सढळ अन् स्वभाव खर्चीक. कंजूषपणा त्यांना ठाऊक नव्हता. त्यांनीं जवाहरलालना शिक्षणासाठीं इंग्लंडला पाठविण्याचें ठरविलें तेव्हांची गोष्ट सांगण्यासारखी आहे. मोतीलाल यांचे एक सहाध्यायी सर सुंदरलाल त्यावेळीं लखनौत रहात असत. त्यांनींहि अमाप

पैसा मिळविलेला होता. संयुक्त प्रांतांत या दोघांची गणना श्रीमंत माणसांत होई. परंतु सुंदरलाल फार मितव्ययी अन् कंजूष होते. मोतीलाल आपल्या मुलाला इंग्लडांत पाठविणार आहेत हें समजल्यावर सुंदरलाल मोतीलाल यांच्याकडे जाऊन त्यांना म्हणाले "कशाला मुलाला परदेशीं पाठवितां? किती खर्च येईल ?" "येईल लाख दीडलाख रुपयें" मोतीलाल म्हणाले. तेव्हां सुंदरलाल म्हणाले, "अहो ही नुसती उधळपट्टी आहे. हेंच लाख रुपये जर तुम्हीं त्याच्या नांवावर ठेवलेंत तर तुमचा मुलगा जन्मभर बसून खाईल कीं" तेव्हां मोतीलालनीं दिलेलें उत्तर मोठें बाणेदार अन् तेजस्वी होतें. ते म्हणाले, "माझ्यामागें मी त्याच्यासाठीं संपत्ति न ठेवतां त्याच्या रूपानें एक व्यक्ति निर्माण करून माझ्या मागें माझा वारसा म्हणून ठेवीन." मोतीलाल यांचे शब्द अक्षरशः खरें ठरले आहेत. ही गोष्ट जवाहरलाल यांच्याकडे पहातां दिसून येईल. मोतीलाल असे उदार अन् विशाल अंतःकरणाचे होते.

मोतीलाल यांचा स्वभाव मानी असे. संयुक्त प्रांताचे तेव्हांचे गव्हर्नर सर हारकोर्ट बटलर त्यांचे मोठे स्नेही. परंतु त्यांना पत्रें लिहितानांहि मोतीलाल आपला स्वतंत्र बाणा दाखवीत अन् त्यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानेंच वागत. त्यांना मोठमोठे ब्रिटिश अधिकारीहि कसे भिऊन असत त्याबद्दलची एक आठवण सांगण्यासारखी आहे. युरोपियन अधिकाऱ्यांशीहि ते बरोबरीनें कसे वागत याची खात्री या प्रसंगावरून पटावी. जवाहरलाल बॅरिस्टर होऊन आले तेव्हांची गोष्ट. त्यावेळीं त्यांना कुणी तरी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरना भेटण्याचा सल्ला दिला. जवाहरलाल त्याप्रमाणें त्यांना भेटून आले. पुढें गव्हर्नरहि एकदां भेटीसाठीं जवाहरलाल यांच्याकडे आनंदभवनांत गेले. गेल्यावर त्यांनी जवाहरलालना बजावून सांगितलें कीं "मी तुम्हांला भेटण्यासाठीं आलो आहे. तुमच्या वडिलांना नव्हे. ते मला कधींच भेटण्यासाठीं आले नव्हते." गव्हर्नर

वगैरेहि मोतीलालना कसे वचकून असत याची प्रचिती या प्रसंगावरून येते.

मोठमोठे सरकारी अधिकारीहि मोतीलाल यांच्या ऐश्वर्यापुढें नि त्यांच्या डामडौलापुढें अगदीं फिक्के पडत. प्रथम वर्गाच्या डब्यांतून प्रवास करतांना मोतीलाल यांचा राजशाही बिछाना पाहून एका कलेक्टराला आपलें अंथरूण घालण्याचीं शरम वाटली. बिचारा रात्रभर थंडीत कुडकुडत प्रवास करीत होता. मधेंच एकदां मोतीलालना जाग आल्यावर त्यांनीं कलेक्टरना न झोंपण्याचें कारण विचारलें. तेव्हां तो कलेक्टर मोठ्या आदबीनें म्हणाला, "आपला बादशाही बिछाना पाहून माझा दरिद्री बिछाना पसरण्याची मला लाज वाटली." मोतीलाल यांचा नबाबी थाट असा होता.

मोतीलाल यांचा कुटुंब परिवार म्हणजे पत्नी स्वरुपराणी, दोन मुली–सरुप नि कृष्णा व चिरंजिव जवाहरलाल नि त्यांचे कुटुंब. स्वरुपराणींनीं देखील आपल्या कुवतीप्रमाणें राजकारणात भाग घेऊन मोतीलालना त्यांच्या राजकीय कार्यात साथ केली. पती निधनानंतर सात वर्षे त्या हयात होत्या. स. १९३२ मध्यें दि. ८ एप्रिल रोजीं पोलिसांनीं केलेल्या लाठीहल्यांत त्यांना जबर दुखापत झाली. या दुखापतीचें शारीरिक परिणाम त्यांच्या प्रकृतीवर कायमचे झाले. मुळांतच त्यांची प्रकृती नाजूक होती. त्या लाठीमारानें त्यांची प्रकृती जास्तच अधु बनत गेली. तशांत तीन वेळां त्यांना अर्धांगवायूचे झटके आल्यानें त्यांच्या शरीरांत त्राण राहिलें नाहीं. अखेरीस स. १९३८ मध्यें जानेवारी महिन्यांत स्वरुपराणी स्वर्गवासी झाल्या.

मोतीलाल यांचे त्रिखंड कीर्तीचे चिरंजीव जवाहरलाल यांच्या विषयीं जास्त सांगण्याची गरज नाहीं. त्यांच्या पत्नी कमलाबाई स. १९३६ मध्यें निवर्तल्या. मुलगी प्रियदर्शनी श्रीमती इंदिरा गांधी यांनाहि

काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा लाभ झाला. मोतीलाल यांची मोठी मुलगी सरुप म्हणजे विजयालक्ष्मी पंडित आपल्या भावाप्रमाणेंच देशाची सेवा करीत आहेत.त्यांचे पती बॅ. रणजित पंडित हे स. १९४४ मध्यें तुरुंगांतच वारले. मोतीलाल यांची धाकटी मुलगी कृष्णा — सध्यांच्या कृष्णा हाथिसिंग, यांचे वास्तव्य मुंबईस असते. यांचे पती श्री. राजा हाथिसिंग हे सार्वजनिक कार्यांत हौसेनें भाग घेत असतात. कृष्णाबाई चांगल्यापैकीं लेखिका असून त्यांचें " विथ् नो रिग्रेटस् " हें पुस्तक अतिशय वाचनीय आहे. अशा रितीनें मोतीलाल यांची सर्व मुलें गुणी नि सद्गुणी निघालेलीं असून त्यांनीं आपल्या वडिलांची थोर परंपरा चालू ठेविलेली आहे. भारताच्या राष्ट्रीय इतिहासांत नेहरू कुटुंबांतल्या प्रत्येक व्यक्तीनें तुरुंगवास भोगलेला असून आपआपल्या कुवतीप्रमाणें देशसेवा केलेली आहे.

आपल्याकडच्या लो. टिळकांचें मित्र अमरावतीचे कै. दादासाहेब खापर्डे यांना जसे लोक 'वऱ्हाडचे नवाब' म्हणत असत. त्याचप्रमाणें मोतीलालनाहि कौतुकानें 'अलाहाबादचे नवाब' म्हणत. पंडित जवाहरलाल यांचे पिताजी, भारतातले प्रथम श्रेणीचे पुढारी, अन् 'अलाहाबादचे नवाब' पंडित मोतीलाल नेहरू यांचें व्यक्तिमत्व त्या काळीं अनेकांच्या स्मरणांत रहाणारें होतें !!

* * *

: ९ :

# श्रद्धांजली आणि पुण्यस्मरण

मोतीलाल यांची थोरवी किती वर्णावी ! कोणत्या शब्दांत वर्णावी ! त्यांच्या निधनानंतर अनेक पुढाऱ्यांनीं त्यांना श्रद्धांजली वाहिली. अनेक वृत्तपत्रांनीं त्यांच्यावर अग्रलेखांची गौरवांजली वाहिली. त्यांच्या मृत्यूनंतर दोन तपानंतरहि बॅ. जयकरांसारखे अव्वल दर्जाचे कायदे पंडित नि समन्वयवादी पुढारी आपल्या आत्मचरित्रांत मोतीलाल यांचें गुणवर्णन अतिशय आत्मीयतेने, जिव्हाळ्याने नि चटकदारपणें करतात. गतवर्षीं दि. ६ मे १९६१ रोजीं त्यांची जन्मशताब्दिहि भारतांत मोठ्या थाटामाटाने साजरी झाली. भारत सरकारच्या पोस्ट खात्यानें त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तिकिटेंहि काढलीं. त्यांच्या चित्रांचा एक संग्रह तेव्हांच्या राष्ट्रपतींना मोठ्या प्रेमानें नजर करण्यांत आला. एवंच मोतीलाल कालवश झाल्याला बराच कालावधी लोटला, तरी त्यांची कीर्ति अजूनहि टिकून आहे. असें भाग्य फार थोड्या पुढाऱ्यांना लाभतें.

अनेक नामवंत व्यक्तींनीं पुढाऱ्यांनी व वृत्तपत्रांनी मोतीलालना जी श्रद्धांजली वाहिली ती उधृत करून थोर नि स्फूर्तिदायक पंडितजींचें पुण्यस्मरण आपण संपवूं ! !

**महात्मा गांधी** :—अंत्यविधीच्या प्रसंगीं (१९३१) "पंडितजी मोठे वीरपुरुष नि लढवय्ये होते. देशासाठीं ते अनेक लढाया खेळले. परन्तु मृत्युशीं त्यांनीं दिलेली झुंजहि मोठी रोमहर्षक म्हटली पाहिजे. आणि या

झुंजीत ते यशस्वीहि झाले. कालच्या सकाळच्या त्यांच्या मनोधैर्यावरून ते आजारांतून उठतील असें सर्वांनाच वाटलें होते. कालच मी त्यांना म्हणालों. ‘ तुम्हीं बरें झालांत, तर मला स्वराज्य मिळालेंच असें समजा ’ तेव्हां मोतीलाल मला हंसत हंसत म्हणाले ‘ स्वराज्य आधींच मिळालेलें आहे. हजारोंनी पुरुष, स्त्रिया नि मुलें अपूर्व स्वार्थत्याग करण्यास पुढें येत आहेत नि अनेक लोक लाठ्या नि बंदुकीच्या गोळ्यांना धैर्यानें तोंड देत आहेत ही एकच साक्ष स्वराज्य येत आहे हें सांगण्यास पुरी आहे.’ पंडितजी थोर हृदयाचे नि स्थितप्रज्ञवृत्तीचे होतें. काल रात्रीं मला त्यांच्याशीं संभाषण करण्याची संधी लाभली नाहीं याबद्दल मला दुःख होतें. परन्तु त्यांच्या पत्नी स्वरूपराणी यांनीं मला ते गायत्रीचा जप करीत होतें असें सांगितलें. धर्माबद्दल त्यांनी अंधभक्ती कधींच दाखविली नाहीं. कांहीं वेळा तर ते धर्माची टवाळीहि करीत. धर्मांत शिरलेल्या बुवाबाजीबद्दल त्यांना मनापासून चीड होती. तरीं मला हें पक्कें माहित आहे कीं देवावर त्यांचा विश्वास होता. काल संध्याकाळी त्यांनीं रामनामाचा जप चालविला होता. दुखण्याबद्दल निराशेचा एकहि शब्द त्यांच्या मुखावाटे निघाला नाहीं. पंडितजींनी आपला एकुलता एक मुलगा, सून व जावई या सगळ्यांना देशकार्याची दीक्षा दिली.”

**बॅ. मुकुंदराव जयकर**—“आत्मचारित्र,” भाग १ ला : “ मोतीलाल यांची माझी पहिली भेट अगदीं योगायोगानें झाली. ती भेट झाली कलकत्याला अेका हॉटेलांत. त्यावेळीं मी कॉंग्रेसच्या अधिवेशनांना न चुकता जात असे. त्यावर्षी अधिवेशन कलकत्यास भरलें होतें. जेवणाच्या वेळीं मी आंत गेलों तो तिथें मला एक सुंदर टेबल दिसलें. तें टेबल चांगलें सजविलेलें असून बारा माणसांच्या जेवणाची सोय त्यावर केलेली होती. आमची एवढी बडदास्त ठेवणारा यजमान कोण आहे तें जाणून घेण्याची चुटपूट मला लागली होती. दहा मिनिटांनी झोंकदार पोशाखांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम                    दि: ........ ... ........
: ७७ क्रमांक          नों: दि: ....श्रद्धांजली आणि पुण्यस्मरण

मोतीलाल तिथे हजर झाले. त्यांच्यावरोबर त्यांच्या कुटुंबांतली सर्व सुस्वरूप मंडळी हजर होती. त्यांच्या बरोबर कांही युरोपियन पुरुष नि आंग्ल स्त्रियाहि होत्या. टेबलाजवळ बसल्यानंतर सर्वांच्या नजरा मोतीलाल यांच्यावर खिळल्या होत्या.

मी चौकशी केली तेव्हां मला समजले कीं, ते अलाहाबादचे प्रख्यात वकील, नि कायदेपंडित मोतीलाल होते. दुसऱ्या दिवशीं कांहीं बंगाली प्रतिनिधींनीं आम्हांला खाना दिला त्यावेळीं मला त्यांच्याशीं बोलण्याची संधी मिळाली. त्यांच्याशी नि त्यांच्या मुलाशीं बातचीत करण्यांत मला आनंदच झाला. त्यावेळीं पुढे हे मोतीलाल स्वराज्य पक्षाची धुरा वाहतील आणि नखशिखान्त खादीचा पोशाख करतील हें माझ्या ध्यानींमनींहि नव्हतें."

**पंडित जवाहरलाल नेहरू**—"आत्मचरित्र" (१९३६): "मी वडिलांना अतिशय चाहत असे. मी पाहिलेल्या मंडळीत ते मला जबर इच्छाशक्तीचे, धैर्याचे नि तल्लख बुद्धीचे वाटत. मी नेहमी अशी आशा बाळगीत असे कीं मोठेपणी त्यांच्यासारखें व्हावें. परन्तु मला जरी ते इतके आवडत अन् माझें त्यांच्यावर पराकाष्ठेचे प्रेम असलें तरी मला त्यांची फार भिती वाटायची. त्यांच्यासारखा रागीट इसम मी तरी पाहिलेला नाहीं. परन्तु सुदैवानें त्यांच्यापाशी विनोदबुद्धिहि असल्यानें ते राग कह्यातहि ठेवीत.....त्यांच्या मुलांवर त्यांचे आतिशय प्रेम होतें. आपल्या प्रेमाचें ते कधीं प्रदर्शन करीत नसत. परन्तु त्यांच्या मनाच्या कवाडांत प्रेमाचा सांठा भरपूर असे. तुरुंगात माझी स्थिती काय होत असेल त्याची खातरजमा करण्यासाठीं ते नुसत्या फरशीवर झोंपून पहात हें मला नंतर कळलें !!!"

**उपराष्ट्रपति राधाकृष्णन्**—(९-४-१९६१): "इतर स्वयंभू पुरुषांप्रमाणें ते बंडखोर मुत्सद्दी, धैर्याचे मेरुमणी नि मोठे लाघवी होते.

त्यांचें दातृत्व हा आख्यायिकांचा विषय बनला. सुसंस्कृतपणा नि नेतृत्व करण्याची धमक हे त्यांचे प्रमुख गुण. ते पहिल्या प्रतीचे कायदेपंडित होते. असेंब्लीतलें पट्टीचे वक्ते होते. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासांतले ते एक महान् पुढारी होते."

**अन्नमंत्री स. का. पाटील**—(१९६१) : "देशाच्या हांकेला ओ देऊन ज्यांनीं अमाप संपत्ती देणारा आपला वकिलीचा व्यवसाय बंद केला, अशा मंडळीत त्यांचे व्यक्तिमत्व राजबिंडे दिसे. असहकारितेची चळवळ एवढ्या सामुदायिकपणें फोंफावली याचें कारण म्हणजे देशबंधू चित्तरंजन दास नि पंडित मोतीलाल नेहरू ह्या जोडगोळीनें केलेला स्वार्थत्याग. देशासाठीं त्यांनीं सर्वस्व दिलें. त्यांची पत्नी पुत्र नि इतर कुटुंबिय राष्ट्रसेवेंसाठीं सामिल झालीं."

**राज्यपाल श्रीप्रकाश** (मुंबई) सुंदराबाई हॉल, ७–५–६१

"मोतीलाल नेहरू हे कट्टर सुधारणामतवादी होते व ते त्याबाबतींत कधी कुणाला शरण जात नसत. असें असलें तरी शेवटीं ते गांधीजींना शरण जात. १९१९ सालीं जालीयनवाला बागेंतल्या अत्याचारानंतर त्यांचा ब्रिटिशांच्या न्यायदानावरील विश्वास उडाला. त्यांनी इंग्रजी पद्धतीचा पोशाख फेकून दिला. खादी परिधान केली व गांधीजींच्या असहकारितेच्या व मीठाच्या सत्याग्रहांत त्यांनी उडी घेतली. सार्वजनिक कार्य करीत असतांनाही मोतीलालजींचे आपल्या कुटुंबियांकडे बारीक लक्ष असे. वारंवार त्यांची ते विचारपूस करीत व त्यांच्यावर प्रेमहि करीत. अनेक सार्वजनिक कार्यकर्त्यांना हें साधत नाहीं. परन्तु मोतीलालजींना मात्र हें साधलें होतें व म्हणूनच त्यांचे सर्वच्या सर्व कुटुंब त्यांच्याबरोबर तुरुंगात गेलें होते."

**राज्यपाल काकासाहेब गाडगीळ**—'दीपावली' ऑगस्ट ६१ "मी

इंग्लंडला एकदां नव्हे दहा वेळां जाण्यास तयार आहे पण स्वराज्याची वकीली करण्यासाठीं अगर स्वराज्याचा हक्क शाबीत करण्यासाठीं जाणार नाहीं. स्वराज्य प्रत्येक देशाचा हक्क आहे" (I am prepared to go to England not once but ten times but not to argue the case for Swarajya) १९२८ च्या डिसेंबरमध्यें कलकत्ता येथें, जो नेहरू रिपोर्ट या नांवानें प्रसिद्ध आहे त्याचे चर्चेच्या प्रसंगांत वरील आशयाचे उद्गार पंडित मोतीलाल नेहरू यांनीं काढले व माझ्या मतानें त्यांच्या राजकीय दृष्टीकोनाचे तें खरें खरें प्रतिबिंब आहे...भारताच्या इतिहासांत कॉंग्रेसच्या स्थापनेपासून कितीतरी व्यक्ति राजकारणांत आल्या, वावरल्या व लौकिक मिळवून लुप्त झाल्या. त्या सर्वांचे जन्मशताब्दि उत्सव झाले नाहींत. तथापि मोतीलाल नेहरू यांचा जन्मशताब्दि उत्सव होत आहे यांत त्यांच्या कर्तृत्वाबरोबर देशाची कृतज्ञता ही तशी कारणीभूत आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या एकमेव पुत्राचें व्यक्तित्व व क्रांतिकारी कर्तृत्व हींहि कारणीभूत आहेत. असे म्हणतात कीं डॉ. हृदयनाथ कुंझरुंचे वडील, पंडित अयोध्यानाथ हे इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे मंत्री होते, त्यावेळीं हृदयनाथ हे लहान होते. तेव्हां त्यांच्या एका मित्रानें अशी कोटी केलीं होती कीं, आज हे लहान बालक अयोध्यानाथ यांचा मुलगा म्हणून जरी माहित असले तरी कालांतरानें पंडित अयोध्यानाथ हे पंडित कुंझरू याचे वडील म्हणून लोकांच्या डोळ्यापुढें राहातील. यातील भविष्यवाणी अयथार्थ नव्हती. क्षणभर थोडेसे तसेच मोतीलालजींच्या बाबतींत म्हणता येण्यासारखें आहे व असें म्हणण्यांत, पितापुत्रांपैकीं कुणालाहि कमी लेखण्याचा हेतू नाहीं. पण विद्यमान संदर्भांत मोतीलालजींच्या ऐन गुणांना जवाहरलालजींच्या पितृत्वानें उजाळा आला आहे यांत शंका नाहीं.

पंडित मोतीलाल नेहरू हे युगपुरुष होते असा दावा कोणी करणार नाही. तथापि त्यांच्या समकालीनांत ते आघाडीवर होते व त्यांच्या

पिढींतील राजकीय कर्तृत्वांत त्यांचा मोठा भाग होता असे म्हणण्यांत यत्किंचितहि अतिशयोक्ती नाहीं... अमर्याद पैसा व अमर्याद लौकिक या व्यवसायांत ज्या थोड्या व्यक्तींच्या वांट्याला आला त्यांत ते एक होते. वकीलीचा व्यवसाय करताना व्यवसायाची नीतिमूल्ये त्यांनी कांटे-कोरपणें पाळली. येवढेंच नव्हे तर स्वतःची अशी श्रेष्ठ व उज्ज्वल मूल्ये पण, निर्भिडपणें व निश्चयानें जोपासली......आत्मविश्वास त्यांचा एवढा दांडगा होता कीं, एखाद्या दस्तऐवजाचा अर्थ आपण करूं तो निःसंशय न्यायाधिश मानील अशी त्यांची खात्री असे. या संबंधांत कै. नृपेंद्रनाथ सरकार यांनी प्रस्तुत लेखकाजवळ एक गोष्ट सांगितली. पाटणा हायकोर्टांत एका मोठ्या जमिनदारीविषयीं मुकदमा चालू होता व त्यांत कांहीं फारसी वाक्यांचा अर्थ मोतीलालनी लावला होता व तो तसा नाहीं असें नृपेंद्रनाथ यांचे म्हणणें होतें. तेव्हां मोतीलालनीं त्यांना सांगितलें कीं माझा अर्थ न्यायाधिश मान्य करील; मान्य न केल्यास व तुमचा अर्थ मान्य केल्यास मी रु. ५ हजार तुम्हांस देईन. निकालांत मोतीलालजींचा अर्थ न्यायाधिशानें मानला नाहीं. खटल्याच्या निकालानंतर २–३ वर्षांनीं ५ हजार रुपये दर्शनी किंमतीचे अलाहाबादच्या एका कंपनीचे भाग नृपेंद्रनाथ यांचेकडे त्यांनीं धाडून दिले......कोर्टापुढें आपलें म्हणणें मांडतांना त्याबाबत मोतीलालजी किती तयारी करत असत यासंबंधी मोहनलाल सक्सेना यांनीं आपल्या आठवणींत असे सांगितलें आहे कीं, ते पहांटे उठून तासन्तास कज्जाचे कागद पहात. तसेंच निरनिराळ्या न्यायाधिशांचे लागू पडणारें निकाल वाचत व एखादें चिरेबंदी व योजनाबद्ध घर बांधावे त्याप्रमाणें त्यांची मांडणी असे. त्यांचा निर्भिडपणा पुष्कळ वेळा न्यायाधिशांना पसंत नसे तथापि त्यांची निःस्पृहता एवढी होती कीं, कोर्टांतील वातावरण त्यांच्या विरुद्ध क्वचितच असे. उत्कृष्ट तयारी, हजरजबाबीपणा, सामायिक विनोदबुद्धि यामुळें वकिलीच्या व्यवसायांत यश

त्यांच्यापुढें हात जोडून असे. संपत्तीचा ओघ 'गुणलुब्धा स्वयमेव संपदा' या नात्यानें त्यांच्याकडे सारखा वाहात-होता."

## "मराठा" (पुणें); मृत्युलेख : (१९३१--इंग्रजी)

"मुत्सद्दीपणा नि राजकीय कार्यकर्तृत्व याप्रमाणें पंडितजींचा त्यागहि अलौकीक होता. राष्ट्राला त्यांनी अर्पण केलेला 'आनंद भवन' वाडा ही त्याची साक्ष जनतेच्या मनांत अगदीं ताजी आहे. त्यांच्या पैशाच्या दिल्दारीलाहि तोड नाहीं. त्यांचे घर म्हणजे राष्ट्रीय पुढाऱ्यांचे विश्रांति-स्थानच बनलें होतें, शिष्टाचार, सुसंस्कृतपणा अन् वागणुकींत त्यांची गणना आदर्श पुरुषांतच करावयास हवी."

## "केसरी" (पुणें); मृत्युलेख : ७-२-१९३१

### 'भारतमातेचा कंठमाणि गळून पडला'

"पंडित मोतीलाल यांच्यासारखें ऐश्वर्य हिंदुस्थानांत तरी फारच थोड्यांच्या वांट्यास येणारे आहे. एखादा व्हॉईसराय किंवा एखादा गव्हर्नर काय सुख भोगील इतकें सुख पंडित मोतीलाल यांनी भोगलें व ते केवळ स्वतःच्या बुद्धिबळावर,.........पं. मोतीलाल हे फार हौशी गृहस्थ व ती हौस त्यांस मिळालेल्या संपत्तीच्या साहाय्यानें त्यांना हवी तशी पुरवून घेतां आली. त्यांनी पोशाखाचा, सुंदर इमारतींचा, प्रवासाचा, खाण्यापिण्याचा व शिकारीचा असा आपला हरएक प्रकारचा षोक पुरविला. गव्हर्नर साहेब त्यांचे मित्र, युरोपियन नर्स ही त्यांच्या मुलांची दाई व आनंदभवन हे त्यांचे निवासस्थान. अशा सुखविलासांत लोळणारा राजबिंडा आनंभवनांतून कारागृहांत कधीं काळीं जाईल, रेशमी व उंची कपडे टाकून जाडी-भरडी खादी कधीं काळीं पांघरील व गव्हर्नर साहेबासारख्यांचे मित्रत्व सोडून कधींकाळीं त्यांचा प्रतिस्पर्धी बनेल हें कोणीं कोणास एक तपापूर्वी सांगितलें असतें तर तें खरें वाटलें

असतें काय ? पण हिंदुस्थानचें दैव थोर म्हणून त्यांस राजकारणांत शिरण्याचीच बुद्धि सुचली व त्यांची ती बुद्धि एका तालुकदाराविरुद्ध दुसऱ्या तालुकदाराची वकिली चालविण्याऐवजी नोकरशाहीविरुद्ध हिंदी जनतेची वकिली चालविण्यास उपयोगी पडली. ”

“ ते स्वराज्य पक्षाचे अध्वर्यु होते व पुढारी या नात्यानें त्यांनीं तेथें सहा वर्षे जी कामगिरी बजावली ती त्यांच्या आयुष्यांत अत्यंत महत्वाची गणली जाईल. असेंब्लींतील स्वराज्य पक्षांत राष्ट्रांतील प्रांताप्रांताचे निवडक व नांवाजलेले पुढारी होते. त्यांची स्वतंत्रवृत्ती, स्वभावभिन्नत्व व मतवैचित्र्य लक्षांत घेतां त्या सर्वांचे नायकत्व आपल्या मुठींत ठेवणाराचें अंगीं प्रसंगावधान, व्यवहार चातुर्य, धूर्तपणा, वरिष्ट प्रतीची बुद्धिमत्ता व मुत्सद्देगिरी इत्यादि किती तरी गुण पंडितजींच्या अंगी असल्यानें त्यांनीं आपल्या पक्षाची एकजूट राखून सरकार पक्षास सळो का पळो असें करून सोडलें. स्वतः मोतीलाल हे फारसें बोलत नसत. पण ते जेव्हां बोलत तेव्हां प्रतिपक्षास असा पेच घालीत की नको या काश्मिरी पंडिताशीं गांठ असें सर माल्कम हेलेसारख्या मंत्र्यालाहि होऊन जाई. पंडितजींनीं पायांनी मारलेली गांठ प्रतिपक्षास हातांनींहि सुटूं नये असा त्यांच्या बुद्धिचातुर्यांत कुशाग्रपणा होता. त्यांनीं नोकरशाहीवर मिळविलेल्या विजयाच्या स्तुतीचें प्रतिध्वनी असेंब्लीच्या सभागृहांत अद्यापिहि बारीक रितीनें कान देणारास ऐकूं येतील. ”

“ लॉर्ड बर्कनहेड भारतमंत्री असतां हिंदु पुढाऱ्यांना तुम्हीं स्वराज्य मागतां पण स्वराज्याची योजना कागदावर लिहून काढण्यास कां कचरता म्हणून मोठ्या आढ्यतेनें हिणवीत होते. बर्कनहेडसाहेबांची ही आढ्यता पं. मोतीलाल यांनीं चालूं न देतां त्यांनीं नेहरू रिपोर्ट या नांवानें जगजाहीर झालेली योजना आपल्या कमिटीच्या मदतीनें तयार केली. व त्याबद्दल सर्वांकडून वाहवा मिळवून घेतली. परंतु ही योजना जितक्या

आस्थेनें व परिश्रमानें त्यांनीं बनविली तितक्याच त्यागबुद्धिनें व लीलेनें लाहोर काँग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यानंतर फाडून टाकल्याचें जाहीर करतांना त्यांना मुळींच खेद वाटला नाहीं."

" पं. मोतीलाल यांनीं राजकारणांत एकदां पडण्याचें ठरविल्यानंतर धरदार, पैसा अडका, कन्यापुत्र व पत्नी यांपैकीं कशाचीहि आस्था ठेवली नाहीं. पं. जवाहरलाल हें बोलून चालून तरुण पिढीतले. व पंडित मोतीलाल नाहीं म्हटलें तरी जुन्या पिढीतलें. तेव्हां उभयतांच्या राजकीय विचारसरणींत वयोमानानें तफावत ही पडावयाचीच व जवाहरलाल यांच्या इतकें जाज्वल्य ध्येयवादित्वहि पं. मोतीलाल यांचें अंगीं नसावयाचें. तरी पण आपला मुलगा स्वातंत्र्यवादी निघाला, म्हणून मोतीलाल यांनीं त्यांचा निषेध केला नाहींच. उलट त्याच्याशीं मिळतें घेऊन त्यांच्या कार्यास जितकें सहाय्य करतां येईल तितकें करण्यांस मुळींच कसूर केली नाहीं. प्रेमळ पिता, निःस्सीम मित्र, विश्वासू पुढारी या संबंधाचें यापेक्षां लोकोत्तर उदाहरण जगांत क्वचितच आढळेल. पं. मोतीलाल यांसारखी माणसें कोणत्याहि देशांत दुर्मिळच होत. मग ती हिंदुस्थानासारख्या परतंत्र राष्ट्रांत याहुनहि दुर्मिळ असावीत यांत नवल तें काय ? जसें प्रत्येक पर्वतात माणिक आढळत नाहीं, किंवा प्रत्येक गजाच्या गंडस्थळांत मौक्तिक मिळत नाहीं त्याचप्रमाणें प्रत्येक माता-पितरांच्या पोटीं मोतीलालसारखी माणसें जन्मास येत नाहींत."

## " हिंदुस्थान टाईम्स " ( दिल्ली ) मृत्युलेख :

" त्यांचे आयुष्य वीराप्रमाणें तेजस्वी होतें. त्यांना हुतात्म्याचेंच मरण आलें. विधीमंडळांत सहा वर्षें त्यांनीं जी कामगिरी केली त्यांत त्यांचे धैर्य नि मुत्सद्दीपण दिसून आलें तिथें स्वपक्षांतच नव्हे तर प्रतिपक्षीयांच्या प्रेमासहि ते पात्र झाले. "

### " अमृतबझार पत्रिका " ( कलकत्ता ) मृत्युलेख :

" त्यांची परिपक्व बुद्धिमत्ता, त्यांचे दृष्टेपण, त्यांचे धैर्य वगैरे गुणांचा आतां राष्ट्रास उपयोग होणार नाहीं. त्यांचे ठसठशीत व्यक्तिमत्व, त्यांचें खडकासारखें निश्चल मन, नि मित्रांना अन् प्रतिपक्षांनाहि आपल्याकडे ओढून घेणारें त्यांचे लाघव आतां राष्ट्राच्या संकटसमयीं मदतीला येणार नाहीं."

### " लीडर " ( अलाहाबाद ) मृत्युलेख :

" राजकारणातलें डावपेंच खेळण्यांत ते निष्णात होतें. "

### " हिंदु " ( मद्रास ) मृत्युलेख :

विधिमंडळांत ज्या इंग्लिश सरकारी सभासदांशी त्यांची शाब्दिक झटापट नि झुंज झाली त्यांचे मत कांहींहि असो, आतापर्यंत झालेल्या विधिमंडळातल्या पट्टीच्या वक्त्यातच त्यांची गणना करावयास हवी. "

### " क्रॉनिकल " ( मुंबई ) मृत्युलेख :

गेल्या दहा वर्षांत टिळक, दास, अजमलखान, लाला लजपतराय नि महंमदअल्ली वगैरे पुरुषश्रेष्ठ दिवंगत झाले. पंडित मोतीलाल यांचा पाटहि या मंडळींच्या पंगतीतच मांडावयास हवा."

* * *

# परिशिष्ट

## नेहरू रिपोर्टांतील प्रमुख कलमें

हिंदी लोकांना राज्यघटना कशी हवी तें त्यांनीं आम्हांस एकमुखानें सांगावें असें भारतमंत्री बर्कनहेड यांचें सांगणें असे. त्याला अनुलक्षून देशांतल्या प्रमुख पक्षांच्या सहकार्यानें मोतीलाल नेहरूंनीं एक अहवाल तयार केला. त्या अहवालाला 'नेहरू रिपोर्ट' म्हणतात. या रिपोर्टांत हिंदुस्थानासाठीं "वसाहतीच्या स्वराज्या"ची मागणी करण्यांत आली होती. मुसलमानांच्या स्वतंत्र मतदार संघास त्यांत विरोध केलेला असून मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा ठेवण्यास त्यांत मान्यता देण्यांत आली होती. हा रिपोर्ट ऑगस्ट महिन्यांत स. १९२८ मध्यें प्रसिद्ध झाला. या रिपोर्टाचा विचार करण्यासाठीं त्याच महिन्यांत लखनौ येथें सर्वपक्षीय परिषद भरली होती. या परिषदेला महमुदाबादचे राजेसाहेब, सर अली इमाम, सर शंकरन् नायर, सर रामस्वामी अय्यर, सर तेजबहाद्दूर सप्रू, पं. मोतीलाल नेहरू वगैरे मंडळी उपस्थित होती. गांधीजींची या रिपोर्टास मान्यता होती.

नेहरू रिपोर्टांत एकंदर ८७ कलमें होतीं. त्यांतील प्रमुख नि महत्त्वाचीं कलमें खालीं दिलीं आहेत.

### नेहरू रिपोर्टांतील कांहीं कलमें

( १ ) वसाहतीच्या नमुन्याचें स्वराज्य आज ज्या देशांत आहे ते देश हे-कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका नि आयर्लंड. या प्रत्येक देशांत स्वतंत्र पार्लमेंट असून, तेथील प्रधान मंडळ त्या पार्लमेंटच्या हुकुमाप्रमाणें वागते. हिंदुस्थानांतहि अशा प्रकारचें स्वराज्य असावें.

( २ ) हिंदी पार्लमेंटनें केलेले कायदे सर्व हिंदुस्थानभर अंमलांत येतील. तसेंच हिंदुस्थानालगत समुद्रावरहि कांहीं मैलापर्यंत या कायद्यांचा अंमल राहिला पाहिजे. अशा रितीनें हिंदी पार्लमेंट स्वतंत्र

झालें म्हणजे विलायतेंतील पार्लमेंटानें केलेल्या कोणत्याहि कायद्याचें बंधन हिंदुस्थानावर रहाणार नाहीं. हिंदुस्थानांतील कायदे मंडळांनी केलेले कायदे जुने म्हणून यापुढें अंमलांत येणार नाहींत. तथापि जुने कोणतेहि कायदे अंमलांत रहावें असें हिंदी पार्लमेंटला वाटल्यास तसें ठरविण्याचा अधिकार अर्थातच तिला आहे.

( ३ ) पगार, अधिकार किंवा सन्मान मिळविणारी सरकारी जागा किंवा हुद्दा, किंवा परवानगीनें चालणारा कोणताहि धंदा किंवा व्यापार यांच्या बाबतींत प्रत्येक धर्माच्या किंवा पंथाच्या लोकांना सर्वस्वी समान हक्क राहतील.

( ४ ) जनतेच्या हिताच्या दृष्टीनें हिंदी पार्लमेंट खालील गोष्टीकरितां योग्य ते कायदे करील. त्या गोष्टी अशाः—

नागरिकांचें आरोग्य रहावें. आपल्या श्रमानें उपजीविका करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं रहावी. काम करण्याची ज्याची तयारी असेल त्याला काम मिळावें व कोणतेंहि काम दिलें तरी त्याकरितां त्याला निदान गरिबीतहि निर्वाह होईल, अन्नवस्त्र मिळेल, इतकी मजुरी कमीत कमी मिळावी. कामकरी स्त्रिया प्रसूत होतील तेव्हां त्या आधीं व त्यानंतर कांहीं दिवस त्यांना काम न करतांहि घरीं बसून भाकरी मिळावी. कामकरी आई-बापांची लहान मुलें किंवा बेकार, दुबळे, पंगु नि म्हातारे-कोतारे यांना घरीं बसून भाकरी मिळावी. शेतकऱ्यांकडे त्यांच्या जमिनी कायम रहाव्या.

( ५ ) प्रत्येक नागरिकाला हत्यारें वापरण्याचा हक्क आहे; मात्र याविषयीं जे कायदे पार्लमेंट करील त्यांना धरूनच तीं वापरलीं पाहिजेत.

( ६ ) नागरिक या नात्यानें स्त्रिया व पुरुष दोघांचेहि हक्क सर्व बाबतींत सारखेच रहातील.

( ७ ) प्रांतरचना कोठेंही नवी करावयाची झाल्यास ती भाषेच्या तत्वावर व प्रांतांतील बहुमताला मान्य असेल तरच करावी. पण हें करतांना स्वराज्यव्यवस्था व आर्थिक शक्याशक्यता याही गोष्टी लक्षांत घ्याव्या.

( ८ ) परराष्ट्रांशीं व्यवहार करण्याचे जें जें अधिकार कोणत्याही वसाहती सरकारला आहेत तेच हिंदी पार्लमेंटला राहातील. मात्र हिंदी संस्थानांशीं हिंदी पार्लमेंटचा संबंध कसा राहावयाचा याचा विचार स्वतंत्रपणें व्हावा.

( ९ ) विलायतेचा राजा म्हणजे हिंदुस्थानचा बादशहा, सिनेटसभा, प्रतिनिधी सभा, इतक्यांचें मिळून हिंदी पार्लमेंट होईल.

( १० ) हिंदुस्थाना करितां राजानें आपला एक प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर जनरल नेमावा.

( ११ ) सर्व हिंदुस्थानाकरितां जसा गव्हर्नर-जनरल तसाच प्रत्येक प्रांताकरितां एक गव्हर्नर म्हणून आपला एक खास प्रतिनिधी राजानें नेमून द्यावा.

( १२ ) लष्कर, आरमार, विमानी फौज या सर्वांचा मुख्य अधिकार गव्हर्नर जनरल यांजकडे राहील. कारण तो अधिकार मुळांत राजाचाच आहे.

( १३ ) प्रांतिक प्रधान मंडळानें एखादा कायदा मंजूर केल्यास तो आपल्याला पसंत आहे किंवा नापसंत आहे तें गव्हर्नर जाहीर करील.

( १४ ) तो कायदा गव्हर्नरला नापसंत असेल तर त्याचा अंमल होऊं शकणार नाहीं.

त्यावेळीं पारतंत्र्याच्या काळांत नेहरू रिपोर्टांतील कलमें पुष्कळच समाधानकारक होतीं. शिवाय ह्यां रिपोर्टाला सर्वपक्षीय मान्यताहि मिळा-लेली होती. अपवाद फक्त जिनांचाच होता. पंडीत जवाहरलालनी या

रिपोर्टास विरोध केला. कारण हिंदी जनतेचें खास अधिकार या रिपोर्टनें हिरावून घेतले अशी त्यांची धारणा होती. डोमिनियन स्टेटस् म्हणजे वसाहतींचें राज्य. अर्थात दुसऱ्याच्या तंत्रानें कारभार करावा लागणार. जनतेच्या हातांत संपूर्ण सत्ता राहणार नव्हती. लष्कर, आरमार, विमानी फौज वगैरे सैन्य, गव्हर्नर जनरलच्या हातांत. अर्थात हक्क मिळणार ते मामूली. म्हणून पं. जवाहरलालनी या 'नेहरू रिपोर्टाला' कसून विरोध केला. स. १९२९ मध्यें लाहोर येथे पं. जवाहरलाल यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेस अधिवेशनांत पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडल्यानंतर हा, 'नेहरु रिपोर्ट' काळाच्या उदरांत नष्ट झाला.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 34902 वि: 
क्रमांक 9008 नों. दि: 9-2-63
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
92894

# पंडित मोतीलाल नेहरूंचा जीवनपट

६–५–१८६१—आग्रा येथें जन्म

१८८१—पहिलें लग्न.

१८८३—दुसरें लग्न.

१८८३—कानपुरास वकिलीस सुरुवात. नंतर अलाहाबादेस स्थलान्तर.

१४–११–१८८९—पं. जवाहरलाल यांचा जन्म.

१९००—आनंदभवन बांधणी.

१९००—विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म.

नोव्हेंबर १९०७—कृष्णा हाथिसिंग यांचा जन्म. संयुक्त प्रांताच्या १ ल्या राजकीय परिषदेचे अध्यक्ष. सुरत कॉं. उपस्थित.

१९१६—जवाहरलालजींचें लग्न ( कमला ).

१९–११–१९१७—मोतीलाल आजोबा झाले. प्रियदर्शनीचा जन्म.

१९१९—अमृतसर कॉंग्रेसचे अध्यक्ष.

१९२०—वकिलीस रामराम.

१०–५–१९२१—विजयालक्ष्मींचें लग्न ( रणजित पंडित )

६–१२–१९२१—पहिली अटक. सहा महिन्याची शिक्षा.

१९२७—युरोपला प्रयाण.

१९२८—नेहरू रिपोर्ट प्रसिद्ध.

६–४–१९३०—आनंदभवन राष्ट्रास अर्पण.

३०–६–१९३०—दुसऱ्यांदा अटक.

८–९–१९३०—सुटका.

२६–१–१९३१—प्रकृती अत्यवस्थ.

४–२–१९३१—लखनौस उपचारासाठीं नेलें.

६–२–१९३१—लखनौ येथें मृत्यु.

# प्रमुख संदर्भ-साहित्य


( 1 ) Jawaharlal Nehru—Frank Moraes

( 2 ) Nehru—A Political Biography—Michael Breacher.

( 3 ) With no Regrets—Mrs. Krishna Hutheesingh

( 4 ) Autobiography—Jawaharlal Nehru

( 5 ) A study of Nehru—Rafiq Zakaria ( Edited )

( 6 ) The Story of my life—M. R. Jayakar.

( 7 ) Pandit Motilal Nehru–Bhattacharyya & Chakaravarty ( His life and work )

( 8 ) Motilal Nehru—A. Pershad and Promilla Suri ( A short Political Biography )

( ९ ) स्वभावचित्रें—कै. दि. वा. दिवेकर

(१०) मोतीलाल नेहरू—रा. प्र. कानिटकर

(११) अर्वाचीन चरित्रकोश—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

(१२) लो. टिळक चरित्र, खंड ३ रा—कै. न. चिं. केळकर

(१३) माझी जीवनयात्रा—कै. न. चिं. केळकर

(१४) राष्ट्रपिता महात्मा गांधी—जोशी–अभ्यंकर

(१५) विठ्ठलभाई पटेल—ज. स. करंदीकर

(१६) वार्ताहर खंड—कै. न. चिं. केळकर


* * *

REFBK-0012418